## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1974

## THE NAGPUR UNIVERSITY ACT, 1974

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २ मे १९७४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

जी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1974

## AN ACT TO CONSOLIDATE AND AMEND THE LAW RELATING TO THE NAGPUR UNIVERSITY

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १७ मे १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

### नागपूर विद्यापीठाशी संबंधित विधी एकत्रित करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, विद्यापीठांच्या अधिक चांगल्या प्रशासनाचे उपाय विचारात घेण्यासाठी आणि त्यांची शिफारस करण्यासाठी व उच्च शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी केंद्र आणि राज्य या दोन्ही शासनांनी वेगवेगळ्या समित्या नेमलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, त्या समित्यांच्या शिफारशी विचारात घेऊन आणि राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठांशी संबंधित असलेल्या निरनिराळ्या विधींमध्ये एकरूपता आणण्याच्या हेतूने राज्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील उच्च शिक्षणाच्या सोयींचे अधिकाधिक समन्यायी वाटप करणे; अधिक प्रभावी प्रशासकीय आणि वित्तीय नियंत्रणाची आणि अध्यापन व संशोधन यांची अधिक चांगली रचना करण्याची तरतूद करणे; अध्यापक आणि इतर कर्मचारी यांची निवड आणि नेमणूक यांसह सर्व बाबींमध्ये कायद्याचे निष्ठापूर्वक पालन होत आहे याची खात्री करून घेणे; विवक्षित मंडळांवर विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्व देणे; अध्यापकांच्या व्यापक प्रतिनिधित्वाची तरतूद करणे आणि अशा

सर्व उपायांद्वारे, सर्वसाधारणपणे, विद्यापीठाच्या शासनामध्ये आणि उच्च शिक्षणासाठी त्याने पुरविलेल्या सोयींमध्ये सुधारणा करणे यासाठी नागपूर विद्यापीठाशी संबंधित विधी एकत्रित करणे आणि त्यात सुधारणा करणे समयोचीत आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(१) "संलग्न महाविद्यालय" म्हणजे, कलम ४३ अन्वये संलग्न असलेले महाविद्यालय आणि त्यामध्ये, कलम ९१ अन्वये संलग्न महाविद्यालय असल्याचे मानण्यात येणाऱ्या महाविद्यालयाचा समावेश होतो;

(२) "स्वायत्त महाविद्यालय" म्हणजे, परिनियमांद्वारे स्वायत्त म्हणून संबोधण्यात आलेले महाविद्यालय;

(३) "स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्था" म्हणजे, परिनियमांद्वारे स्वायत्त म्हणून संबोधण्यात आलेली मान्यताप्राप्त परिसंस्था;

(४) "स्वायत्त विद्यापीठ विभाग" म्हणजे, परिनियमांद्वारे स्वायत्त म्हणून संबोधण्यात आलेला विद्यापीठ विभाग;

(५) "कुलपती" आणि "कुलगुरू" म्हणजे, अनुक्रमे विद्यापीठाचे कुलपती आणि कुलगुरू;

(६) "महाविद्यालय" म्हणजे, विद्यापीठाकडून संचालित किंवा त्याच्याशी संलग्न असलेले महाविद्यालय;

(७) "संचालित महाविद्यालय" म्हणजे, विद्यापीठाकडून संचालित करण्यात येणारे महाविद्यालय;

(८) "घटक महाविद्यालय" म्हणजे, कलम ५१ अन्वये घटक करून घेण्यात आलेले महाविद्यालय आणि त्यामध्ये, कलम ९१ अन्वये घटक महाविद्यालय असल्याचे मानण्यात येणाऱ्या महाविद्यालयाचा समावेश होतो;

(९) "विभाग" म्हणजे, एखाद्या विषयाच्या किंवा विषयांच्या गटाच्या संदर्भात, परिनियमांद्वारे असा विभाग म्हणून संबोधण्यात येणारा विभाग;

(१०) "शिक्षण संचालक" म्हणजे, शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य;

(११) "उच्च शिक्षण संचालक" म्हणजे, उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य;

(१२) "कक्ष" म्हणजे, विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून तरतूद करण्यात आलेला, ठेवण्यात आलेला किंवा मान्यता दिलेला निवासाचा किंवा समूहजीवनाचा घटक असलेला भाग;

(१३) "मुख्याध्यापक" म्हणजे, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेचा प्रमुख;

(१४) "विभाग प्रमुख" म्हणजे, एखाद्या विभागातील शिक्षण, प्रशिक्षण किंवा संशोधन यासाठी मुख्यतः जबाबदार असलेला अध्यापक;

(१५) "उच्च माध्यमिक शाळा" म्हणजे शिक्षण संचालकाकडून, किंवा त्याने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून, परिपूर्ण उच्च माध्यमिक शाळा म्हणून जिला मान्यता देण्यात आली आहे अशी शाळा आणि त्यात, विद्यापीठाकडून जिची नोंदणी करण्यात आली असेल किंवा नोंदणी करण्यात आल्याचे समजण्यात येईल अशा महाराष्ट्र राज्याबाहेरील उच्च माध्यमिक शाळेचा समावेश होतो;

(१६) "वसतीगृह" म्हणजे, विद्यापीठाकडून तरतूद करण्यात आलेले, चालविण्यात येणारे किंवा त्याने मान्यता दिलेले विद्यार्थ्यांसाठी असलेले निवासस्थान;

(१७) "परिसंस्था" म्हणजे, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी किंवा विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात आलेली महाविद्यालये नसणारी शिक्षण संस्था;

(१८) "स्थानिक व्यवस्थापन समिती" म्हणजे, कलम ४३, पोट-कलम (३), खंड (ब) अन्वये रचना करण्यात आलेली समिती;

(१९) "महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ" म्हणजे, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेले राज्य मंडळ;

(२०) "व्यवस्थापन" म्हणजे ज्याच्या व्यवस्थापनाखाली, विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात आलेली एक किंवा अधिक महाविद्यालये किंवा परिसंस्था यांचे संचालन करण्यात येत असेल असे, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही विश्वस्त व्यवस्थेचे विश्वस्त किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही संस्थेचे व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ—मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो;

(२१) "विहित" म्हणजे, परिनियम, आदेश (ordinance) किंवा विनियम यांद्वारे विहित करण्यात आलेले;

(२२) "प्राचार्य" म्हणजे, महाविद्यालय, विशेषीकृत शिक्षण परिसंस्था, स्नातकोत्तर केंद्र किंवा इतर मान्यताप्राप्त परिसंस्था यांचा प्रमुख;

(२३) "मान्यताप्राप्त परिसंस्था" म्हणजे, संलग्न महाविद्यालयाव्यतिरिक्त, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यासासाठी असलेली आणि अशी परिसंस्था म्हणून विद्यापीठाने मान्यता दिलेली, परिसंस्था;

(२४) "नोंदलेला स्नातक" म्हणजे, कलम ८१ अन्वये नोंदणी झालेला स्नातक आणि त्यामध्ये, कलम ९१ अन्वये नोंदलेला स्नातक असल्याचे समजण्यात येणाऱ्या स्नातकाचा समावेश होतो;

(२५) "अनुसूची" म्हणजे, या अधिनियमाला जोडण्यात आलेली अनुसूची;

(२६) "माध्यमिक शाळा" म्हणजे, शिक्षण संचालकाकडून किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून, परिपूर्ण माध्यमिक शाळा म्हणून जिला मान्यता मिळालेली आहे अशी शाळा;

(२७) "माध्यमिक शिक्षक" म्हणजे, परिनियमाद्वारे माध्यमिक (शाळांचे) शिक्षक म्हणून ज्यांना संबोधण्यात येईल, असा, माध्यमिक शाळेत किंवा उच्च माध्यमिक शाळेत शिक्षण देणारा शिक्षकाचा वर्ग;

(२८) "परिनियम", "आदेश (ordinance)" आणि "विनियम" म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेले किंवा करण्यात आल्याचे मानण्यात आलेले आणि त्यावेळी अंमलात असलेले विद्यापीठाचे अनुक्रमे परिनियम, आदेश (ordinance) आणि विनियम;

(२९) "विद्यार्थी परिषद" म्हणजे, कलम ३४ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेली विद्यापीठाची विद्यार्थी परिषद;

(३०) "अध्यापक" म्हणजे, विद्यापीठातील कोणत्याही संचालित, घटक किंवा संलग्न महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, प्रयोग निर्देशक, पाठनिर्देशक, शिक्षणपद्धती अध्यापक किंवा संचालक, शारीरिक शिक्षण, कोणताही असल्यास, किंवा परिनियमांद्वारे अध्यापक म्हणून संबोधण्यात येईल अशी, शिक्षण देणारी किंवा संशोधनात मार्गदर्शन करणारी इतर व्यक्ती ;

(३१) "विद्यापीठाचा अध्यापक" म्हणजे, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता किंवा विद्यापीठात शिक्षण देण्यासाठी किंवा विद्यापीठात किंवा विद्यापीठाकडून संचालित कोणत्याही महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत, संशोधनात मार्गदर्शन करण्यासाठी जिला नेमण्यात येईल किंवा मान्यता देण्यात येईल आणि परिनियमांद्वारे अध्यापक म्हणून जिला पदनिदर्शित करण्यात येईल अशी इतर व्यक्ती ;

(३२) "विद्यापीठ" म्हणजे, या अधिनियमान्वये पुनर्रचना करण्यात आलेले नागपूर विद्यापीठ ;

(३३) "विद्यापीठ अधिक्षेत्र" म्हणजे, अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र ;

(३४) "विद्यापीठ विभाग" म्हणजे, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारा विभाग किंवा विद्यापीठाकडून असा विभाग म्हणून मान्यता देण्यात आलेला महाविद्यालयातील किंवा स्नातकोत्तर किंवा संशोधन परिसंस्थेतील विभाग आणि त्यामध्ये, विद्यापीठाकडून प्रस्थापित करण्यात आलेल्या आणि परिनियमांद्वारे असा विभाग म्हणून संबोधण्यात येणाऱ्या अभ्यास केंद्राचा समावेश होतो.

## प्रकरण दोन

### विद्यापीठ

विद्यापीठाचे कायद्याने संस्थापन.

३. (१) विद्यापीठाचे कुलपती, कुलगुरू, अधिसभेचे, कार्यकारी परिषदेचे आणि विद्या परिषदेचे सदस्य आणि ज्यांना असे अधिकारी किंवा सदस्य असल्याचे मानण्यात येईल किंवा असे अधिकारी किंवा सदस्य म्हणून यानंतर ज्यांना नेमण्यात येईल किंवा निवडून देण्यात येईल अशा सर्व व्यक्ती यांचा मिळून "नागपूर विद्यापीठ" या नावाचा एक निगम निकाय याद्वारे बनविण्यात येत आहे आणि तो असा निगम निकाय म्हणून जाहीर करण्यात येत आहे; आणि अशा निगम निकायाची परंपरा अखंड असेल व त्याचा एक सामाईक शिक्का असेल आणि त्यास त्या नावाने दावा लावता येईल, तसेच त्यावर त्या नावाने दावा लावता येईल.

(२) विद्यापीठ, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्यास व धारण करण्यास सक्षम असेल, तसेच विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी त्याच्याकडे निहित असलेली किंवा त्याने संपादन केलेली कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता पट्ट्याने देण्यास, विकण्यास किंवा अन्यथा तिचे हस्तांतरण करण्यास किंवा तिची विल्हेवाट लावण्यास आणि करार करण्यास आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करण्यात सक्षम असेल.

विद्यापीठाच्या शक्ती.

४. या अधिनियमाच्या उपबंधाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून, विद्यापीठास पुढील शक्ती असतील आणि ते पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(१) विद्यापीठ, वेळोवेळी, ठरवील अशा विद्येच्या शाखांमध्ये आणि पाठ्यक्रमांमध्ये शिक्षण, अध्यापन आणि प्रशिक्षण देण्याची तरतूद करणे; संशोधनासाठी व ज्ञानाच्या वाढीसाठी व प्रसारासाठी तरतूद करणे आणि सामान्यपणे, कला (ललित कला धरून), वाणिज्य, विज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र आणि विद्या व संस्कृती यांच्या इतर शाखांची जोपासना करणे व वाढ करणे ;

(२) ज्यायोगे संचालित, घटक आणि संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विशेषीकृत अभ्यासक्रम हाती घेणे शक्य होईल अशी तरतूद करणे;

(३) अध्यापनासाठी आणि संशोधनासाठी विद्यापीठाच्या प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये आणि इतर साधनसामग्री यांचे आयोजन, परिरक्षण व व्यवस्थापन करणे;

(४) संशोधनाचे किंवा विशेषीकृत अभ्यासक्रमाचे विभाग आणि परिसंस्था स्थापन करणे, त्या चालविणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे;

(५) महाविद्यालये, परिसंस्था, कक्ष, वसतिगृहे व व्यायाम शाळा स्थापन करणे, ती चालविणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे;

(६) प्राचार्य पदे, प्राध्यापक पदे, अधिव्याख्याता पदे आणि विद्यापीठास आवश्यक असतील अशी अध्यापनाची किंवा विद्याविषयक पदे चालू करणे; त्या पदांवर किंवा इतर पदांवर व्यक्तींची नेमणूक करणे आणि त्यांच्या अर्हता व त्यांच्या सेवेच्या अटी आणि शर्ती विहित करणे;

(७) प्राध्यापक, प्रपाठक किंवा अधिव्याख्याते म्हणून किंवा विद्यापीठाचे अध्यापक म्हणून किंवा अन्यथा, व्यक्तींची नेमणूक करणे किंवा त्यांना मान्यता देणे;

(८) विनिर्दिष्ट मुदतीसाठी, विद्यापीठाचे अध्यापक म्हणून, इतर कोणत्याही विद्यापीठात किंवा संघटनेत काम करणाऱ्या व्यक्तींची नेमणूक करणे;

(९) प्रशासकीय, लिपिक वर्गीय आणि इतर पदे निर्माण करणे, त्या पदांवर नेमणुका करणे आणि त्यांच्या अर्हता व त्यांच्या सेवेच्या अटी आणि शर्ती विहित करणे;

(१०) निरनिराळ्या परीक्षांसाठी शिक्षणक्रम आणि अभ्यासक्रम विहित करणे ;

(११) शक्य असेल तेथे, विद्यापीठ विभागांत, महाविद्यालयांत व परिसंस्थांमध्ये, विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांचा व विषयांचा भाग म्हणून व त्यांच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकेऐवजी किंवा तिच्या भागाऐवजी, विद्यार्थ्यांमार्फत, राष्ट्रीय नियोजन व मूल्यमापन यांच्या संबंधातील आकडेवारी, आधार-सामग्री व इतर तपशील यांच्या पाहणीसाठी व इतर माहिती गोळा करण्यासाठी तरतूद करणे ;

(१२) विद्यापीठाच्या अध्यापकांच्या संकोषामधून अध्यापकांची प्रतिनियुक्ती करून महा-विद्यालयांतील अध्यापनाचे मार्गदर्शन करणे आणि महाविद्यालयांचा दर्जा सुधारण्यासाठी महाविद्यालयातील अध्यापनाची अनुपूर्ती करणे ;

(१३) परीक्षा किंवा इतर कोणत्याही चाचण्या यांच्या आधारे किंवा अन्य रीतीने पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरू करणे ;

(१४) परीक्षा घेणे आणि पुढील व्यक्तींना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करणे—

(अ) विहित केलेल्या रीतीने, विद्यापीठात किंवा संचालित, घटक किंवा संलग्न महाविद्या-लयांत किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत, मान्यता मिळालेला अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सूट मिळाली असेल त्या व्यक्तींव्यतिरिक्त, ज्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला असेल अणि विद्यापीठाने विहित केलेल्या परीक्षा ज्या व्यक्ती उत्तीर्ण झाल्या असतील ;

(ब) अध्यादेश आणि विनियम यांद्वारे विहित करण्यात आलेल्या शर्तींन्वये, ज्यांनी पत्रव्यवहाराद्वारे किंवा अन्य रीतीने मान्यता मिळालेला अभ्यासक्रम पूर्ण केला असेल ; किंवा

(क) अध्यादेश आणि विनियम यांद्वारे उपबंधित करण्यात आलेल्या शर्तींन्वये ज्या व्यक्ती संशोधनाच्या कामात गुंतलेल्या असतील ;

(१५) परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे, सन्मान्य पदव्या किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे ;

(१६) विद्यापीठाच्या पटावर विद्यार्थी म्हणून ज्यांची नावे दाखल केलेली नाहीत अशा बाह्य विद्यार्थ्यांना व व्यक्तींना, विद्यापीठ विहित करील अशा पदव्या, पदविका व प्रमाणपत्रे देणे आणि अशा व्याख्यानांची, शिक्षणाची आणि प्रशिक्षणाची तरतूद करणे ;

(१७) विद्यापीठाकडून चालविण्यात येत नसतील अशा महाविद्यालयांना आणि परिसंस्थांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करणे आणि परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्तींनुसार ते सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही विशेषाधिकार काढून घेणे आणि विद्यापीठाकडून चालविण्यात येत नसतील असे कक्ष आणि वसतिगृहे यांना मान्यता देणे आणि अशा मान्यता काढून घेणे;

(१८) परिनियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या रीतीने आणि शर्तींवर, एखादे महाविद्यालय, परिसंस्था किंवा विभाग हा, स्वायत्त महाविद्यालय, परिसंस्था किंवा यथास्थिती, विभाग असल्याचे जाहीर करणे ;

(१९) निरीक्षणाच्या प्रयोजनाकरिता परिनियमांद्वारे स्थापन करण्यात आलेल्या समुचित यंत्रणेमार्फत महाविद्यालयांची आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांची तपासणी करणे आणि त्यांच्यामध्ये शिक्षण, अध्यापन आणि प्रशिक्षण यांचा उचित दर्जा राखण्यात आला आहे आणि त्यामध्ये ग्रंथालय आणि प्रयोगशाळा यांसारख्या सोयींची पर्याप्त तरतूद करण्यात आली आहे हे सुनिश्चित करण्यासाठी उपाय योजणे ;

(२०) घटक आणि संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या कार्याचे नियंत्रण करणे आणि त्यांचा समन्वय घडवून आणणे आणि त्यांना वित्तीय सहाय्य देणे;

(२१) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, राज्य] शासनाच्या मंजुरीने, योग्य आणि पुरेशा कारणावरून, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्तींखाली, महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे व्यवस्थापन, त्यासाठी करण्यात यावयाचे कोणतेही प्रदान करून हाती घेणे ;

(२२) विश्वस्त व्यवस्था आणि दाननिधी धारण करणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे आणि अधिछात्रवृत्त्या, फिरत्या अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या, विद्यार्थीवेतने, पदके आणि पारितोषिके सुरू करणे आणि ती देणे ;

(२३) विद्यापीठ हे, भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेत निदेशक तत्त्वे व इतर तरतुदी यांमध्ये नजरेसमोर ठेवल्याप्रमाणे, शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक स्थित्यंतराचे केंद्र बनविणे;

(२४) जे वर्ग आणि जाती सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या असतील त्यांना विद्यापीठ शिक्षणाचे फायदे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष तरतूद करणे ;

(२५) विद्यार्थिनींसाठी उपलब्ध करून देण्यास विद्यापीठाला आवश्यक वाटेल अशी विद्यापीठ शिक्षणाच्या लाभासाठी, विशेष तरतूद करणे ;

(२६) ग्रामीण क्षेत्रामध्ये उच्च शिक्षणासाठी तरतूद करणे ;

(२७) आदेशाद्वारे (ordinance) विनियमित करण्यात येतील असे फी आणि इतर आकार निश्चित करणे, त्यांची मागणी करणे आणि ते घेणे किंवा वसूल करणे ;

(२८) विद्यापीठाच्या, महाविद्यालयांच्या आणि परिसंस्थांच्या विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेवर तसेच त्यांची वर्तणूक व शिस्तविषयक बाबी यांवर देखरेख ठेवणे, नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे नियमन करणे ;

(२९) विद्यार्थ्यांचे आरोग्य, समूहजीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृद्धीसाठी व्यवस्था करणे आणि परिनियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या संघटनांमार्फत पाठ्येतर कार्यक्रम आणि कल्याणविषयक कामास चालना देणे ;

(३०) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृद्धीची व्यवस्था करणे ;

(३१) विद्यापीठाकडून मान्यता मिळालेल्या महाविद्यालयांमध्ये आणि परिसंस्थांमध्ये अध्यापन कार्य आणि संशोधन कार्य चालविणे, त्यांचा समन्वय करणे, त्याचे नियमन करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे ;

(३२) उजळणी आणि सुटीतील पाठ्यक्रमांच्या सोयींची तरतूद करणे ;

(३३) अध्यापकांच्या प्रशिक्षणाची तरतूद करणे ;

(३४) शैक्षणिक आणि इतर सामाजिक किंवा राष्ट्रीय कार्यासाठी निधी गोळा करणे आणि ते ज्या कारणासाठी गोळा करण्यात आले असतील त्या कारणासाठी त्यामधून रकमा देणे ;

(३५) (अ) मुद्रण व प्रकाशन विभाग ;

(ब) विद्यापीठ विस्तार मंडळे;

(क) माहिती केंद्रे ;

(ड) सेवायोजन मार्गदर्शन केंद्रे.

(इ) सहकारी संस्था ; आणि

(फ) आरोग्य सेवा ;

स्थापन करणे, चालविणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(३६) (अ) राष्ट्रीय सेवा योजना ;

(ब) राष्ट्रीय छात्रसेना ;

(क) राष्ट्रीय क्रीडा संघटना ;

(ड) शारीरिक व लष्करी प्रशिक्षण ;

(इ) बहि:शाल अध्यापन व संशोधन ;

(फ) विद्यार्थी परिषद ; आणि

(ग) सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्या संबंधात असलेली तर कोणतीही कामे यांसाठी तरतूद करणे;

(३७) लोकसेवा आणि सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवाप्रवेशाच्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षणाची किंवा खास शिक्षणाची तरतूद करणे;

(३८) कार्यकारी परिषद ठरवील अशा रीतीने आणि अशा प्रयोजनांसाठी, इतर कोणतेही विद्यापीठ, प्राधिकरणे किंवा संघटना यांच्याशी सहकार्य करणे किंवा त्यांना सहयोग देणे;

(३९) विवक्षित अभ्यासक्रम चालविण्याची परवानगी मागे घेऊन, अंशतः किंवा पूर्णतः संलग्नीकरण काढून घेणे;

(४०) विद्यापीठाने स्वत: किंवा इतर विद्यापीठांच्या सहकार्याने मराठीच्या अभ्यासक्रमाचे प्रचालन करणे व शिक्षणाचे व परीक्षांचे माध्यम म्हणून मराठीचा वापर करणे ;

(४१) महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या व्यवस्थापनास मिळतील किंवा त्यांच्याकडून वसूल करण्यात येतील अशा फी आणि इतर आकार विहित करणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे ;

(४२) राज्य शासनाच्या संमतीने आणि विद्यापीठाच्या मालमत्तेच्या तारणावर, विद्यापीठाच्या प्रयोजनांकरिता पैसा कर्जाऊ घेणे ; आणि

(४३) विद्यापीठाची सर्व किंवा कोणतीही उद्दिष्टे पार पाडण्यासाठी आवश्यक, आनुषंगिक किंवा पोषक असतील अशी इतर सर्व कृत्ये आणि गोष्टी करणे.

विद्यापीठाची अधिकारिता. ५. (१) ज्या प्रादेशिक मर्यादांमध्ये या अधिनियमाद्वारे विद्यापीठाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारिता शक्तींचा वापर करण्यात येईल त्या प्रादेशिक मर्यादांमध्ये कोणत्याही संपूर्ण विद्यापीठ अधिक्षेत्राचा आणि समावेश असेल :

विशेषाधिकार बहाल करणे. परंतु, महाराष्ट्र राज्यातील किंवा इतर प्रदेशातील कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेस, विद्यापीठास आणि राज्य शासनास लादण्यात योग्य वाटतील अशा शर्तींना आणि निर्बंधांना अधीन राहून, विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करता येतील :

आणखी असे की विद्यापीठास विद्यापीठ अधिक्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांना पत्रव्यवहार अभ्यासक्रम किंवा बाह्यपदवी अभ्यासक्रम यांचा फायदा देता येईल.

(२) विद्यापीठ अधिक्षेत्रातील कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेस विद्यापीठाच्या संमतीशिवाय आणि राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय विधिद्वारे प्रस्थापित करण्यात आलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाशी कोणत्याही रीतीने सहयोगी होता येणार नाही किंवा अशा विद्यापीठाचे विशेषाधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न करता येणार नाहीत :

परंतु, ज्या विद्यापीठाची अधिकारिता कोणत्याही राज्यापुरती किंवा क्षेत्रापुरती मर्यादित नसेल अशा विद्यापीठाशी सहयोगी होण्याचा किंवा त्याचे विशेषाधिकार मिळविण्याचा एखाद्या शैक्षणिक परिसंस्थेचा प्रयत्न असेल तर, अशा शैक्षणिक परिसंस्थेच्या बाबतीत असे सहयोगी होण्यास किंवा अधिकार मिळविण्यास राज्य शासनास परवानगी देता येईल :

आणखी असे की, ज्या विद्यापीठाची अधिकारिता कोणत्याही राज्यापुरती किंवा क्षेत्रापुरती मर्यादित नसेल असे विद्यापीठ, अधिक्षेत्रात संशोधन केंद्र किंवा इतर शाखा (युनिट) प्रस्थापित करू इच्छित असेल तर त्यास राज्य शासनाच्या मंजुरीने तसे करता येईल.

(३) दुसऱ्या विद्यापीठाच्या अधिक्षेत्रात कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेकडून मिळत असतील असे कोणतेही विशेषाधिकार हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात आला असेल त्या तारखेपूर्वी राज्य-शासनाच्या मंजुरीशिवाय काढून घेण्यात येणार नाहीत.

विद्यापीठ अधिक्षेत्राच्या सीमा वाढविण्याची शासनाची शक्ती. ६. (१) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिक्षेत्रांपैकी कोणत्याही अधिक्षेत्राच्या सीमांमध्ये कोणताही [illegible] होईल, त्याबाबतीत, राज्य शासनास संबंधित विद्यापीठाशी विचारविनिमय केल्यानंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा [illegible] तारखेपासून, अशा बदलानुसार उपरोक्त अधिक्षेत्रांच्या सीमा वाढविता येतील किंवा त्या कमी करण्यात येतील.

राज्य शासनाची शक्ती आनुषंगिक बाबींवर उपबंध करण्याची. (२) उक्त तारखेच्या लगतपूर्वी, अशा रीतीने भर घालण्यात आलेले क्षेत्र हे महाराष्ट्र राज्यात [illegible] प्रस्थापित करण्यात आलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाच्या (परंतु श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ वगळून) अधिक्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेले असेल तर, राज्य शासनाने [illegible] अधिसूचनेद्वारे, अशा रीतीने भर घालण्यात आलेले क्षेत्र, हे उक्त तारखेपासून

अशा इतर विद्यापीठांच्या अधिक्षेत्रामध्ये समाविष्ट असण्याचे बंद होईल असा निदेश देईल, आणि उक्त तारखेस आणि त्या तारखेपासून अशा अधिक्षेत्रात असलेल्या सर्व शैक्षणिक परिसंस्थांचे, अशा इतर विद्यापीठाशी सहयोगी असणे आणि त्यांच्या विशेषाधिकारांचा लाभ घेणे बंद होईल.

७. (१) कोणत्याही व्यक्तीस, स्त्री-पुरुष भेद, वंश, पंथ, वर्ग, जन्मस्थान, धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली यांच केवळ कारणावरून, एखाद्या विद्यापीठाचे कोणतेही पद, किंवा त्याच्या प्राधिकारणांपैकी, मंडळांपैकी किंवा समित्यांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचे, मंडळाचे किंवा समितीचे सदस्यत्व मिळण्यापासून किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यासक्रम यासाठी प्रवेश मिळवण्यापासून वंचित ठेवण्यात येणार नाही :

स्त्री-पुरुष भेद, पंथ, वर्ग, धर्म किंवा मत-प्रणाली इ. कोणतीही

परंतु विद्यापीठास केवळ स्त्रियांसाठी कोणतेही महाविद्यालय किंवा परिसंस्था चालविता येईल, असली तरी संलग्न करून घेता येईल किंवा तिला मान्यता देता येईल किंवा विद्यापीठाने चालविलेल्या कोणत्याही विद्यापीठ महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत विद्यार्थी म्हणून दाखल करून घेण्याच्या प्रयोजनाकरिता, स्त्रियांसाठी सर्वांना खुले किंवा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील आणि समाजातील व्यक्तींसाठी जागा असणे राखून ठेवता येतील.

(२) विद्यापीठात अध्यापक किंवा विद्यार्थी म्हणून प्रवेश मिळण्यासाठी किंवा त्यातील कोणतेही पद किंवा जागा धारण करण्यासाठी किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी यासाठी अर्हता ठरण्यासाठी किंवा विद्यापीठाचे कोणतेही विशेषाधिकार उपभोगण्यासाठी किंवा त्यांचा वापर करण्यासाठी किंवा त्याचे कोणतेही धर्मादान उपभोगण्याचा हक्क प्राप्त करून देण्यासाठी स्त्री-पुरुष भेद, वंश, पंथ, वर्ग, जन्मस्थान, धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली यासंबंधीची कोणतीही कसोटी कोणत्याही व्यक्तीवर विद्यापीठाने लादणे हे विधिसंमत असणार नाही.

## प्रकरण तीन

## विद्यापीठाचे अधिकारी

८. विद्यापीठाचे अधिकारी पुढीलप्रमाणे असतील. विद्यापीठाचे अधिकारी.

(एक) कुलपती ;

(दोन) कुलगुरू ;

(तीन) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(चार) कुलसचिव ;

(पाच) ग्रंथपाल ;

(सहा) विद्यार्थी कल्याण संचालक ; आणि

(सात) विद्यापीठाचे अधिकारी म्हणून परिनियमाद्वारे पदनिर्देशित करण्यात येतील असे विद्यापीठाच्या सेवेत असतील असे इतर अधिकारी.

९. (१) त्यावेळी असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल कुलपती असतील. कुलपती.

(२) कुलपती हा, आपल्या पदपरत्वे, विद्यापीठाचा प्रमुख आणि अधिसभेचा अध्यक्ष असेल आणि उपस्थित असेल तेव्हा, अधिसभेच्या सभांचे आणि विद्यापीठाच्या कोणत्याही दीक्षांत समारंभाचे अध्यक्षपद स्वीकारील.

(३) कुलपतीस, हा अधिनियम किंवा परिनियम याद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान करण्यात येतील अशा इतर शक्ती असतील.

कुलगुरू. १०(१) कुलगुरूची नियुक्ती या पोट-कलमाच्या उपबंधांस अनुसरून करण्यात येईल. कुलगुरूच्या निवडीसाठी तीन व्यक्तींची समिती असेल ; त्यांच्यापैकी दोन व्यक्ती या, विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाकडून चालविण्यात येणाऱ्या, त्याच्याशी संलग्न असणाऱ्या किंवा विद्यापीठाने मान्यता दिलेल्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा परिसंस्थेशी संबंधित असणार नाहीत अशा असतील ; एक कार्यकारी परिषदेकडून व दुसरी विद्यापरिषदेकडून नामनिर्देशित करण्यात येईल तर तिसरी, व्यक्ती ही, कुलपतीकडून नामनिर्देशित करण्यात येईल. कुलपती, या तिघांपैकी एकाची अशा समितीचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती करील. समिती तीनपेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींची निवड करील व आपल्या निवडीबद्दल कुलपतीस कळवील. कुलपतीस, अशा रीतीने निवडलेल्या व्यक्तींमधून एकाची कुलगुरू म्हणून नियुक्ती करता येईल. कुलपतीने अशा रीतीने निवडलेल्या व्यक्तींपैकी कोणासही आपली मान्यता दिली नाही तर, त्यास नव्याने निवड करण्याबद्दल सांगता येईल.

(२) कुलगुरू, त्याच्या सेवेच्या कराराच्या कोणत्याही अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून, तो ज्या तारखेस आपले पद धारण करील त्या तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील. परंतु, त्याचा पदावधी संपल्यानंतर त्या पदावरील नियुक्तीसाठी तो फक्त आणखी एका पदावधी-पुरताच पात्र असेल. कुलगुरू, त्याची मुदत संपली असली तरीही, त्याच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती होऊन तो आपले पद धारण करीपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवील.

(३) मृत्यू, राजीनामा किंवा अन्य कारणाने कुलगुरूचे पद रिकामे झाल्याच्या प्रसंगी, अधिष्ठाता किंवा त्या प्रयोजनासाठी कुलपतीकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशी इतर कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) अन्वये ती रिकामी जागा भरण्यासाठी नवीन कुलगुरूची नेमणूक ज्या काळामध्ये करण्यात येईल अशा तीन महिन्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीसाठी कुलगुरू म्हणून काम करील.

(४) रजा, आजारपण किंवा इतर कारण यामुळे कुलगुरूचे कोणतेही पद तात्पुरते रिकामे झाले असेल त्याबाबतीत, कार्यकारी परिषद, शक्य तितक्या लवकर, कुलपतीच्या मान्यतेस अधीन राहून कुलपतीच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, तिला योग्य वाटेल अशी व्यवस्था करील. अशी व्यवस्था करण्यात येईतोपर्यंत त्या प्रयोजनासाठी कुलपतीकडून नामनिर्देशित करण्यात आलेला अधिष्ठाता, कुलगुरूच्या पदाची चालू कर्तव्ये पार पाडील.

(५) कुलगुरू विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व त्यास दरमहा २,००० रुपये वेतन किंवा विद्यापीठ प्राध्यापकांची कमाल वेतनश्रेणी यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम आणि शिवाय विनामूल्य सुसज्ज निवासगृह, शोफरच्या सेवेसह त्याच्या वापरासाठी मोटार (तिचे परिरक्षण व दुरुस्ती व तिला आवश्यक असलेले इंधन धरून) आणि अधिकृत प्रयोजनांसाठी दरसाल ५,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल इतका अतिथ्यभत्ता मिळेल. कुलगुरूच्या सेवेच्या इतर अटी आणि शर्ती, त्याने करावयाच्या करारात विहित करण्यात येतील अशा असतील.

(६) कोणतीही व्यक्ती, ती पासष्ठ वर्षे वयाची झाल्यानंतर कुलगुरूचे पद धारण करणार नाही किंवा धारण करण्याचे चालू ठेवणार नाही

(७) राज्यातील कोणत्याही विद्यापीठाच्या किंवा अशा कोणत्याही विद्यापीठाकडून चाल-विण्यात येणाऱ्या, त्याच्याशी संलग्न असणाऱ्या किंवा त्याने मान्यता दिलेल्या कोणत्याही महा-विद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या सेवेतील प्राध्यापकाची कुलगुरू म्हणून नेमणूक करण्यात येईल तर, प्राध्यापक म्हणून, असलेल्या त्याच्या सेवेच्या अटी व शर्तींमध्ये, ती कुलगुरू म्हणून राहील त्या पदावधीमध्ये, त्यास गैरफायदेशीर ठरतील अशा रीतीने फेरफार करता कामा नये आणि तो आपल्या पदाचा धारणाधिकार कायम ठेवील.

कुलगुरूच्या शक्ती व कर्तव्ये. ११. (१) कुलगुरू हा विद्यापीठाचा प्रमुख अधिशासी अधिकारी व विद्याधिकारी असेल आणि तो कुलपतीच्या गैरहजेरीत, अधिसभेच्या सभांत व विद्यापीठाच्या कोणत्याही दीक्षान्त सभारंभात, अध्यक्षपदी असेल. तो कार्यकारी व विद्यापरिषदा, विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ, विद्यापीठ

अध्यापक नियुक्ती निवड समिती, विद्यापीठ अध्यापक मान्यता समिती, परीक्षक नियुक्ती समिती, आणि विद्या नियोजन व मूल्यांकन समिती, वित्त समिती, ग्रंथालय समिती या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशी इतर प्राधिकरणे आणि मंडळे यांचा पदसिद्ध सदस्य व अध्यक्ष असेल. कुलगुरूस, विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही सभेस हजर राहण्याचा व तीत बोलण्याचा हक्क असेल: परंतु तो अशा प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य नसेल तर, त्यास अशा सभेस मत देण्याचा हक्क असणार नाही.

(२) कुलगुरूस, अधिसभा, कार्यकारी व विद्यापरिषदा, विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ, वित्त समिती आणि पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली इतर प्राधिकरणे आणि मंडळे यांच्या सभा बोलाविण्याची शक्ती असेल, परंतु त्यास अशी शक्ती विद्यापीठाच्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यास प्रदान करता येईल.

(३) हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinances) आणि विनियम यांच्या उपबंधांचे निष्ठापूर्वक पालन होत आहे हे सुनिश्चित करणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल, व त्या प्रयोजनार्थ कुलपतीस, कुलगुरूस निदेश देण्याची शक्ती असेल व तो अशा कोणत्याही निदेशांची अंमलबजावणी करील.

(४) त्वरित कारवाई करणे जीमुळे आवश्यक आहे अशी कोणतीही आणीबाणीची परिस्थिती असल्याबद्दल कुलगुरूची सकारण खात्री होईल तर तो त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करील व साधारणत: ज्या प्राधिकरणाने किंवा मंडळाने उक्त कारवाई केली असती त्या प्राधिकरणास किंवा मंडळास, ज्या कारणांवरून आणीबाणी असल्याचे त्यास वाटत होते ती कारणे, आणि करण्यात आलेली कारवाई व तत्संबंधीची कारणे शक्य तितक्या लवकर लेखी कळवील. आणीबाणीची परिस्थिती खरोखरच होती किंवा कसे याबद्दल किंवा केलेल्या कारवाईबद्दल (अशा कारवाईमुळे विद्यापीठाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीवर परिणाम होत नसेल त्या बाबतीत) किंवा या दोन्हींबद्दल कुलगुरू आणि उक्त प्राधिकरण किंवा मंडळे यांच्यामध्ये मतभेद निर्माण होईल त्या प्रसंगी उक्त बाब कुलपतीकडे विनिर्दिष्ट करण्यात येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल:

परंतु कुलगुरूने केलेल्या कोणत्याही अशा कारवाईमुळे विद्यापीठाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीवर परिणाम झाला असेल त्याबाबतीत अशा व्यक्तीस, अशा कारवाईची नोटीस, तिला मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांमध्ये कार्यकारी परिषदेकडे अपील सादर करण्याचा हक्क असेल.

(५) हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinance) व विनियम यांच्या उपबंधानुसार विद्यापीठाच्या कामकाजाच्या प्रशासनास कुलगुरू हा जबाबदार असेल व तो, उपरोक्त उपबंधांशी विसंगत नसतील असे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे व इतर प्राधिकरणांचे आणि मंडळांचे निर्णय अंमलात आणील.

(६) (अ) प्रमुख अधिशासी व विद्या अधिकारी म्हणून हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinance) आणि विनियम, यांच्या उपबंधानुसार, विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांच्या व अध्यापकीय विद्याविषयक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या कामाचे व त्यांच्या वर्तणुकीचे कुलगुरूने नियमन करणे हे विधिसंमत असेल.

(ब) परिनियमांन्वये, आदेशान्वये (Ordinance) किंवा विनियमांन्वये कोणत्याही बाबींचे नियम करणे आवश्यक असेल, परंतु त्या बाबतीत कोणतेही परिनियम, आदेश (Ordinance) किंवा विनियम करण्यात आलेले नसतील त्याबाबतीत, कुलगुरूस, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देऊन त्या वेळेपुरते अशा बाबींचे नियमन करता येईल व त्यानंतर शक्य तितक्या लवकर, अशा बाबी तो कार्यकारी परिषद किंवा इतर संबंधित प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या पुढे मान्यतेसाठी ठेवील. त्याचवेळी त्यास त्या बाबतीत करावे आवश्यक असलेल्या परिनियमांचा, आदेशांचा (Ordinances) किंवा यथास्थिती विनियमांचा मसुदा विचारार्थ अशा प्राधिकरणापुढे किंवा मंडळापुढे ठेवता येईल.

(७) कुलगुरू, परिनियमांन्वये, आदेशान्वये (Ordinances) व विनियमांन्वये विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

विद्याशाखांचे अधिष्ठाते. १२. (१) प्रत्येक विद्याशाखेसाठी एक अधिष्ठाता असेल, तो परिनियमान्वये विहित करण्यात येईल अशा रीतीने विद्यार्थी सदस्यांशिवाय तिच्या सदस्यांमधून विद्याशाखेकडून निवडण्यात येईल.

परंतु, विद्याशाखेच्या विद्यार्थी सदस्यांना अशा कोणत्याही निवडणुकीसाठी मत देण्याचा हक्क असेल.

(२) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता हा त्या विद्याशाखेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल व परिनियमांच्या, आदेशांच्या (Ordinances) व विनियमांच्या यथोचित पालनासाठी त्या विद्याशाखेच्या संबंधात जबाबदार असेल.

(३) अधिष्ठात्याचा पदावधी तीन वर्षांचा असेल.

(४) कोणतीही व्यक्ती लागोपाठच्या दोन पदावधींसाठी अधिष्ठात्याचे पद धारण करणार नाही.

कुलसचिव. १३. (१) कुलसचिव हा विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल आणि तो विधिसभेचा, कार्यकारी व विद्यापरिषदांचा व विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाचा, विद्यापीठ अध्यापक निवड समितीचा, आणि या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा इतर प्राधिकरणांचा आणि मंडळांचा सचिव म्हणून काम करील. याची नियुक्ती, या प्रयोजनार्थ रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कार्यकारी परिषदेकडून करण्यात येईल. त्याची अर्हता, वित्तलब्धी व सेवेच्या अटी व शर्ती या परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(२) कुलसचिवाचे पद रिकामे होईल किंवा कुलसचिव हा आजारीपणामुळे किंवा अनुपस्थितीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तेव्हा, सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा मुदतीसाठी किंवा कुलसचिवाची यथोचित नियुक्ती होईपर्यंत, या दोन्हींपैकी जे अगोदर घडेल त्यानुसार, या प्रयोजनार्थ कार्यकारी परिषद नियुक्त करील अशा व्यक्तीकडून त्यावेळेपुरती अशी कर्तव्ये पार पाडण्यात येतील.

(३) (अ) कुलसचिवास, अध्यापकीय व विद्याविषयक कर्मचारी वगळून, कार्यकारी परिषदेच्या आदेशांमध्ये विनिर्दिष्ट करता येईल अशा कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे, व चौकशी चालू असेपर्यंत त्यांना निलंबित करणे, त्यांना ताकीद देणे किंवा त्यांच्यावर निंदाव्यंजक ठरावाची शास्ती लादणे किंवा त्यांची वेतनवाढ रोखणे या शक्ती असतील :

परंतु, त्या व्यक्तीच्या संबंधात करण्याचे योजिलेल्या कारवाईविरुद्ध कारण दर्शविण्याची वाजवी संधी संबंधित व्यक्तीस देण्यात आल्याशिवाय तिच्यावर अशी कोणतीही शास्ती लादण्यात येणार नाही ;

(ब) वर विनिर्दिष्ट केलेल्या शास्तींपैकी कोणतीही शास्ती लादणाऱ्या कुलसचिवाच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध कुलगुरूकडे अपील करता येईल ;

(क) कुलसचिवाच्या शक्तीबाहेरील शास्ती देणे आवश्यक असल्याचे चौकशीवरून दिसून येईल त्या बाबतीत, कुलसचिव, चौकशी संपल्यानंतर, आपल्या शिफारशीसह कुलगुरूकडे प्रतिवेदन सादर करील :

परंतु, कुलगुरूच्या कोणतीही शास्ती लादणाऱ्या आदेशाविरुद्ध कार्यकारी परिषदेकडे अपील करता येईल.

(४) कार्यकारी परिषदेच्या नियंत्रणास अधीन राहून, कुलसचिवास, विद्यापीठाच्या वतीने करार करण्याची, कागदपत्रांवर सही करण्याची व अभिलेख अधिप्रमाणित करण्याची शक्ती असेल.

(५) कुलसचिव,

(अ) कार्यकारी परिषदेकडून ज्याचा प्रभार कुलसचिवाकडे सोपविण्यात येईल अशा विद्यापीठाच्या अभिलेखांचा, सामायिक शिक्क्याचा व इतर मालमत्तेचा परिरक्षक म्हणून काम करील ;

(ब) अधिसभा, कार्यकारी व विद्यापरिषदा आणि विद्यापीठाच्या प्राधिकरणांकडून नियुक्त करण्यात येतील अशी मंडळे व अशा समित्या यांच्या सर्व सभांची कार्यवृत्ते ठेवील ;

(क) कुलगुरूच्या नियंत्रणाधिन व निदेशाधिन, परिक्षा व इतर चाचणी परिक्षा यांचे यथायोजना करून त्या घेईल व त्यांचे निकाल जाहीर करील, आणि

(ड) कार्यकारी परिषदेकडून किंवा कुलगुरूकडून वेळोवेळी विहीत करण्यात येतील किंवा फर्माविण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

१४. (१) वित्त अधिकारी हा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल; त्याची नियुक्ती कार्यकारी परिषदेकडून करण्यात येईल. वित्त अधिकारी.

(२) त्या प्रयोजनार्थ रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून, कार्यकारी परिषद ठरवील अशा मुदतीसाठी व अशा अटींवर व शर्तींवर, वित्त अधिकारी म्हणून एका व्यक्तीची नियुक्ती करील.

(३) वित्त अधिकाऱ्याचे पद रिकामे होईल किंवा वित्त अधिकारी हा आजारीपणामुळे किंवा अनुपस्थितीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तेव्हा, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी किंवा वित्त अधिकाऱ्याची यथोचित नियुक्ती होईपर्यंत, या दोन्हीपैकी जे अगोदर घडेल त्यानुसार कुलगुरू या प्रयोजनार्थ नियुक्त करील अशा व्यक्तीकडून त्या वेळेपुरती अशी कर्तव्ये पार पाडण्यात येतील.

(४) वित्त अधिकारी कुलसचिवास सहाय्य करील व तो कुलसचिवाच्या सर्वसाधारण नियंत्रणाधीन असेल. आपल्या शक्तींचा वापर करताना व आपली कर्तव्ये पार पाडताना, वित्त अधिकारी—

(अ) विद्यापीठांच्या निधीवर सर्वसाधारण देखरेख ठेवील व विद्यापीठाच्या आर्थिक धोरणाबद्दल विद्यापीठास सल्ला देईल;

(ब) विश्वस्तव्यवस्था व दान करण्यात आलेली मालमत्ता यासह, विद्यापीठाच्या उद्दिष्टांपैकी कोणत्याही उद्दिष्टांच्या पुष्ट्यर्थ, मालमत्ता धारण करून त्या गुंतवील व त्यांचे व्यवस्थापन करील;

(क) वर्षातील आवर्ती व अनावर्ती खर्च वित्त समितीने निश्चित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक झालेला नाही, तसेच ज्यांसाठी पैसे मंजूर करण्यात किंवा नेमून देण्यात आले असतील, त्याच प्रयोजनांसाठी, सर्व पैसे खर्च करण्यात आलेले आहेत, याबद्दल खात्री करून घेईल;

(ड) पुढील वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे व विद्यापीठाचा अर्थसंकल्प तयार करून तो कार्यकारी परिषदेस सादर करण्यासाठी जबाबदार असेल;

(इ) रोख रक्कम व बँकेतील शिल्लक रकमा आणि गुंतवणुका यांवर सतत लक्ष ठेवील;

(फ) उत्पन्नाच्या वसुलीवर लक्ष ठेवील व वसुलीसाठी अनुसरण्यात येणाऱ्या पद्धतीसंबंधी सल्ला देईल;

(ग) विद्यापीठाच्या लेख्यांची नियमितपणे लेखापरीक्षा करून घेईल;

(ह) इमारती, जमीन व साधनसामग्री यांची नोंदणीपुस्तके अद्यावत ठेवण्यात आलेली आहेत, तसेच सर्व कार्यालये, महाविद्यालये, कर्मशाळा व भांडारे यांमधील साधनसामग्री व इतर वापरले जाणारे साहित्य, यांच्या साठ्याची तपासणी करण्यात आली आहे, यांवर लक्ष ठेवील;

(आय) अनधिकृत खर्च व इतर वित्तीय अनियमितता याबद्दल स्पष्टीकरण देण्यास फर्मावण्याबद्दल कुलसचिवामार्फत कार्यकारी परिषदेस सुचवील व कसूर केलेल्या व्यक्तीविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल सुचवील;

(जे) आपल्या वित्तीय जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही माहिती व विवरण, विद्यापीठाच्या नियंत्रणाधीन कोणत्याही कार्यालयाकडून, केंद्राकडून, प्रयोगशाळेकडून, महाविद्यालयाकडून किंवा परिसंस्थेकडून मागवून घेईल;

(के) परिनियमान्वये विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये तसेच, कार्यकारी परिषदेकडून त्यास नेमून देण्यात येतील अशी वित्तविषयक इतर कामे पार पाडील.

१५. (१) ग्रंथपाल हा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व तो, कार्यकारी परिषदेकडून त्या प्रयोजनार्थ रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून नियुक्त करण्यात येईल आणि तो परिनियमान्वये विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करील व अशा शक्तींचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील. या प्रयोजनार्थ नियुक्त केलेल्या समितीकडून त्यास सहाय्य करण्यात येईल. ग्रंथपाल.

(२) ग्रंथपालाचे पद रिकामे होईल किंवा ग्रंथपाल हा आजारीपणामुळे किंवा अनुपस्थितीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे, आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तेव्हा सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी किंवा ग्रंथपालाची यथोचित नियुक्ती होईपर्यंत, या दोन्हींपैकी जे अगोदर घडेल त्यानुसार त्या प्रयोजनार्थ कार्यकारी परिषद नियुक्त करील अशा व्यक्तीकडून त्यावेळेपुरती अशी कर्तव्ये पार पाडण्यात येतील.

विद्यार्थी कल्याण संचालक. १६. (१) विद्यार्थी कल्याण संचालक हा, कार्यकारी परिषदेकडून, कुलगुरूच्या शिफारशीवरून, अधिव्याख्यात्यापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या अध्यापकांमधून नियुक्त करण्यात येईल.

(२) संचालक हा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व तो तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील; तसेच तो पुनर्नियुक्तीसाठी पात्र असेल:

परंतु, कार्यकारी परिषदेस, तिला आवश्यक वाटेल तर, अधिव्याख्यात्यापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या कोणत्याही अध्यापकास, त्याच्या स्वतःच्या कर्तव्यांशिवाय, विद्यार्थी कल्याण संचालकाची कर्तव्ये पार पाडण्यास नियुक्त करता येईल व अशा बाबतीत, कार्यकारी परिषदेस योग्य तो भत्ता मंजूर करता येईल.

(३) विद्यार्थी कल्याण संचालक, म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, अध्यापकांमधून नियुक्त करण्यात आली असेल तर, ती आपल्या मूळ पदावरील आपला धारणाधिकार चालू ठेवील व विद्यार्थी कल्याण संचालक म्हणून तिची नियुक्ती झाली नसती तर तिला अन्यथा जे फायदे मिळाले असते असे सर्व फायदे मिळण्यास ती पात्र असेल.

(४) विद्यार्थी कल्याण संचालकाचे पद रिकामे होईल किंवा विद्यार्थी कल्याण संचालक हा आजारीपणाच्या कारणामुळे किंवा अनुपस्थितीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तेव्हा, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी किंवा विद्यार्थी कल्याण संचालकाची यथोचित नियुक्ती होईपर्यंत, या दोन्हींपैकी जे अगोदर घडेल त्यानुसार या प्रयोजनार्थ कुलगुरू नियुक्त करील अशा व्यक्तीकडून त्यावेळेपुरती उक्त कर्तव्ये पार पाडण्यात येतील.

(५) विद्यार्थी कल्याण संचालकाच्या शक्ती व कर्तव्ये ही, परिनियमांन्वये विहित केल्याप्रमाणे असतील.

इतर अधिकारी. १७. कलम ८, खंड (सात) मध्ये निर्दिष्ट केलेल्या विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती आदेशांद्वारे (Ordinances) विनियमित होईल अशा रीतीने करण्यात येईल व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि शक्ती व कर्तव्ये ही, आदेशान्वये, (Ordinances) विनियमित करण्यात येतील अशी असतील.

नुकसानीबद्दल अधिकारी जबाबदार असणे. १८. (१) विद्यापीठाच्या हितसंबंधाचे योग्य प्रकारे रक्षण करण्यात येत आहे याबद्दल खात्री करून घेणे विद्यापीठाच्या प्रत्येक अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinance) किंवा विनियम यांच्या उपबंधांशी सुसंगत नाही अशा कोणत्याही कृत्यामुळे (सद्भावनेने असे कृत्य केले असेल त्याशिवाय) विद्यापीठाचे कोणतेही नुकसान किंवा कोणतीही हानी झाल्याचे आढळून येईल तर किंवा उपरोक्तप्रमाणे काम करण्यात कोणतीही कसूर झाल्यास किंवा त्याने हेतुःपुरस्सर हयगय किंवा कसूर केल्यास, परिनियमांन्वये विहित करण्यात येईल अशा पद्धतीनुसार असे कोणतेही नुकसान किंवा कोणतीही हानी त्याच्याकडून वसुलीयोग्य असेल.

## प्रकरण चार

### विद्यापीठाची प्राधिकरणे

विद्यापिठाची प्राधिकरणे १९. विद्यापीठाची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) अधिसभा,

(दोन) कार्यकारी परिषद,

(तीन) विद्यापरिषद,

(चार) विद्याशाखा,

(पाच) ज्ञानशाखा समन्वयविषयक अभ्यास मंडळे,

(सहा) अभ्यास मंडळे,

(सात) विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ,

(आठ) बहि:शाल अभ्यास मंडळ,

(नऊ) विद्यार्थी परिषद, आणि

(दहा) परिनियमांन्वये विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून नामोद्दिष्ट करण्यात येणारी विद्यापीठाची इतर मंडळे.

२०. (१) अधिसभा ही सर्व वित्तीय अंदाज आणि अर्थसंकल्पीय विनियोजनांसाठी मुख्य प्राधिकरण असेल व ती पुढील सदस्यांची मिळून होईल :— **अधिसभा.**

### पदसिद्ध सदस्य

(अ) (एक) कुलपती ;

(दोन) कुलगुरू ;

(तीन) शिक्षण संचालक, किंवा सहसंचालकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा त्याचा प्रतिनिधी ;

(चार) संचालक, उच्च शिक्षण ;

(पाच) संचालक, तंत्र शिक्षण, किंवा सहसंचालकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा त्याचा प्रतिनिधी ;

(सहा) कला संचालक, किंवा सहसंचालकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा त्याचा प्रतिनिधी ;

(सात) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, किंवा सहसंचालकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा त्याचा प्रतिनिधी ;

(आठ) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ ;

(नऊ) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कोणताही असल्यास ;

(दहा) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ, कोणतेही असल्यास ;

(अकरा) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(बारा) कुलसचिव ; आणि

(तेरा) विद्यार्थी कल्याण संचालक.

### निवडून दिलेले सदस्य

(ब) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे निवडून दिलेले पुढील सदस्य :—

(एक) संलग्न, घटक, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या एकूण संख्येच्या एकतृतियांश, आळीपाळीने किंवा असे पाच प्राचार्य यांपकी जी संख्या अधिक असेल तेवढे प्राचार्य. अशा आळीपाळीच्या क्रमाच्या प्रयोजनार्थ, महाविद्यालयांच्या नावांची सहा गटांमध्ये रचना करण्यात येईल, अशा गटांमधील महाविद्यालयांची संख्या शक्यतोवर समान असेल आणि अशा गटांपैकी एका गटाचे प्राचार्य पहिल्या वर्षानंतर निवृत्त होतील व सहा वर्षांच्या मुदतीच्या अखेरीस त्यांना एक वर्षाचा दुसरा अवधि मिळेल व परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीनुसार उर्वरित गटांमधील प्राचार्य हे दर दोन वर्षांनंतर निवृत्त होतील ;

(दोन) मान्यताप्राप्त संस्थांच्या प्रमुखांनी आपल्यामधून निवडलेला एका संस्थेचा प्रमुख ;

(तीन) निवडावयाचे पंचवीस अध्यापक, स्वायत्त, संचालित, घटक किंवा संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्रमुख किंवा विद्यापीठ विभाग प्रमुख खेरीज करून ; अध्यापकांनी आपल्यामधून या जागांचे विद्याशाखानिहाय वाटप केलेले असेल, परंतु मतदान हे सामाईक असेल.

(चार) उच्च माध्यमिक शाळांच्या प्रमुखांनी आपल्यामधून निवडलेले दोन प्रमुख ;

(पाच) उच्च माध्यमिक शिक्षकांनी आपल्यामधून निवडलेले दोन माध्यमिक शिक्षक ;

(सहा) परिनियमांन्वये विहित करण्यात आलेल्या रीतीने, विद्याशाखेच्या नोंदणीकृत स्नातकांनी आपणांमधून निवडून दिलेले, प्राचार्य किंवा अध्यापक नसतील असे पंचवीस नोंदणीकृत स्नातक, यांच्यापैकी दोन जागा अनुसूचित जातींसाठी राखून ठेवल्या जातील, दोन जागा अनुसूचित जमातींसाठी, आणि एक जागा अनुसूचित व भटक्या जमातींसाठी राखून ठेवल्या जातील, आणि २० सर्वसाधारण जागांची निवडणूक विद्याशाखानिहाय केली जाईल आणि राखीव जागांसाठी निवडणूक त्याचवेळी होईल ;

(सात) विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष व चिटणीस व विद्यार्थी कार्यकारी संघाने आपल्यामधून निवडलेले इतर दोन सदस्य ;

(आठ) महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडलेले चार सदस्य ;

(नऊ) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडलेला एक सदस्य ;

(दहा) विद्यापीठ अधिक्षेत्रातील प्रत्येक महानगरपालिकेच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडलेला एक प्रतिनिधी ;

(अकरा) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या जिल्ह्यांच्या प्रत्येक जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीचा अध्यक्ष व शिक्षण समितीचा अध्यक्ष ;

(बारा) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या जिल्ह्यांच्या नगरपालिका सभासदांनी आपल्यामधून निवडलेला प्रत्येक जिल्ह्याच्या नगरपालिकेचा एक प्रतिनिधी ;

(तेरा) परिनियमांन्वये विहित करण्यात येणाऱ्या, विद्यापीठ अधिक्षेत्रातील वाणिज्यिक व औद्योगिक संस्था यांचे, अशा संस्थांच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडलेले दोन प्रतिनिधी ;

(चौदा) परिनियमांन्वये विहित करण्यात येणाऱ्या, विद्यापीठ अधिक्षेत्रातील नोंदणीकृत श्रमिक संघांचा, अशा श्रमिकसंघांच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडलेला एक प्रतिनिधी ;

(पंधरा) परिनियमांन्वये विहित केल्याप्रमाणे, ज्या सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र एका किंवा अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारले आहे किंवा ज्यांचे अधिकृत भाग भांडवल रु. १० लाखांपेक्षा अधिक आहे अशा सहकारी संस्थांचा, त्या सहकारी संस्थांच्या सदस्यांमधील एक प्रतिनिधी ;

(सोळा) अशासकीय महाविद्यालयांचे व्यवस्थापन करणाऱ्या विश्वस्तव्यवस्थांच्या किंवा संस्थांच्या प्रतिनिधींच्या एकूण संख्येच्या एकतृतियांश प्रतिनिधी, आळीपाळीने, अशा आळीपाळीच्या क्रमाच्या प्रयोजनार्थ, या महाविद्यालयांचे संचालन करणाऱ्या, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या विश्वस्तव्यवस्थांच्या व संस्थांच्या नोंदणीबाबत अधिनियम, १८६० या अन्वये नोंदणी केलेल्या संस्थांच्या नावांची, सहा गटांमध्ये रचना करण्यात येईल ; अशा गटांमधील विश्वस्तव्यवस्थांची व परिसंस्थांची संख्या शक्यतोवर समान असेल. प्रत्येक विश्वस्तव्यवस्थेस किंवा संस्थेस मग तो एक किंवा त्यापेक्षा अधिक महाविद्यालये चालवीत असो फक्त एकच प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असेल ; व अशा गटांपैकी एका गटामधील व्यवस्थापनाचे प्रतिनिधी पहिल्या वर्षाच्या अखेरीस निवृत्त होतील व सहा वर्षांच्या मुदतीच्या अखेरीस त्यांना एक वर्षाचा दुसरा अवधी मिळेल व परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीनुसार उर्वरित गटांमधील प्रतिनिधी हे, दर दोन वर्षांनंतर, निवृत्त होतील;

(सतरा) विद्यापीठास किंवा विद्यापीठाच्या प्रयोजनार्थ, एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम किंवा एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या किंमतीची मालमत्ता विद्यापीठास देणगीदाखल देणाऱ्या वैयक्तिक देणगीदारांनी व संघटनेच्या नामनिर्दिष्ट व्यक्तींनी आपल्यामधून निवडलेले दोन प्रतिनिधी :

परंतु, खंड (ब), उप-खंड (एक) ते (सोळा) अन्वये निवडून दिलेली व्यक्ती, ती निवडणूक मंडळाचा किंवा यथास्थिति मंडळांची सदस्य असण्याचे बंद झाल्याबरोबर अधिसभेचा सदस्य असण्याचेही बंद होईल.

इतर सदस्य

(क) (एक) विख्यात शिक्षणतज्ज्ञ, विद्याव्यासंगी, समाज कार्यकर्ते, महिला व अल्पसंख्याक, आणि इतर मागास जमाती व वर्ग प्रतिनिधित्व न मिळालेले इतर हितसंबंधीधरून, कुलपतींनी नामनिर्दिष्ट केलेल्या पंधरा व्यक्ती ;

(दोन) कुलगुरूंने नामनिर्दिष्ट केलेला, अध्यापक, कुलसचिव, उप कुलसचिव, सहायक कुल-सचिव किंवा त्याच दर्जाचा इतर कोणताही अधिकारी यांशिवाय, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांमधील एक सदस्य ;

(तीन) परिनियमान्वये विहित करण्यात आल्याप्रमाणे नियुक्त करण्यात यावयाचे विद्याशाखेच्या मागील पदवी परीक्षांमध्ये आपली विद्याविषयक गुणवत्ता ज्यांनी दाखविली असेल व विद्यापीठाचे पूर्णकाल विद्यार्थी असतील असे, विद्याशाखेतील, आळीपाळीने चार विद्यार्थी ;

(चार) परिनियमान्वये विहित केल्याप्रमाणे, आळीपाळीने, नियुक्त करावयाचे, विद्यापीठ विभाग प्रमुखांच्या एकूण संख्येच्या एकचतुर्थांश एवढे प्रमुख किंवा असे पाच प्रमुख यांपैकी जी संख्या अधिक असेल तेवढे प्रमुख ;

(२) विद्यापीठाचा अध्यापकाशिवाय कोणताही कर्मचारी हा, अधिसभेच्या निवडणुकीसाठी पात्र असणार नाही.

(३) मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रमुखांशिवाय, निवडून देण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी हा सहा वर्षांचा असेल. अशा प्रमुखांचा पदावधी हा तीन वर्षांचा असेल.

(४) कुलपतीकडून किंवा कुलगुरूकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाच्या सदस्यांचा पदावधी हा तीन वर्षांचा असेल. प्राचार्यांचा व व्यवस्थापनांच्या प्रतिनिधींचा पदावधी हा दोन वर्षांचा असेल.

(५) विद्यार्थी सदस्य व विद्यापीठ विभाग प्रमुख यांचा पदावधी हा एक वर्षाचा असेल.

(६) कोणत्याही व्यक्तीस, लागोपाठच्या दोन मुदतीपेक्षा अधिक मुदतीसाठी अधिसभेचा सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट करण्यात येणार नाही.

अधिसभेच्या सभा.

२१. (१) कुलपती निश्चित करील अशा तारखांना, अधिसभेच्या वर्षातून दोनदा सभा घेण्यात येतील. या दोन सभांपैकी एक अधिसभेची वार्षिक सभा असेल.

(२) कुलगुरूस, ज्या ज्या वेळी योग्य वाटेल त्यावेळी अधिसभेची तिच्या कक्षेतील कोणत्याही विवक्षित बाबींवर किंवा बाबींवर विचारविनिमय करण्यासाठी विशेष सभा बोलवता येईल व अधिसभेच्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एकतृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी सही करून लेखी मागणी केली असता त्याने अशी सभा बोलाविली पाहिजे. लेखी मागणी केली असेल त्याबाबतीत, कुलगुरूस, मागणीपत्रात नमूद केलेली विवक्षित बाब किंवा बाबी अधिसभेच्या अर्थकक्षेत येते किंवा नाही याबद्दल निर्णय करण्याची शक्ती असेल.

अधिसभेच्या शक्ती व कर्तव्ये.

२२. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात आल्या असतील अशा शर्तींस अधीन राहून, अधिसभा पुढील शक्तींचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) संशोधनाच्या आणि ज्ञानाच्या वाढीसाठी व प्रसारासाठी म्हणून तिला योग्य वाटतील अशा विद्याशाखांमध्ये व अशा अभ्यासक्रमांमध्ये शिक्षणाची, अध्यापनाची व प्रशिक्षणाची तरतूद करण्यासाठी कार्यकारी परिषदेस शिफारस करणे ;

(दोन) महाविद्यालयांना आणि परिसंस्थांना अभ्यासाच्या विशेषीकरणाचे कार्य हाती घेणे शक्य होईल अशी तरतूद करण्यासाठी कार्यकारी परिषदेला शिफारस करणे आणि अध्यापन व संशोधन यासाठी, आवश्यक आणि इष्ट असेल त्याबाबतीत, सामाईक प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये आणि इतर साधनसामग्री यांचे आयोजन करून त्यांची तरतूद करणे ;

(तीन) महाविद्यालये, विभाग, कक्ष, वसतिगृहे आणि संशोधनाच्या व विशेषीकृत अभ्यासाच्या परिसंस्था स्थापन करण्यासंबंधी आणि त्यांच्या संचालनासंबंधी कार्यकारी परिषदेला शिफारस करणे ;

(चार) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करण्यासाठी कार्यकारी परिषदेला शिफारस करणे;

(पाच) पदव्या, पदविका आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याची कार्यकारी परिषदेला शिफारस करणे;

(सहा) विद्यापीठ विभाग, महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांना स्वायत्त दर्जा प्रदान करण्यासाठी कार्यकारी परिषदेला शिफारस करणे;

(सात) कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, सन्मान्य पदव्या किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे;

(आठ) परिनियम करणे, त्यात सुधारणा करणे किंवा ते रद्द करणे;

(नऊ) आदेश (Ordinance) व विनियमांवर विचार करणे व ते रद्द करणे किंवा ते परत पाठविणे, परंतु त्यात सुधारणा न करणे;

(दहा) वार्षिक प्रतिवृत्ते विचारात घेणे आणि त्यावरील ठराव संमत करणे.

(अकरा) विद्यापीठाचे वार्षिक लेखे व अशा लेख्यांचे लेखापरीक्षा अहवाल विचारात घेणे, त्यावर तिला योग्य वाटतील असे ठराव संमत करणे;

(बारा) कार्यकारी परिषदेकडून तिच्यापुढे मांडण्यात आलेले वार्षिक वित्तीय अंदाज विचारात घेणे आणि असे अंदाज अंशतः किंवा पूर्णतः आणि तिला योग्य वाटतील अशा फेरबदलांसह, कोणतेही असल्यास, संमत करणे;

(तेरा) विद्यापीठ लेखा समितीकडून सादर करण्यात आलेली प्रतिवेदने विचारात घेणे आणि त्यावर तिला योग्य वाटेल अशी कार्यवाही करणे;

(चौदा) राज्य शासनाने शिफारस केलेल्या नामिकेमधून लेखा परीक्षकांची नेमणूक करणे;

(पंधरा) विद्यापीठाकडून संचालित अशा इतर कार्यक्रमासाठी तरतूद करण्याची आणि अनुदान देण्याची कार्यकारी परिषदेला शिफारस करणे;

(सोळा) शक्य असेल तेथे कलम ४, खंड (११) अन्वये तरतूद करण्यासाठी कार्यकारी परिषदेस शिफारस करणे;

(सतरा) विद्यापीठाची धोरणे आणि कार्यक्रम यांचे वेळोवेळी पुनरीक्षण करणे आणि विद्यापीठाची सुधारणा आणि विकास यांसाठी उपाय सुचविणे;

(अठरा) शासकीय आणि सार्वजनिक उपक्रमामधील सेवा प्रवेशासाठी स्पर्धा करणाऱ्या उमेदवारांच्या प्रशिक्षणाची तरतूद करण्यासाठी उपाय व मार्ग यांची शिफारस करणे;

(एकोणीस) हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinances) आणि विनियम याद्वारे तिला प्रदान करण्यात येतील किंवा तिच्यावर लादण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करणे आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(२) अधिसभेच्या सभेची ज्या सदस्य संख्येने गणपूर्ती होईल ती संख्या, सभेच्या वेळी अनुसरण्यात यावयाच्या कार्यपद्धतीचे आणि कामकाज चालविण्याचे नियम, ज्या मुदतीमध्ये सभा बोलावण्यात येईल ती मुदत आणि अशा इतर बाबी परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे असतील.

कार्यकारी परिषद. २३. (१) कार्यकारी परिषद ही, विद्यापीठाचे मुख्य कार्यकारी प्राधिकरण असेल आणि ती पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष;

(दोन) कुलपतीची एक नामनिर्देशित व्यक्ती;

(तीन) उच्च शिक्षण संचालक किंवा सह संचालकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा, त्याचा प्रतिनिधी;

(चार) संचालक, तंत्र शिक्षण किंवा सह संचालकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा त्याचा प्रतिनिधी;

(पाच) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, किंवा सह संचालकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा त्याचा प्रतिनिधी ;

(सहा) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, विद्यापीठ विभागांच्या प्रमुखांनी आपल्यामधून निवडून दिलेला एक विद्यापीठ विभाग प्रमुख ;

(सात) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले दोन प्राचार्य ;

(आठ) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले, प्राचार्य आणि विद्यापीठ विभाग प्रमुख यांव्यतिरिक्त, दोन अध्यापक ;

(नऊ) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेल्या, प्राचार्य, अध्यापक आणि विद्यार्थी सदस्य यांव्यतिरिक्त, सात व्यक्ती ;

(दहा) विद्याशाखांच्या अधिष्ठात्यांनी, आपल्यामधून निवडून दिलेला एक अधिष्ठाता ; आणि

(अकरा) परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने, विद्याशाखांचे किंवा विद्याशाखांच्या गटांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, विद्यापरिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेल्या, तीन व्यक्ती :

परंतु खंड (सहा) ते (अकरा) खाली निवडून आलेल्या सदस्यांचे तो विद्यापीठ विभागाचा प्रमुख किंवा अधिसभेचा किंवा विद्यापरिषदेचा सदस्य असल्याचे किंवा यथास्थिति अधिष्ठाता असण्याचे बंद होईल तर, असा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल.

(२) अध्यापकाव्यतिरिक्त, विद्यापीठाचा कोणताही कर्मचारी, कार्यकारी परिषदेवर निवडून येण्यास पात्र असणार नाही.

(३) निवडून आलेल्या आणि नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी, तीन वर्षांचा असेल.

(४) कार्यकारी परिषदेवर निवडून आलेला किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला एखादा सदस्य, परिषदेच्या परवानगीशिवाय, तिच्या लागोपाठच्या तीन सभांना अनुपस्थित राहील तर, त्याचे पद रिकामे झाले असल्याचे समजण्यात येईल.

(५) कार्यकारी परिषदेच्या सभेची जितक्या सदस्यांनी गणपूर्ती होईल ती संख्या, सभेच्या वेळी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचे आणि कामकाज चालविण्याचे नियम, ज्या मुदतीमध्ये सभा बोलावण्यात येईल ती मुदत आणि अशा इतर बाबी परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील.

(६) कोणतीही व्यक्ती, लागोपाठच्या दोनपेक्षा जास्त मुदतीसाठी, कार्यकारी परिषदेचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात येणार नाही किंवा ती अशा मुदतीनंतर असा सदस्य म्हणून चालू राहणार नाही.

**कार्यकारी परिषदेच्या शक्ती व कर्तव्ये.**

२४. (१) या अधिनियमाच्या उपबंधाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन, कार्यकारी परिषद पुढील शक्तींचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) तिला योग्य वाटेल अशा अध्ययन शाखा व अभ्यासक्रम यांच्या शिक्षणाची, अध्यापनाची, मार्गदर्शनाची व प्रशिक्षणाची आणि संशोधनासाठी आणि ज्ञानाच्या वाढीसाठी व प्रसारासाठी तरतूद करणे ;

(दोन) ज्या योगे महाविद्यालयांना आणि परिसंस्थांना अभ्यासाचे विशेषीकरण करणे शक्य होईल अशी तरतूद करणे आणि अध्यापनासाठी व संशोधनासाठी सामाईक प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये आणि इतर साधनसामग्री यांची आयोजना करणे व आवश्यक आणि इष्ट असेल तेव्हा त्याबाबत तरतूद करणे ;

(तीन) महाविद्यालये, विभाग, कक्ष, वसतिगृहे, व्यायामशाळा आणि संशोधनाच्या व विशेषीकृत अभ्यासाच्या परिसंस्था स्थापन करणे व चालविणे ;

(चार) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करणे ;

(पाच) विद्यापरिषदेच्या व अधिसभेच्या शिफारशीवरून, विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना स्वायत्त दर्जा प्रदान करणे ;

(सहा) आदेश (Ordinances) करणे, त्यात सुधारणा करणे किंवा ते रद्द करणे व परिनियमांचे मसुदे तयार करून त्यावर तिला योग्य वाटतील अशा शिफारशी अधिसभेस करणे ;

(सात) विद्यापरिषदेने केलेले कोणतेही विनियम स्वीकारणे, नाकारणे किंवा ते परत पाठविणे ;

(आठ) विद्यापीठाची मालमत्ता व निधी धारण करणे, त्यांचे नियंत्रण व प्रशासन करणे ;

(नऊ) हा अधिनियम व परिनियम यांद्वारे किंवा तदन्वये तिला नेमून दिलेल्या शक्तींचा वापर करताना किंवा कर्तव्ये पार पाडताना, विद्यापीठाच्या वतीने करार करणे, त्यात फेरबदल करणे, ते पार पाडणे व रद्द करणे ;

(दहा) विद्यापीठाच्या सामाईक शिक्क्याचा नमुना ठरविणे व त्याची अभिरक्षा आणि त्याचा उपयोग यांसंबंधी तरतूद करणे ;

(अकरा) विशिष्ट प्रयोजनांसाठी विद्यापीठाच्या स्वाधीन करण्यात आलेल्या निधींचे प्रशासन करणे ;

(बारा) विद्यापीठाची वार्षिक वित्तीय अंदाजपत्रके तयार करणे ;

(तेरा) विद्यापीठाचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती, जागा, फर्निचर, उपकरणे व इतर साधने यांची तरतूद करणे ;

(चौदा) विद्यापीठाच्या वतीने विश्वस्त निधी, मृत्युपत्रित देणग्या, देणग्या आणि विद्यापीठाकडे हस्तांतरित झालेली कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता स्वीकारणे ;

(पंधरा) विद्यापीठाच्या वतीने कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता, विक्रीद्वारे, पट्ट्याद्वारे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करणे ;

(सोळा) विद्यापीठाचा पैसा, हिशेब, गुंतवणुका, मालमत्ता, कामकाज आणि इतर सर्व प्रशासकीय कामकाज यांच्यासंबंधी व्यवस्था ठेवणे व त्यांचे नियमन करणे व विद्यापीठ व महाविद्यालय विकास वित्त महामंडळ स्थापन करण्यात येईल तेव्हा त्यात दाखल होण्यासंबंधीचा निर्णय घेणे ;

(सतरा) विद्यापीठाच्या वतीने कर्ज घेणे, कर्ज देणे किंवा गुंतविणे ;

(अठरा) कलम ४ चे खंड (३५) व (३६) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सेवा व कामे यांसाठी तरतूद करणे ;

(एकोणीस) आंतर-विद्याशाखा व क्षेत्रीय किंवा प्रादेशिक अभ्यासक्रम यांसाठी तरतूद करणे ;

(वीस) विद्यापीठाने चालविलेली महाविद्यालये, विभाग, संशोधनाच्या किंवा विशेषीकृत अभ्यासाच्या परिसंस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये, कक्ष, वसतिगृहे व व्यायाम शाळा यांची व्यवस्था ठेवणे ;

(एकवीस) तिला आवश्यक वाटेल तर व तेव्हा, विद्यापीठाच्या अध्यापकांसाठी व इतर कर्मचाऱ्यांसाठी राहण्याच्या जागेची तरतूद करणे ;

(बावीस) विद्यापीठ विभाग व महाविद्यालयांमधील पदव्युत्तर विभाग यांच्या विद्याविषयक कार्यांचे आणि गरजांचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने त्यांच्या तपासणीसंबंधीची व्यवस्था करणे ;

(तेवीस) महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था, कक्ष आणि वसतिगृहे यांच्या विद्याविषयक कार्यांचे आणि गरजांचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने त्यांच्या तपासणीचा निदेश देणे, कार्यक्षमता राखली जावी म्हणून आणि विद्यार्थ्यांनी पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्याकरिता तसेच त्यांच्या अध्यापकांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या यथोचित अटी व शर्ती यांसंबंधी आवश्यक असेल त्या बाबतीत अनुदेश देणे, अशा अनुदेशांची अवज्ञा होईल त्या प्रसंगी, त्यांचे संलग्नीकरण किंवा त्यांची मान्यता यांच्या संबंधातील शर्तींमध्ये फेरबदल करण्यासंबंधी किंवा त्यास योग्य वाटेल अशी अन्य उपाययोजना करण्यासंबंधी शिफारस करणे ;

(चोवीस) महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था या योग्य प्रकारे चालविणे व त्यांचे कामकाज व त्यांची वित्तव्यवस्था यासंबंधीच्या कोणत्याही बाबीच्या संबंधात चौकशी करविणे ;

(पंचवीस) महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, कक्ष आणि वसतिगृहे यांच्याकडून प्रतिवृत्ते, विवरणे व इतर माहिती मागविणे ;

(सव्वीस) परिनियमाद्वारे, विहित करण्यात आल्या असतील अशा सन्मान्य पदव्या व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याविषयी अधिसभेस शिफारस करणे ;

(सत्तावीस) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, त्यांची राहण्याची व्यवस्था, वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख ठेवणे व नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे आरोग्य व सर्वसाधारण कल्याण यांच्या संवर्धनासाठी तरतूद करणे ;

(अठ्ठावीस) अधिछात्रवृत्त्य, प्रवासी अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या, विद्यार्थीवेतने, पदके व पारितोषिके देणे ;

(एकोणतीस) विद्यापीठाचे अधिकारी व अध्यापक यांची नियुक्ती करणे, निरनिराळ्या वर्गांच्या अध्यापकांच्या अर्हतांसह त्यांच्या अर्हता विहित करणे, तसेच अध्यापकांच्या विशिष्ट पदासंबंधीची जादा अर्हता, कोणतीही असल्यास, विहित करणे, त्यांच्या वित्तलब्धी निश्चित करणे आणि त्यांच्या सेवेच्या व शिस्तीच्या अटी व शर्ती यांच्या व्याख्या करणे व आवश्यक असेल त्या बाबतीत त्यांची कर्तव्ये निश्चित करणे ;

(तीस) विद्यापीठाचे अधिकारी व अध्यापक याशिवाय इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे, त्यांच्या अर्हता विहित करणे, त्यांच्या वित्तलब्धी निश्चित करणे व त्यांच्या सेवेच्या व शिस्तीच्या अटी व शर्ती यांची व्याख्या करणे आणि आवश्यक असेल त्या बाबतीत त्यांची कर्तव्ये निश्चित करणे ;

(एकतीस) महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या कर्मचारीवर्गामधील कर्मचाऱ्यास विद्यापीठाचा एक अध्यापक म्हणून मान्यता देणे किंवा अशी मान्यता काढून घेणे ;

(बत्तीस) परीक्षक व नियामक नेमणे व आवश्यक असेल त्या बाबतीत त्यांना काढून टाकणे, त्यांची वित्तलब्धी आणि फी, प्रवास व इतर भत्ते निश्चित करणे आणि विद्यापीठाच्या परीक्षा व इतर चाचणी परीक्षा यथोचित रीत्या घेण्याची व त्यांचे निकाल वेळीच प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे ;

(तेहेतीस) गैरप्रकारांच्या प्रसंगी, परीक्षा अंशत: किंवा पूर्णत: रद्द करणे व अशा गैरप्रकारांबद्दल अपराधी असल्याचे आढळून आलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध किंवा व्यक्तींच्या गटाविरुद्ध किंवा परिसंस्थांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(चौतीस) आवश्यक असेल त्या बाबतीत कोणत्याही परीक्षांसाठी असलेल्या उमेदवारांसह, विद्यापीठात नाव नोंदलेल्या विद्यार्थ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(पस्तीस) आवश्यक असेल त्या बाबतीत कोणत्याही परीक्षेसाठी समवेक्षक, परीक्षक व इतर कर्मचारी म्हणून नेमलेल्या व्यक्तींविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(छत्तीस) महाविद्यालयांना संलग्न करून घेण्यासाठी अधिसभेकडे शिफारस करणे ;

(सदतीस) आदेशाद्वारे (Ordinances) नियमित करण्यात येईल अशी फी व इतर आकार हे निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ते स्वीकारणे ;

(अडतीस) आवश्यक असेल त्या बाबतीत आणि तेव्हा, विद्यापीठांच्या सवलतींचे संवर्धन करण्यासाठी म्हणून महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस यथोचित नोटीस देऊन, महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील सवलतींचे अधिग्रहण करणे ;

(एकोणचाळीस) हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinance) व विनियम यांन्वये तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करणे व तिच्यावर लादण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

(चाळीस) ज्याकरिता या अधिनियमात किंवा परिनियमात अन्यथा कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांच्या सर्व शक्तींचा व या अधिनियमांच्या किंवा परिनियमांच्या, आदेशांच्या आणि विनियमांच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक आहेत अशा इतर सर्व शक्तींचा वापर करणे ;

(एकेचाळीस) कुलपतींच्या मान्यतेच्या अधीन, तिला योग्य वाटतील अशा आपल्या शक्तींपैकी कोणत्याही शक्ती (आदेश करण्यासंबंधीची शक्ती वगळून) कुलगुरु, कुलसचिव किंवा वित्त अधिकारी यास किंवा विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यास किंवा त्याने नियुक्त केलेल्या समितीस प्रदान करणे.

(२) कार्यकारी परिषद पोट-कलम (१) च्या खंड (चौदा) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेच्या स्वीकृतीसंबंधीच्या किंवा हस्तांतरणासंबंधीच्या सर्व गोष्टी अधिसभेस कळवील.

(३) विद्यापरिषदेशी विचारविनिमय करून असेल त्याशिवाय, कार्यकारी परिषदेकडून पोट-कलम (१) चे खंड (एक) ते (पाच) आणि खंड (एकोणतीस) ते (बतीस) यांखालील शक्तींचा वापर करण्यात येणार नाही व कर्तव्य पार पाडण्यात येणार नाहीत.

(४) कार्यकारी परिषद, अधिसभेच्या मंजुरीशिवाय, कोणत्याही स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण करणार नाही.

(५) कार्यकारी परिषदेस, आदेशाद्वारे (Ordinances) आपली प्रशासकीय कामे पार पाडण्यासाठी समित्या नेमता येतील आणि त्यांची रचना, मुदत, कामे व कार्यपद्धती निश्चित करता येतील.

विद्यापरिषद. २५. (१) विद्यापरिषद ही विद्यापीठाचे प्रमुख विद्या प्राधिकरण असेल आणि ती पुढील सदस्यांची मिळून होईल :—

पदसिद्ध सदस्य

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष ;

(दोन) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(तीन) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे आळीपाळीने, विद्यापीठ विभाग प्रमुखांच्या एकूण संख्येच्या १/३ संख्या ;

(चार) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ;

(पाच) अभ्यास मंडळाचे अध्यक्ष ;

(सहा) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे आळीपाळीने, महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या एकूण संख्येच्या एक-षष्ठांश संख्या ;

(सात) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे आवश्यक असल्यास, आळीपाळीने दोनपेक्षा अधिक नसतील इतके मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्रमुख ;

(आठ) कुलसचिव ;

(नऊ) ग्रंथपाल ;

(दहा) संचालक, विद्यार्थी कल्याण ; आणि

(अकरा) संचालक, बहि:शाल अभ्यास मंडळ, कोणताही असल्यास.

इतर सदस्य

(एक) महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठ विभागांचे प्रमुख व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्रमुख यांव्यतिरिक्त विद्यापरिषदेने अध्यापकांमधून स्वीकृत करून घ्यावयाचे प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन अध्यापक ;

(दोन) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे दर दोन वर्षांनी, आळीपाळीने, विद्यापीठ विभागातील प्रपाठकांमधून एक प्रपाठक आणि अधिव्याख्यात्यांमधून एक अधिव्याख्याता ;

(तीन) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे तीनपेक्षा अधिक नसतील इतके विख्यात विद्याव्यासंगी ;

(चार) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे बहि:शाल अभ्यास मंडळाचा एक प्रतिनिधी ;

(२) अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांचा पदावधी तीन वर्षे असेल.

(३) कोणत्याही व्यक्तीस, लागोपाठच्या दोन पदावधींपेक्षा अधिक कालावधीसाठी विद्यापरिषदेचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात येणार नाही किंवा ती असा सदस्य असल्याचे चालू राहणार नाही.

(४) विद्यापरिषदेच्या सभेची गणपूर्ती, सभेत अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचे आणि कामकाज चालविण्याचे नियम, ज्या मुदतीत सभा बोलवावयाची ती मुदत आणि अशा इतर बाबी या परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील.

२६. (१) विद्यापीठातील अध्यापनाचा, संशोधनाचा व परीक्षांचा दर्जा राखण्याच्या बाबतीत, विद्यापरिषदेचे नियंत्रण राहील व ती त्याचे सर्वसाधारण नियमन करील, तसेच ती त्याबद्दल जबाबदार राहील. विद्यापरिषदेच्या शक्ती व कर्तव्ये.

(२) पूर्ववर्ती उपबंधांच्या सामान्यतेस बाध येऊ न देता परंतु हा अधिनियम, परिनियम व आदेश (ordinance) यांद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येणाऱ्या शर्तीस अधीन राहून, विद्यापरिषद पुढील शक्तींचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) अभ्यासक्रम ठरविण्याबाबत विनियम करणे ;

(दोन) महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील विशेष अभ्यासक्रम किंवा विषयांची विभागणी यासंबंधात विनियम करणे ;

(तीन) विद्याशाखांना विषय वाटून देण्यासंबंधी सूचना करणे आणि विद्याशाखांवर आपल्या सदस्यांना नेमून देणे ;

(चार) महाविद्यालये, विभाग, संशोधन व विशेषीकृत अभ्यासाच्या परिसंस्था, ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि संग्रहालये स्थापन करण्याची सूचना करणे ;

(पाच) विद्यापीठास आवश्यक असलेल्या प्राध्यापकांच्या, प्रपाठकांच्या, अधिव्याख्यात्यांच्या आणि इतर कोणत्याही अध्यापकांच्या जागा निर्माण करण्यासंबंधी सूचना करणे व त्यांची कर्तव्ये विहित करणे ;

(सहा) अधिछात्रवृत्त्या, प्रवासी अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या, विद्यार्थीवेतने, पदके आणि पारितोषिके सुरू करण्याबाबत सूचना करणे आणि ती देण्याबाबत विनियम करणे ;

(सात) विद्यापीठाच्या परीक्षांसाठी आणि ज्या शर्तींवर विद्यार्थ्यांना अशा परीक्षांस बसता येईल त्या शर्तींसाठी विनियम करणे ;

(आठ) समान दर्जाच्या परीक्षा विहित करण्यासाठी विनियम करणे ;

(नऊ) पदवी, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी याकरिता अर्हता ठरविण्यासाठी मान्य अभ्यासक्रमांतून सूट देण्याची रीत विहित करण्यासाठी विनियम करणे ;

(दहा) विद्यापीठाच्या विद्याविषयक धोरणांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे आणि शिक्षणाच्या पद्धती, महाविद्यालयांमधील अध्यापनातील सहकार्य, संशोधनाचे मूल्यांकन आणि विद्याविषयक दर्जातील सुधारणा यासंबंधी आवश्यक असेल त्याबाबतीत निदेश देणे ;

(अकरा) आंतर-शाखा समन्वय साधणे, आणि आंतर-शाखा तत्त्वावर मोठ्या योजना हाती घेण्यासाठी समित्या किंवा मंडळे नियुक्त करणे ;

(बारा) विद्यापीठाच्या विद्यमान अभ्यासक्रमांची उपयुक्तता व व्यवहार्यता यांचे पुनर्विलोकन करण्यासाठी व नवीन ज्ञानाच्या दृष्टीने त्यांचे पुनर्विलोकन करण्याच्या किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याच्या इष्टतेच्या किंवा आवश्यकतेच्या दृष्टीने समित्या किंवा मंडळे यांची नियुक्ती करणे ;

(तेरा) आंतर-विद्याशाखा व क्षेत्रीय किंवा प्रादेशिक अभ्यास चालवण्यासाठी सूचना करणे;

(चौदा) विद्यापीठाचे विद्याविषयक काम यथोचितरीत्या होण्यासाठी विद्यार्थ्यांना दिलेल्या फी-विषयक सवलती धरून त्यांची शिस्त, निवास, सामूहिक जीवन व उपस्थिती यासंबंधात परिनियम व आदेश (Ordinances) यांच्याशी सुसंगत असे तिला योग्य वाटतील असे इतर विनियम करणे;

(पंधरा) हा अधिनियम, परिनियम, आदेश (ordinances) आणि विनियम यान्वये तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करणे व सोपवण्यात येतील अशी इतर कर्तव्ये बजावणे; आणि

(सोळा) सामान्यत: सर्व विद्याविषयक बाबींवर विद्यापीठाला सल्ला देणे.

विद्याशाखा व त्यांची कामे. २७. (१) विद्यापीठात परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील इतक्या विद्याशाखा असतील.

(२) परिनियमांद्वारे व विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर असेल ते खेरीज करून कोणतीही विद्याशाखा स्थापन करण्यात येणार नाही किंवा तिचे विभाजन किंवा एकत्रीकरण करण्यात येणार नाही किंवा ती काढून टाकण्यात येणार नाही.

(३) विद्याशाखेत, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे विषय असतील.

(४) या विद्याशाखेत पुढील सदस्य असतील :—

(एक) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, आधीच कोणत्याही विद्याशाखेचे सदस्य नसलेले आणि विद्यापरिषदेने संबंधित विद्याशाखेवर नेमलेले, अधिसभा आणि विद्यापरिषद यांचे सदस्य;

(दोन) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे निवडण्यात येतील असे, विद्याशाखेत समाविष्ट असलेल्या विषयांच्या प्रत्येक अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व चार सदस्य; आणि

(तीन) विद्याशाखेच्या निकटपूर्वीच्या पदवी परीक्षेत ज्यांनी विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली असेल आणि जे विद्यापीठातील पूर्णकाल अभ्यासक्रमाचा अभ्यास करीत असतील असे, परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे नियुक्त करावयाचे प्रत्येक विद्याशाखेतून दोन विद्यार्थी.

(५) विद्यार्थी प्रतिनिधींव्यतिरिक्त, विद्याशाखेच्या इतर सदस्यांचा पदावधी तीन वर्षे राहील. विद्यार्थी प्रतिनिधींचा पदावधी एक वर्षाचा राहील.

(६) प्रत्येक विद्याशाखेच्या शक्ती व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) आपल्या अधिष्ठात्याची निवड करणे;

(दोन) कार्यकारी परिषदेने किंवा विद्यापरिषदेने किंवा विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाने तिच्याकडे संदर्भासाठी पाठविलेल्या कोणत्याही बाबीचा विचार करणे व प्रतिवृत्त तयार करणे;

(तीन) विद्याशाखेत समाविष्ट असलेली कोणतीही बाब विचारासाठी आणि प्रतिवृत्तासाठी अभ्यास मंडळाकडे पाठविणे;

(चार) अभ्यास मंडळाने तिच्याकडे पाठवलेले कोणतेही प्रतिवृत्त किंवा शिफारस यावर विचार करणे;

(पाच) तिच्या कक्षेतील कोणत्याही प्रयोजनासाठी, विद्याशाखेची समिती नियुक्त करणे;

(सहा) सामायिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी, विद्याशाखेची किंवा विद्याशाखेच्या समितीची आणि कोणत्याही इतर विद्याशाखेची किंवा तिच्या समितीशी संयुक्तपणे सभा घेणे;

(सात) कार्यकारी किंवा विद्यापरिषदेला किंवा विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाला विद्याशाखेच्या कामाच्या संबंधात कोणतीही शिफारस करणे.

ज्ञानशाखा समन्वय-विषयक अभ्यास मंडळे. २८. (१) विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येईल असे ज्ञानशाखा समन्वयविषयक अभ्यास मंडळ किंवा अशी मंडळे असतील व त्यामध्ये, पुढील व्यक्तींचा समावेश होईल :—

(एक) संबंधित विषयांच्या अभ्यास मंडळांचे अध्यक्ष;

(दोन) संबंधित विषयांतील विद्यापीठ विभागांचे प्रमुख;

(तीन) परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे, विद्यापरिषदेकडून स्वीकृत करण्यात आलेले सदस्य;

(२) पोट-कलम (१) च्या खंड (तीन) खालील सदस्यांचा पदावधी तीन वर्षे राहील.

(३) मंडळाचे किंवा मंडळांचे सदस्य आपल्यामधून अध्यक्षाची निवड करतील.

(४) ज्ञानशाखा समन्वयविषयक अभ्यास मंडळाच्या शक्ती व कर्तव्ये व त्यांच्या सभांची कार्यपद्धती ही, परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

२९. (१) प्रत्येक विषय किंवा विषयांचा गट यांसाठी परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे अभ्यास मंडळ असेल. अभ्यास मंडळे.

(२) या मंडळात पुढील व्यक्तींचा समावेश होईल :—

(एक) संबंधित विद्यापीठ विभागांचे प्रमुख;

(दोन) परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, विशेष, मुख्य किंवा वरिष्ठ पातळीवरील विषय शिकविणाऱ्या महाविद्यालयांमधील विभाग प्रमुखांनी आपल्यामधून निवडून द्यावयाचे दहा विभाग प्रमुख;

(तीन) या विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही विद्यापीठात किंवा कोणत्याही महाविद्यालयात अध्यापक नसतील अशा त्या विषयाचे विशेष ज्ञान असणाऱ्या तीन व्यक्ती; व

(चार) विभाग प्रमुख नसणाऱ्या अध्यापकांमधून मंडळाने स्वीकृत करावयाच्या दोन व्यक्ती.

(३) पोट-कलम (२) च्या खंड (दोन), (तीन) व (चार) खालील सदस्यांचा पदावधी तीन वर्षे राहील.

(४) मंडळाचे सदस्य आपल्यामधून अध्यक्षाची निवड करतील.

(५) या अभ्यास मंडळाच्या शक्ती व कर्तव्ये ही पुढीलप्रमाणे असतील:—

(एक) कार्यकारी किंवा विद्यापरिषदेने किंवा विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाने किंवा संबंधित विद्याशाखेने किंवा अन्यप्रकारे मंडळाकडे निर्दिष्ट केलेल्या, त्यांच्या कक्षेतील विषयाच्या किंवा विषयगटांच्या अभ्यासक्रमांबद्दल शिफारस करणे;

(दोन) पाठ्यपुस्तकांसह, अशा अभ्यासक्रमांसाठी पुस्तकांची शिफारस करणे;

(तीन) वेचे किंवा साहित्य संग्रह यांच्या रूपरेषेसह, कोणत्याही विषयाचे किंवा विषयांच्या गटाचे लेखक व इतर श्रेष्ठ ग्रंथकार यांच्या लेखनातील किंवा साहित्यातील वेचे किंवा साहित्यसंग्रह तयार करणे व ते प्रसिद्ध करणे आणि ते वेचे व साहित्यसंग्रह तसेच लेखकांची व श्रेष्ठ ग्रंथकारांची आणि साहित्यसंग्रह तयार करण्यासाठी मंडळाच्या मते ज्यांची नेमणूक करता येईल अशा व्यक्तींची नावे मान्यतेसाठी पाठवणे यासाठी विद्यापरिषदेस शिफारस करणे;

(चार) अभ्यासक्रमांमधील सुधारणांसंबंधी संबंधित विद्याशाखेस किंवा विद्याशाखांना लिहिणे; व

(पाच) संबंधित विषयातील किंवा विषयगटामधील परीक्षांच्या संबंधातील महत्त्वाच्या बाबी विद्यापरिषदेच्या किंवा यथास्थिती कार्यकारी परिषदेच्या निदर्शनास आणून देणे.

३०. (१) प्रत्येक अभ्यास मंडळासाठी एक सल्लागार समिती राहील, आणि ती पुढील सदस्यांची मिळून होईल:— अभ्यास मंडळासाठी सल्लागार समित्या.

(एक) कुलगुरुने नामनिर्देशित करावयाचा अभ्यासमंडळाचा अध्यक्ष व इतर चार सदस्य;

(दोन) परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे नियुक्त करावयाचे चार विद्यार्थी, यांपैकी, त्या वर्षाच्या पदवीपूर्व किंवा इंटरमिजिएट परीक्षेसाठी ज्यांनी विषयांत उक्त विषय घेतला असेल अशा विद्यार्थ्यांपैकी त्या वर्षाच्या पदवीपूर्व किंवा यथास्थिती इंटरमिजिएट परीक्षेत त्यांनी प्राप्त केलेल्या विद्याविषयक गुणवत्तेच्या आधारे निवडावयाचे दोन विद्यार्थी आणि पदवी परीक्षेतील त्यांच्या मुख्य, विशेष किंवा प्रमुख विषयात किंवा परिनियमांद्वारे समुद्र केल्याप्रमाणे, त्या वर्षीच्या पदवी परीक्षेत त्यांनी प्राप्त केलेल्या विद्याविषयक गुणवत्तेच्या आधारे निवडण्यात येतील व त्या विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम ज्यांनी चालू ठेवला असेल असे इतर दोन विद्यार्थी.

(२) नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी तीन वर्षे व विद्यार्थी सदस्यांचा पदावधी एक वर्ष राहील.

(३) मंडळाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीवर व त्याने समितीकडे निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीवर मंडळाला सल्ला देणे ही समितीची कामे असतील.

विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ—त्याची रचना.

३१. (१) प्रत्येक विद्याशाखेसाठी एक विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ असेल.

(२) हे मंडळ पुढील सदस्यांचे मिळून होईल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष ;

(दोन) विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(तीन) विद्याशाखेतील विद्यापीठ विभागांचे प्रमुख ;

(चार) विद्याशाखेतील मान्यताप्राप्त पदव्युत्तर परिसंस्थांचे संचालक ;

(पाच) विद्यापरिषदेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांमधून विद्यापरिषदेने निवडावयाचे विद्याशाखेतील दोन प्राचार्य ;

(सहा) परिषदेचे सदस्य असतील अशा अध्यापकांमधून त्या [ विद्यापरिषदेने निवडावयाचे ] त्या विद्याशाखेतील दोन अध्यापक ;

(सात) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, विद्यापीठ क्षेत्राबाहेरील पदव्युत्तर केंद्रांमधून प्रत्येक विषयाच्या पदव्युत्तर अध्यापकांनी आपल्यामधून निवडावयाचा अशा अध्यापकाचा एक प्रतिनिधी ;

(आठ) ज्यांचा विद्यापीठाशी संबंध नाही अशा व ज्यांच्यापैकी एकाकडे संशोधनविषयक अर्हता असेल अशी, कुलगुरुने नामनिर्देशित करावयाच्या दोन व्यक्ती ;

(नऊ) कुलगुरुने नामनिर्देशित करावयाचे दोन पदव्युत्तर विद्यार्थी त्यांपैकी एक संशोधन शाखेचा विद्यार्थी असेल ;

(३) कुलसचिव हा या मंडळाचा चिटणीस म्हणून काम करील.

(४) विद्यार्थी प्रतिनिधीव्यतिरिक्त निवडलेल्या व नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा राहील. विद्यार्थी सदस्याचा पदावधी एक वर्षाचा राहील.

विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळे यांच्या शक्ती व कर्तव्ये.

३२. (१) हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinance) व विनियम यांच्या उपबंधांस अधीन राहून, विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाला पदव्युत्तर पदवी आणि संशोधन पातळीवर शिक्षण, अध्यापन व प्रशिक्षण यांचे नियंत्रण, नियमन व समन्वय यासंबंधीची शक्ती असेल.

(२) विशेषत: आणि पूर्ववर्ती उपबंधाच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, मंडळ पुढील शक्तींचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) निरीक्षण समितीच्या अहवालांवर विचार करणे व कार्यकारी परिषदेकडे त्यावर शिफारशी करणे ;

(दोन) महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील पदव्युत्तर शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण, व संशोधन यांच्या संचालनाच्या संबंधात कार्यकारी परिषदेकडे शिफारशी करणे ;

(तीन) विद्यापीठाच्या वतीने अध्यापन करण्यासाठी त्या त्या विषयातील अध्यापकांच्या तपशीलवार आवश्यकतांच्या संबंधात कार्यकारी परिषदेस शिफारस करणे ;

(चार) शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण व संशोधन कार्यक्रम निश्चित करणे आणि मान्यताप्राप्त अध्यापकांना विद्यापीठाच्या वतीने जे काम हाती घेण्यासाठी फर्माविण्यात येईल अशा कामाचे स्वरूप व व्याप्ती नमूद करणे ;

(पाच) पुरविलेल्या सुविधांचा समन्वय साधणे व त्यांचे नियमन करणे आणि व्याख्याने, परिसंवाद, पाठ निर्देशन (ट्युटोरिअल्स), ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि अध्यापन व संशोधन यांची साधनसामग्री यासंबंधात पदवी महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी करावयाच्या खर्चासंबंधी कार्यकारी परिषदेला शिफारशी करणे ;

(सहा) प्रत्येक पदवी महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विद्यापीठाकडून दरवर्षी देण्यात यावयाचे निर्धारित अनुदान, कोणतेही असल्यास, त्याच्या रकमेसंबंधी कार्यकारी परिषदेकडे शिफारस करणे ;

(सात) शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी महाविद्यालयातील अध्यापनाच्या अनुपूर्तीकरता विद्यापीठाच्या अध्यापक वर्गातून प्रतिनियुक्तीवर अध्यापक पाठवण्यास कार्यकारी परिषदेकडे शिफारस करणे ;

(आठ) विविध पदव्यांसाठी संशोधन विषयांना व संशोधन पदव्यांसाठी इतर आवश्यक गोष्टींना मान्यता देणे ;

(नऊ) संशोधन पर्यवेक्षकांची नियुक्ती करणे ; आणि

(दहा) हा अधिनियम, परिनियम, आदेश (Ordinance) व विनियम यांद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात आल्या असतील अशा इतर शक्तींचा वापर करणे व अशी कर्तव्ये पार पाडणे.

३३. (१) एक बहि:शाल अभ्यास मंडळ असेल व ते पुढील सदस्यांचे मिळून होईल :— बहि:शाल अभ्यास मंडळ.

(एक) कुलगुरू अथवा त्यांची नामनिर्देशित व्यक्ती, पदसिद्ध अध्यक्ष ;

(दोन) कुलगुरूने नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य त्यांच्यापैकी किमान दोन ग्रामीण क्षेत्रातील रहिवाशी असतील ;

(तीन) उच्चतर शिक्षण संचालकाने नामनिर्देशित करावयाचा एक शिक्षण उप-संचालक;

(चार) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून निवडावयाचे तीन सदस्य ;

(पाच) विद्यापरिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडून द्यावयाचा, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य ;

(सहा) संचालक, बहि:शाल अभ्यास मंडळ, कोणताही असल्यास.

(२) नामनिर्देशित केलेल्या व निवडून दिलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा राहील ;

(३) बहि:शाल अभ्यास मंडळाच्या शक्ती व कर्तव्ये आणि त्याच्या सभांची कार्यपद्धती परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे राहील.

३४. (१) विद्यार्थ्यांची एक परिषद असेल, ती पुढील सदस्यांची मिळून होईल :— विद्यार्थी परिषद.

(एक) कुलगुरू, पदसिद्ध अध्यक्ष;

(दोन) विद्यार्थी कल्याण संचालक, पदसिद्ध कोषाध्यक्ष;

(तीन) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, महाविद्यालयातील किंवा यथास्थिती परिसंस्थेमधील प्रत्येक वर्गाच्या प्रतिनिधींचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाकडून निवडून दिलेला प्रत्येक महाविद्यालयामधील व मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील एक विद्यार्थी ;

(चार) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे निवडून दिलेला; विद्यापीठाच्या प्रत्येक अध्यापन विद्याशाखेतील एक विद्यार्थी ;

(पाच) मागील पदवी परीक्षेत विद्याविषयक गुणवत्ता दाखवली असून जो विद्यापीठातील पूर्ण वेळ अभ्यासक्रमाचा अभ्यास करतो असा, परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने नेमावयाचा प्रत्येक विद्याशाखेतील एक विद्यार्थी ;

(सहा) पुढील कार्यक्षेत्रामध्ये ज्यांनी आपले विशेष प्राविण्य दाखविले असेल (खाली उल्लेखिलेल्या चार कार्यक्षेत्रांमधील प्रत्येकामधून दोन) असे आठ विद्यार्थी :—

(१) क्रीडा ;

(२) राष्ट्रीय सेवा योजना ;

(३) राष्ट्रीय छात्रसेना ;

(४) सांस्कृतिक कार्य व कुलगुरूकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाच्या दोन विद्यार्थींनी.

(सात) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, कोणताही असल्यास.

परिषदेचे विद्यार्थी सदस्य, आपल्यामधून परिषदेचा सभापती व चिटणीस यांची निवड करतील.

(२) विद्यार्थी परिषदेकडून वेळोवेळी घेण्यात आलेल्या धोरणविषयक निर्णयांच्या कार्यान्वयनासाठी एक विद्यार्थी कार्यकारी संघ असेल, तो पुढील सदस्यांचा मिळून होईल :—

(एक) परिषदेचा सभापती, पदसिद्ध सभापती ;

(दोन) परिषदेचा चिटणीस, पदसिद्ध चिटणीस;

(तीन) विद्यार्थी कल्याण संचालक, पदसिद्ध कोषाध्यक्ष;

(चार) परिषदेच्या चौदा इतर सदस्यांपैकी चार सदस्य पोट-कलम (१), खंड (सहा) मध्ये उल्लेखिलेल्या चार कार्यक्षेत्रांपैकी प्रत्येकाचे प्रतिनिधित्व करतील व त्यांच्यापैकी एक विद्यार्थिनी असून परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, ती परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांकडून निवडून देण्यात येईल.

(३) पदसिद्ध सदस्यांशिवाय, परिषदेच्या सदस्यांचा पदावधी हा एक वर्षाचा असेल. पदसिद्ध कोषाध्यक्षाशिवाय, कार्यकारी संघाच्या सदस्यांचा पदावधी हा, परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी जेव्हा संपेल त्याच वेळी संपेल.

(४) परिषदेची व संघाची सभा भरवण्यासाठी लागणारी गणपूर्ती, सभेत अनुसरावयाचे कार्यपद्धतीविषयक आणि सभेचे कामकाज चालविण्यासंबंधीचे नियम, ज्या मुदतीत सभा बोलविण्यात येईल ती मुदत आणि अशा इतर बाबी परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असतील.

(५) विद्यार्थी परिषदेची कामे पुढीलप्रमाणे राहतील :—

(एक) विद्यार्थ्यांचे निरनिराळे संघ, संस्था व इतर संघटना यांच्याकडून चालविल्या जाणाऱ्या सर्व कार्यक्रमांवर देखरेख ठेवणे व त्यांचा समन्वय साधणे;

(दोन) संबंधित अर्थसंकल्पीय शीर्षाखाली हाती घ्यावयाच्या कार्यक्रमासाठीच्या वित्तीय नियत वाटपाच्या रकमांबाबत कार्यकारी परिषदेस शिफारस करणे;

(तीन) कार्यकारी परिषदेकडून मंजूर करण्यात आल्याप्रमाणे, विद्यार्थ्यांचे संघ, संस्था आणि इतर संघटना यांच्या निरनिराळ्या कार्यांसाठी पैशांचे वाटप करणे;

(चार) कार्यकारी परिषदेने निश्चित करावयाच्या तारखेपूर्वी, आपल्या सर्व कार्यांचे वार्षिक प्रतिवृत्त आपल्या लेख्यांच्या विवरणासह कार्यकारी परिषदेला सादर करणे;

(पाच) विद्यार्थ्यांचे सामूहिक जीवन अथवा त्यांचे कल्याण यावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही बाबीच्या संबंधात कार्यकारी परिषदेला शिफारशी करणे;

(सहा) विद्यमान शिक्षणाच्या सोयींच्या संबंधात कार्यकारी परिषदेस शिफारशी करणे.

**विद्यार्थी सदस्यत्वासाठी विवक्षित अर्हता.** ३५. कोणतीही व्यक्ती विद्यार्थी म्हणून तिचे नाव नोंदलेले असेल त्याशिवाय किंवा ती पंचवीस वर्षे वयाची झाल्यानंतर विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची किंवा समितीची विद्यार्थी सदस्य होण्यास किंवा असा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असणार नाही. कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा विद्यार्थी सदस्य तो सदस्य झाला त्यावेळी त्याचे ज्या विद्यापीठ परिक्षेसाठी नाव नोंदण्यात आले असेल अशा पुढील विद्यापीठ परीक्षेस बसण्यात कसूर करील किंवा ती परीक्षा उत्तीर्ण होणार नाही तर असा सदस्य असण्याचे बंद होईल.

**इतर विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे.** ३६. (१) विद्यापीठाचे काम पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी अधिसभेला वेळोवेळी आवश्यक वाटेल अशा इतर प्राधिकरणांची व मंडळांची परिनियमांद्वारे रचना करता येईल.

(२) अशी प्राधिकरणे व मंडळे यांच्या शक्ती व कर्तव्ये आणि त्यांच्या सभांची कार्यपद्धती ही परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

## प्रकरण पाच

### परिनियम, आदेश (Ordinances) आणि विनियम

**परिनियम—विषय.** ३७. या अधिनियमांद्वारे अथवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, अधिसभेला पुढे दिलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींची तरतूद करण्याकरता परिनियम करता येतील, जसे :—

(एक) सन्मान पदव्या प्रदान करणे ;

(दोन) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासाठी दीक्षांत समारंभ आयोजित करणे ;

(तीन) या अधिनियमान्वये उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांच्या शक्ती व कर्तव्ये ;

(चार) या अधिनियमान्वये उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या प्राधिकरणांची रचना, शक्ती व कर्तव्ये ;

(पाच) विभाग, महाविद्यालये, संशोधन परिसंस्था व विशेषीकृत अभ्यास संस्था, कक्ष व वसतिगृहे विद्यापीठाने सुरू करणे व त्यांचे परिरक्षण ;

(सहा) विश्वस्त निधी, मृत्युपत्रित देणग्या, देणग्या व स्थायीदाने यांचा स्वीकार व त्याची व्यवस्था ;

(सात) देणगीदारांकडून अधिसभेचे सदस्य निवडले जाण्याची रीत ;

(आठ) पदवीधरांची नोंदणी आणि नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीचे परिरक्षण ;

(नऊ) विद्यार्थी संघटनांची रचना व कार्यक्रम ;

(दहा) विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सभांची व त्यामधील कामकाज चालविण्यासंबंधातील कार्यपद्धती ;

(अकरा) महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण ;

(बारा) कार्यकारी परिषदेला ठरवता येईल अशा रीतीने व अशा प्रयोजनांसाठी राज्यातील इतर विद्यापीठांशी व इतर सांविधिक प्राधिकरणांशी सहयोग ;

(तेरा) जोड प्रकल्प हाती घेण्यासाठी इतर कोणत्याही विद्यापीठात किंवा संघटनेत काम करीत असलेल्या अध्यापकांची व इतर शैक्षणिक कर्मचारीवर्गाची विनिर्दिष्ट मुदतीसाठी नेमणूक ;

(चौदा) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता व सेवा यांची नियामक तत्वे ;

(पंधरा) विद्यापीठ विभाग, कक्ष, महाविद्यालये व परिसंस्था बंद करणे ;

(सोळा) विद्यापीठाचे अधिकारी, अध्यापक व इतर कर्मचारी यांची अर्हता, पदावधी, कर्तव्ये आणि सेवेच्या शर्ती;

(सतरा) निवृत्तिवेतन, विमा व भविष्यनिर्वाह निधी यासाठीच्या तरतुदी आणि सेवा समाप्तीची आणि शिस्तभंगाच्या कारवाईची रीत यांचा समावेश करून, अध्यापकांव्यतिरिक्त इतर विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती ;

(अठरा) परीक्षक व नियामक यांच्या नेमणुकीची व त्यांना काढून टाकण्याची आणि त्यांना द्यावयाची फी, वित्तलब्धी, प्रवास व इतर भत्ते निश्चित करण्याची पद्धती ;

(एकोणीस) लोकहितास्तव विद्यापीठाने एखाद्या महाविद्यालयाचे अथवा परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेणे आणि त्याकरिता द्यावयाच्या कोणत्याही प्रदानासह असे व्यवस्थापन हाती घेण्याच्या शर्ती ;

(वीस) विद्यापीठ विभाग, महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याच्या शर्ती ;

(एकवीस) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील किंवा करता येतील अशा इतर बाबी ; आणि

(बावीस) सामान्यत: अधिसभेला या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींच्या वापरासाठी किंवा तिजवर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी अधिसभेच्या मते ज्या बाबींची तरतूद करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबी.

३८. (१) अधिसभेस, यात यानंतर तरतूद करण्यात आलेल्या रीतीने, परिनियम करता येतील, त्यात सुधारणा करता येईल किंवा ते निरसित करता येतील. परिनियम करणे.

(२) अधिसभेस, एकतर तिच्या स्वत:च्या प्रस्तावानुसार किंवा कार्यकारी परिषदेच्या प्रस्तावावरून परिनियमांचा मसुदा विचारात घेता येईल. कार्यकारी परिषदेकडून तयार करण्यात न आलेल्या मसुद्याच्या बाबतीत, अधिसभा, तो मसुदा विचारात घेण्यापूर्वी, कार्यकारी परिषदेचे मत अजमावील :

परंतु, कार्यकारी परिषद तिला मसुदा मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत आपले मत कळविण्यात कसूर करील तर, अधिसभेला, मसुदा विचारात घेण्यासाठी कार्यवाही करता येईल.

(३) अधिसभेस, आवश्यक वाटेल तर, तिच्यापुढे विचारार्थ ठेवण्यात आलेल्या परिनियमाचा कोणताही मसुदा विचारात घेताना विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे, प्राधिकाऱ्याचे किंवा मंडळाचे मतसुद्धा मिळविता येईल :

परंतु, परिनियमाचा असा कोणताही मसुदा विद्याविषयक बाबींच्या संबंधात असेल त्याबाबतीत, अधिसभा, तो विचारात घेण्यापूर्वी विद्यापरिषदेचे मत मिळवील.

(४) अधिसभेकडून संमत करण्यात आलेला प्रत्येक परिनियम, कुलपतीस सादर करण्यात येईल, कुलपतीस तो परिनियम संमत करता येईल किंवा संमती रोखून धरता येईल किंवा परिनियम विचारार्थ अधिसभेकडे पुन्हा पाठविता येईल.

(५) अधिसभेने संमत केलेला कोणताही परिनियम, कुलपतीची संमती मिळेपर्यंत, विधिग्राह्य असणार नाही किंवा अंमलात येणार नाही.

आदेश—विषय. ३९. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करता येतील अशा शर्तींना अधीन राहून, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करण्याकरिता कार्यकारी परिषदेला आदेश करता येतील :—

(एक) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधि यांच्या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना ज्या शर्तींखाली प्रवेश देण्यात येईल त्या शर्ती ;

(दोन) विद्यापीठातील व महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना उपस्थित राहण्याकरिता विद्यार्थ्यांची नावे नोंदविण्यासाठी व परिक्षांना प्रवेश देण्यासाठी, पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधि प्राप्त करण्यासाठी आणि पदवीधरांच्या नोंदणीसाठी (शिकवणी फी व वसतिगृहाचा खर्च यासह) आकारावयाची फी; ही त्याच स्थानिक क्षेत्रातील महाविद्यालयांसाठी शक्य असेल तेथवर एकसारखी असेल ;

(तीन) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या निवासविषयक, वागणुकीविषयक व शिस्तविषयक शर्ती आणि पुढील गोष्टींचा समावेश करून, त्यांनी केलेल्या शिस्तभंगाबद्दल किंवा गैरवर्तणुकीबद्दल त्यांच्याविरुद्ध करावयाची शिस्तभंगाची कारवाई :—

(अ) एखाद्या परीक्षेत किंवा त्या परीक्षेच्या संबंधात स्वत: त्याने किंवा इतर कोणत्याही विद्यार्थ्याने अनुचित साधनांचा वापर करणे किंवा त्यासाठी अपप्रेरणा देणे ;

(ब) एखाद्या परीक्षेच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून करण्यात येणाऱ्या कोणत्याही अधिकृत चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्यास किंवा साक्ष देण्यास नकार देणे ;

(क) विद्यापीठाच्या आवारातील किंवा आवाराबाहेरील गैरशिस्तीची किंवा अन्यथा आक्षेपार्ह अशी वर्तणूक ;

(चार) विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांतील अध्यापकांच्या अर्हता व त्यांचे वर्गीकरण ;

(पाच) परीक्षकांच्या नेमणुका व त्यांची कर्तव्ये यांचे नियमन करणाऱ्या शर्ती ;

(सहा) परीक्षांचे संचालन आणि इतर चाचण्या व परीक्षकांनी उमेदवारांचे मूल्यमापन करावयाची किंवा यांची परीक्षा घ्यावयाची रीत ;

(सात) कक्ष व वसतिगृहे यांना मान्यता ;

(आठ) महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, कक्ष व वसतिगृहे यांची तपासणी ;

(नऊ) विद्यापीठाच्या अध्यापकांना मान्यता देणे आणि विद्यापीठात, महाविद्यालयांत आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांत शिकवण्यासाठी अर्हताप्राप्त म्हणून ज्या शर्तींच्या अधीन, व्यक्तींना मान्यता देता येईल त्या शर्ती ;

(दहा) विद्यापीठाकरिता अथवा विद्यापीठाच्यावतीने संविदा अथवा करार करून देण्याची पद्धती ;

(अकरा) विद्यार्थ्यांच्या बदलीच्या संबंधात महाविद्यालयांनी आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांनी पालन करावयाचे व अंमलात आणावयाचे नियम ;

(बारा) महाविद्यालयातील विद्यार्थी संघाच्या आणि इतर संघटनांच्या शक्ती व कर्तव्ये ;

(तेरा) या अधिनियमाद्वारे अथवा परिनियमांद्वारे किंवा तदन्वये ज्या बाबींची आदेशान्वये (ordinance) तरतूद करावयाची असेल किंवा करता येईल अशा सर्व बाबी; आणि

(चौदा) हा अधिनियम अथवा परिनियम याद्वारे अथवा तदन्वये कार्यकारी परिषदेला प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी अथवा कार्यकारी परिषदेवर लादण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी कार्यकारी परिषदेच्या मते, सर्वसाधारणपणे ज्या बाबींची तरतूद करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबी.

४०. (१) कार्यकारी परिषदेस, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने आदेश करता येतील, त्यांत सुधारणा करता येईल किंवा ते निरसित करता येतील. आदेश—ते करणे.

(२) निकट पूर्ववर्ती कलमाच्या खंड (एक) ते (सहा) व (नऊ) यांत निर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित किंवा विद्यापीठातील अध्यापनाचा व परीक्षांचा दर्जा राखण्यासंबंधीच्या इतर कोणत्याही बाबीशी संबंधित असा कोणताही आदेश (ordinance) त्याचा मसुदा विद्यापरिषदेकडून प्रस्तावित करण्यात आल्याखेरीज, कार्यकारी परिषद, करणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये, विद्यापरिषदेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या कोणत्याही मसुद्यात सुधारणा करण्याची शक्ती कार्यकारी परिषदेला असणार नाही. परंतु, कार्यकारी परिषदेला तो नाकारता येईल किंवा कार्यकारी परिषदेला सुचवता येतील अशा कोणत्याही सुधारणांसहित तो अंशतः किंवा पूर्णतः पुनर्विचार करण्यासाठी विद्यापरिषदेकडे परत पाठवता येईल.

(४) कार्यकारी परिषदेकडून करण्यात आलेले सर्व आदेश ती निदेश देईल त्या तारखेपासून अंमलात येतील, परंतु, अशा प्रकारे करण्यात आलेला प्रत्येक आदेश दोन आठवड्यांच्या आत कुलपतीला सादर करण्यात येईल. आदेश मिळाल्यापासून चार आठवड्यांच्या आत अशा कोणत्याही आदेशाचे प्रवर्तन निलंबित करण्याचा निदेश देण्याची शक्ती कुलपतीला असेल आणि तो त्याबद्दलचा आपला आक्षेप, शक्य तितक्या लवकर, कार्यकारी, परिषदेला कळवील. कार्यकारी परिषदेचा अभिप्राय कळल्यानंतर, कुलपतीला एकतर आदेश निलंबित करणारा आदेश मागे घेता येईल किंवा आदेश नामंजूर करता येईल आणि त्याचा निर्णय अंतिम राहील.

४१. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींस आणि कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्या परिषदेस हा अधिनियम, परिनियम व आदेश यांस सुसंगत असे विनियम करून त्यांत हा अधिनियम, परिनियम किंवा आदेश याद्वारे किंवा तदन्वये ज्या बाबींची विनियमांद्वारे तरतूद करावयाची असेल किंवा करता येईल त्या सर्व किंवा कोणत्याही बाबींची आणि केवळ त्यांच्याशीच संबंधित असलेल्या इतर सर्व बाबींची तरतूद करता येईल. विनियम व नियम.

(२) कार्यकारी परिषदेच्या पूर्वमान्यतेस अधीन राहून, कोणत्याही प्राधिकरणाला अथवा मंडळाला पुढील गोष्टींकरिता हा अधिनियम, परिनियम, आदेश आणि विनियम यांच्याशी सुसंगत असे नियम करता येतील :—

(अ) आपल्या सभांच्या तारखा व वेळा आणि त्यात चालावयाचे कामकाज यासंबंधीची नोटीस देणे ;

(ब) आपल्या सभांच्या कार्यपद्धतीचे आणि सभांच्या गणपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सदस्यांची संख्या यांचे नियमन करणे, आणि अशा सभांच्या कामकाजाचा अभिलेख ठेवणे ;

(क) हा अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम याद्वारे किंवा तदन्वये नियमांद्वारे ज्या बाबी ठरावयाच्या असतील अथवा ठरवता येतील अशा सर्व बाबींची तरतूद करणे; आणि

(ड) अशा प्राधिकरणाशी किंवा मंडळाशीच केवळ संबंधित असतील अशा इतर सर्व बाबींची तरतूद करणे.

(३) असे नियम कार्यकारी परिषदेस सादर करण्यात येतील आणि ते करणाऱ्या संबंधित प्राधिकरणाचे किंवा मंडळाचे मत विचारात घेतल्यानंतर, तिला योग्य वाटेल अशा रीतीने अशा नियमामध्ये तिला सुधारणा करता येतील किंवा त्यांचे विलोपन करता येईल.

## प्रकरण सहा

### महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती

महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती विहित करणारे परिनियम करणे.

४२. (१) या अधिनियमात इतरत्र अंतर्भूत असलेल्या परिनियम करण्याच्या कोणत्याही शक्तीस हानी न पोचविता, अधिसभा, राज्य शासनाकडून किंवा विद्यापीठाकडून व्यवस्था पाहण्यात येणारी किंवा चालविण्यात येणारी महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थाखेरीज करून, इतर संलग्न महाविद्यालयामधील आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक व इतर कर्मचारी यांच्यासंबंधात पुढील बाबींची तरतूद करण्यासाठी परिनियम करील :—

(अ) निरनिराळ्या पदांसाठी आवश्यक असणाऱ्या अर्हता;

(ब) सर्व स्थायी पदांच्या बाबतीतील परिवीक्षेचा व स्थायीकरणाचा वाजवी कालावधी ;

(क) पदांच्या प्रत्येक प्रवर्गाने पार पाडावयाची कर्तव्ये आणि त्यांना नेमून द्यावयाचा कार्यभार ;

(ड) सेवेची सुरक्षितता ;

(इ) नैतिक अध:पाताचा अंतर्भाव होणाऱ्या फौजदारी अपराधाबद्दल संबंधित कर्मचाऱ्यास दोषी ठरविले असेल त्याशिवाय, चौकशी करण्यासाठी व्यवस्थापनाने अनुसरावयाची कार्यपद्धती धरून सर्व शिस्तविषयक बाबी ;

(फ) वेतन, भत्ते आणि सेवानिवृत्युत्तर लाभांसह इतर लाभ;

(ग) सेवेच्या इतर शर्ती;

(२) ज्याला बडतर्फ करण्यात आले आहे, काढून टाकण्यात आले आहे किंवा ज्याचा दर्जा कमी करण्यात आला आहे अशा कोणत्याही कायम कर्मचाऱ्यास, व्यवस्थापनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य, संबंधित कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेला एक सदस्य आणि कार्यकारी परिषदेने नियुक्त केलेला एक पंच यांनी मिळून बनलेल्या लवाद न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा हक्क असेल. न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

## प्रकरण सात

### संलग्नीकरण आणि मान्यता

महाविद्यालयांचे संलग्नीकरण.

४३. (१) विद्यापीठ अधिक्षेत्रातील उच्च शिक्षणाची सोय नसलेल्या व अविकसित क्षेत्रांतील गरजा विचारात घेऊन, उच्चतर शिक्षणाच्या सोयींचे समान वाटप सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी उच्चतर शिक्षणाच्या संस्था स्थापन करण्याकरिता राज्य शासनाच्या मान्यतेने विद्यापीठाकडून तयार करण्यात येतील अशा शैक्षणिक विकासासंबंधीच्या योजनेनुसार, कोणतेही नवीन महाविद्यालय सुरू करण्याची गरज ही कार्यकारी परिषदेकडून निश्चित करण्यात येईल.

(२) अशा योजनेनुरूप नसलेले एखादे नवीन महाविद्यालय सुरू करण्यासंबंधीचा कोणताही अर्ज राज्य शासनाच्या मान्यतेशिवाय, कार्यकारी परिषदेकडून विचारात घेतला जाणार नाही.

(३) विद्यापीठाशी संलग्नीकरणासाठी अर्ज करणारे महाविद्यालय, त्याबाबतीत करण्यात येतील अशा आदेशाद्वारे (Ordinance) निश्चित केलेल्या कालमर्यादेत कुलसचिवांकडे अर्ज करील आणि कार्यकारी परिषद व विद्यापरिषद यांची अशी खात्री करून देईल की—

(अ) महाविद्यालयाने द्यावयाच्या उद्देशित शिक्षणाचा प्रकार, जवळपासच्या ठिकाणी त्याच प्रकारच्या शिक्षणाच्या विद्यमान सोयी आणि त्या ठिकाणाची योग्यायोग्यता विचारात घेऊन महाविद्यालय तेथील गरज पुरी करील;

(ब) ज्याच्यासाठी संलग्नीकरण मिळवावयाचे असेल अशा महाविद्यालयासाठी व्यवस्थापनाकडून एक स्वतंत्र व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येईल, अशा समितीत सातपेक्षा कमी नाही आणि पंधरापेक्षा अधिक नाही इतक्या सदस्यांचा समावेश असेल. यापैकी प्राचार्य (हा समितीचा चिटणीससुद्धा असेल) एक सदस्य असेल, महाविद्यालयातील अध्यापकांनी आपल्यामधून निवडून दिलेले दोन अध्यापक व इतर दोन सदस्य असतील आणि महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी आपल्यामधून निवडून दिलेला एक कर्मचारी (अध्यापक नसलेला) हा एक सदस्य असेल. अशा रीतीने निवडून आलेले सदस्य ते निवडून आल्याच्या तारखेपासून तीन वर्षे मुदतीपर्यंत पद धारण करतील. स्थानिक व्यवस्थापन समिती महाविद्यालयाच्या जमाखर्चाचे खरे व योग्य लेखे ठेवील आणि व्यवस्थापन नेमून देईल अशी तिची इतर कर्तव्ये व कामे असतील. स्थानिक व्यवस्थापन समिती व्यवस्थापनाचे नियंत्रण व पर्यवेक्षण यास अधीन राहून अशी कर्तव्ये पार पाडील व कामे करील ;

(क) जर महाविद्यालयाचे व्यवस्थापन व परिरक्षण राज्य शासनाकडून करण्यात येईल तर, वरील खंड (ब) मध्ये काहीही असले तरी स्थानिक व्यवस्थापन समितीऐवजी महाविद्यालयाची एक सल्लागार समिती असेल, उक्त समिती, पंधरापेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल व तीमध्ये, महाविद्यालयाचा प्राचार्य व इतर दोन अध्यापक व कार्यकारी परिषदेने नामनिर्दिष्ट केलेले विद्यापीठाचे दोन अध्यापक समाविष्ट असतील ;

(ड) अध्यापकवर्गाची संख्या, त्यांच्या अर्हता व त्यांच्या वित्तलब्धी आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या अशा असतील की, त्यामुळे महाविद्यालयाने कार्यक्षमरीत्या हाती घ्यावयाचा अभ्यासक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण यांसाठी यथोचित तरतूद करता येईल;

(इ) ज्या इमारतीत महाविद्यालयाचे काम चालणार असेल ती इमारत योग्य आहे आणि आईवडील किंवा पालक यांच्याजवळ न राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या, महाविद्यालयातील किंवा महाविद्यालयाने मान्यता दिलेल्या निवासगृहांतील, निवासासाठी आणि विद्यार्थ्यांवरील पर्यवेक्षण व त्यांचे कल्याण यांसाठी आदेशाशी (ordinances) अनुरूप असेल अशी तरतूद करण्यात येईल ;

(फ) ग्रंथालयासाठी यथोचित तरतूद करण्यात आली आहे किंवा वाजवी मुदतीत करण्यात येईल;

(ग) प्रायोगिक विज्ञानाच्या कोणत्याही शाखेबाबत संलग्नीकरणाची मागणी केली असेल त्याबाबतीत, योग्यरीत्या सुसज्जित प्रयोगशाळा किंवा संग्रहालय यासह विज्ञानाच्या त्या शाखेत शिक्षण देण्यासाठी म्हणून, परिनियम, आदेश (ordinances) व विनियम यांस अनुरूप अशी व्यवस्था करण्यात आली आहे किंवा ती वाजवी मुदतीत करण्यात येईल;

(ह) परिस्थितीनुसार शक्य तेथवर प्राचार्यांची व अध्यापकवर्गापैकी काही व्यक्तींची, महाविद्यालयात किंवा त्याच्याजवळ किंवा विद्यार्थ्यांच्या निवासासाठी दिलेल्या जागेत निवासव्यवस्था वाजवी मुदतीत करण्यात येईल ;

(आय) महाविद्यालयाची वित्तीय साधने अशी आहेत की, त्यामुळे महाविद्यालयाचे कामकाज सतत चालू व कार्यक्षम राहण्यासाठी यथोचित तरतूद होऊ शकेल;

(जे) विद्यार्थ्यांवर आकारण्यात आलेले फी चे दर हे विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या दरांनुसार आहेत;

(के) महाविद्यालय अशी हमी देते की, राज्य शासनाने संलग्नीकरणास मंजुरी दिल्यास, कार्यकारी परिषदेच्या पूर्व परवानगीशिवाय, महाविद्यालय आपल्या व्यवस्थापनात बदल किंवा त्याचे हस्तांतरण करणार नाही आणि अध्यापक वर्गातील सर्व बदल आणि ज्या बदलामुळे पुऱ्या करण्यात आल्या नसतील किंवा पुऱ्या करण्यात येत असतील अशा उपरोक्त आवश्यक गोष्टींपैकी कोणतीही गोष्ट घडून येईल असे इतर सर्व बदल महाविद्यालय कळवील;

(ल) महाविद्यालय अशी हमी देते की, महाविद्यालयाचे अध्यापक व इतर कर्मचारी यांना भत्ते धरून देणे आवश्यक असलेल्या त्यांच्या वित्तलब्धी परिनियमान्वये वेळोवेळी मंजूर करण्यात येतील अशा वेतनश्रेणी व असे भत्ते यांनुसार आहेत व राहतील आणि महाविद्यालयातील अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या अर्हता, पदावधीची सुरक्षितता शिस्तविषयकबाबी आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती विहित करणारे नियम हे अधिसभेने वेळोवेळी केलेल्या परिनियमांनुसार असतील;

(म) महाविद्यालय अशी हमी देते की, महामंडळाने द्यावयाचा व्याजाचा दर हा, कलम ७० चे पोट-कलम (५) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित बँकांपैकी कोणतीही बँक देत असेल त्या दरापेक्षा कमी नसेल तर, महाविद्यालय आपला असा निधी (भविष्य निर्वाह निधी आणि कायम निधी, कोणताही असल्यास, ते धरून) राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे, विद्यापीठ व महाविद्यालय विकास वित्त महामंडळ जेव्हा ते स्थापन करण्यात येईल तेव्हा त्या महामंडळाकडे ठेवील; आणि

(न) महाविद्यालय अशी हमी देते की, ते या अधिनियमाच्या उपबंधांचे आणि त्या अन्वये केलेले परिनियम, आदेश (ordinances), विनियम व नियम यांचे पालन करील.

(४) कार्यकारी परिषद मिळालेल्या अर्जांची छाननी करील व त्यांचा प्राधान्यक्रम ठरवील आणि त्यांचे निष्कर्ष मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठवील.

(५) अशी मान्यता मिळाल्यानंतर, कार्यकारी परिषद,—

(अ) पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या संबंधात आणि तिला आवश्यक व संबद्ध असल्याचे वाटेल अशा इतर बाबींच्या संबंधात, सक्षम व्यक्तीस किंवा तिने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना, स्थानिक चौकशी करण्याचा निदेश देईल;

(ब) तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करील; आणि

(क) अशा चौकशीचा निष्कर्ष विचारात घेईल, आणि विद्या परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, अर्ज अंशतः किंवा पूर्णतः मंजूर करण्यात यावा किंवा फेटाळण्यात यावा याबाबतचे आपले मत नमूद करील.

(६) कुलसचिव, अर्ज आणि विद्या परिषदेची व कार्यकारी परिषदेची सर्व कार्यवृत्ते अधिसभेकडे सादर करील आणि अधिसभा, तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर तिचा निर्णय नमूद करील व तो सर्व कार्यवृत्तांसह, अर्ज अंशतः किंवा पूर्णतः मंजूर करण्यासंबंधीच्या किंवा तो नाकारण्यासंबंधीच्या निर्णयार्थ राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(७) अर्ज किंवा त्याचा कोणताही भाग मंजूर करण्यात येईल त्याबाबतीत, राज्य शासनाच्या आदेशामध्ये, ज्या शिक्षणक्रमांच्या संबंधात महाविद्यालयाचे संलग्नीकरण करावयाचे असेल ते शिक्षणक्रम, अशा प्रत्येक शिक्षणक्रमामध्ये प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची कमाल संख्या आणि ज्या मुदतीसाठी संलग्नीकरण मंजूर करण्यात आले असेल ती मुदत विनिर्दिष्ट करण्यात येईल आणि अर्ज किंवा त्याचा भाग फेटाळण्यात येईल त्याबाबतीत, तो फेटाळण्याची कारणे नमूद करण्यात येतील.

(८) राज्य शासनाने आपला आदेश काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, कुलसचिव, अर्ज, पोट-कलमे (३) ते (६) अन्वये त्यावर करण्यात आलेली कार्यवाही आणि त्याच्याशी संबंधित असलेली सर्व कार्यवृत्ते यांच्यासंबंधातील संपूर्ण प्रतिवृत्त, कार्यकारी परिषदेकडे आणि विद्या परिषदेकडे पाठवील.

(९) पोट-कलम (३) खालील अर्ज पोट-कलम (७) अन्वये आदेश काढण्यापूर्वी कोणत्याही वेळी मागे घेता येईल.

संलग्नीकरणाच्या मुदतीत वाढ करणे आणि ते चालू ठेवणे.

४४. ज्या शिक्षणक्रमांच्या संबंधात महाविद्यालयाचे संलग्नीकरण करण्यात आले असेल त्या शिक्षणक्रमांमध्ये भर घालण्याची, किंवा ते संलग्नीकरण चालू ठेवण्याची एखाद्या महाविद्यालयाची इच्छा असेल त्याबाबतीत, निकटपूर्ववर्ती कलमामध्ये विहित केलेली कार्यपद्धती, शक्य असेल तेथवर अनुसरण्यात येईल.

स्थायी संलग्नीकरण.

४५. कोणतेही महाविद्यालय सतत सहा वर्षे चालू नसेल आणि त्या महाविद्यालयाने संलग्नीकरणाच्या सर्व शर्ती पूर्ण केलेल्या नसतील, आणि विद्यापीठाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेला विद्याविषयक व प्रशासकीय दर्जा प्राप्त केलेला नसेल तर, त्यास स्थायी स्वरूपात संलग्न करून घेण्यात येणार नाही.

४६. (१) कार्यकारी परिषदेस, विद्या परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, महाविद्यालया-परिसंस्थेला व्यतिरिक्त संशोधनाच्या किंवा विशेषीकृत अभ्यासक्रमाच्या कोणत्याही परिसंस्थेस, मान्यताप्राप्त मान्यता. परिसंस्था म्हणून मान्यता देण्याची शक्ती असेल.

(२) संशोधनाचे काम करणारी अथवा विशेषीकृत अभ्यासक्रम शिकवणारी एखादी परिसंस्था कुलसचिवाकडे अर्ज पाठवील आणि त्यात पुढील बाबींच्यासंबंधात पूर्ण माहिती देईल :—

(अ) व्यवस्थापक मंडळाची रचना व त्यातील व्यक्ती ;

(ब) ज्यांसाठी मान्यता मागण्यात आली आहे ते विषय व अभ्यासक्रम ;

(क) जागा, साधनसामग्री व ज्यांच्यासाठी तरतूद करण्यात आली आहे किंवा करण्याचे योजिले आहे त्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(ड) कर्मचारीवर्गाची संख्या, त्यांच्या अर्हता व वित्तलब्धी आणि त्यांच्याकडून करण्यात आले असल्यास, कोणतेही संशोधनपर कार्य ; आणि

(ई) आकारलेली किंवा आकारण्याचे योजलेली फी, आणि इमारती व साधनसामग्री यांवरील भांडवली खर्चासाठी व परिसंस्था कायम चालू राहण्यासाठी व तिच्या कार्यक्षम कामकाजासाठी केलेली तरतूद.

(३) असा अर्ज विचारात घेण्यापूर्वी, कार्यकारी परिषदेस, तिला आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती मागविता येईल.

(४) कार्यकारी परिषदेने अर्ज विचारात घेण्याचे ठरविले असल्यास, तिला सक्षम व्यक्तीकडून अथवा याबाबत तिने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून स्थानिक चौकशी करण्याचा निदेश देता येईल. अशा स्थानिक चौकशीच्या अहवालाचा विचार केल्यानंतर, आणि तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, कार्यकारी परिषद, विद्या परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, अर्ज अंशतः किंवा पूर्णतः मंजूर करील किंवा तो फेटाळून लावील. अर्जाला किंवा त्याच्या कोणत्याही भागाला मंजुरी देण्यात येईल त्याबाबतीत, ज्यासाठी परिसंस्थेला मान्यता देण्यात आली असेल ते विषय अथवा पाठ्यक्रम कार्यकारी परिषद विनिर्दिष्ट करील आणि त्याबाबतचे प्रतिवृत्त विद्या-परिषदेस व अधिसभेस, त्यांच्या लगतपुढील सभांमध्ये सादर करील. अर्ज किंवा त्याचा कोणताही भाग फेटाळण्यात येईल त्याबाबतीत, अशा प्रकारे तो फेटाळण्याची कारणे प्रतिवृत्तात नमूद करण्यात येतील.

(५) कोणतीही परिसंस्था सतत सहा वर्षे चालू नसेल आणि विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेला विद्याविषयक व प्रशासकीय दर्जा तिने प्राप्त करून तो राखलेला नसेल तर, तिला स्थायी मान्यता देण्यात येणार नाही.

४७. (१) महाविद्यालयाची किंवा परिसंस्थेची कार्यक्षमता अजमावून पाहणे शक्य व्हावे यासाठी कार्यकारी परिषदेला, विद्या परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, जी प्रतिवृत्ते, विवरणे व इतर माहिती आवश्यक असेल ती प्रत्येक संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था पुरवील.

महाविद्यालयांची व परिसंस्थांची तपासणी व प्रतिवृत्ते.

(२) कार्यकारी परिषद, याबाबतीत तिने प्राधिकृत केलेल्या सक्षम व्यक्तींच्या समितीद्वारे अशा प्रत्येक महाविद्यालयाची अथवा परिसंस्थेची दर दोन वर्षांतून निदान एकदा तपासणी करण्याची व्यवस्था करील.

(३) कार्यकारी परिषदेस, यथास्थिती कलम ४३ चे पोट-कलम (३) किंवा कलम ४६ चे पोट-कलम (२) यांमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही बाबींच्यासंबंधात तिला आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करण्यास, अशा प्रकारे तपासणी केलेल्या कोणत्याही महाविद्यालयास, अथवा परिसंस्थेस फर्माविता येईल.

विद्यमान संलग्न महाविद्यालयांनी स्थानिक व्यवस्थापन समित्या किंवा सल्लागार समित्या यांची रचना करणे.

४८. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी जे महाविद्यालय संलग्न महाविद्यालय होते आणि या अधिनियमान्वये जे विद्यापीठाशी संलग्न असल्याचे मानण्यात आले आहे असे प्रत्येक महाविद्यालय, अशा प्रारंभापासून सहा महिने मुदतीच्या आत, कलम ४३ चे पोट-कलम (३) याचा खंड (ब) किंवा यथास्थिती खंड (क) याअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, महाविद्यालयासाठी स्थानिक व्यवस्थापन समितीची किंवा सल्लागार समितीची रचना करील.

संलग्नीकरण काढून घेणे.

४९. (१) जर महाविद्यालय कलम ४३, पोट-कलम (३) च्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात कसूर करील अथवा आपल्या संलग्नीकरणाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर करील अथवा विद्यापीठाच्या हितसंबंधास किंवा त्याच्या दर्जाला बाधा पोहोचेल अशा रीतीने ते चालवण्यात येईल तर, संलग्नीकरणाद्वारे महाविद्यालयाला प्रदान करण्यात आलेले अधिकार अंशत: किंवा पूर्णत: काढून घेण्यात येतील अथवा त्यांत फेरबदल करण्यात येतील.

(२) असे अधिकार काढून घेण्यासंबंधीचा अथवा त्यांत फेरबदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव फक्त कार्यकारी परिषदेतच मांडण्यात येईल आणि असा प्रस्ताव मांडण्याचा ज्याचा हेतू आहे असा सदस्य त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांवरून तो मांडण्यात आला असेल ती कारणे लेखी नमूद करील.

(३) असा प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी, कार्यकारी परिषद, नोटीशीची व निवेदनाची एक प्रत व्यवस्थापनाकडे आणि त्याच्या प्रती महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे पाठवील व त्यासोबत, अशी सूचना असेल की, जर महाविद्यालयाने त्या सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत कोणतेही अभिवेदन सादर केले तर ते कार्यकारी परिषदेकडून विचारात घेतले जाईल :

परंतु, अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात आलेली मुदत, आवश्यक असल्यास, कार्यकारी परिषदेस वाढवता येईल.

(४) असे अभिवेदन मिळाल्यानंतर, अथवा पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली मुदत संपल्यानंतर, कार्यकारी परिषद, प्रस्तावाची नोटीस, निवेदन आणि अभिवेदन, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, आणि त्याच्याकडून त्याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या सक्षम व्यक्तींच्या समितीकडून तिला आवश्यक वाटेल अशी तपासणी व आणखी चौकशी करण्यात आल्यानंतर त्याबाबीसंबंधात विद्या परिषदेचा दृष्टिकोन जाणून घेईल व त्यावर विचार करून आपले मत नोंदवील. कार्यकारी परिषद, त्यानंतर करण्यात यावयाच्या कारवाईची अधिसभेकडे शिफारस करील आणि अधिसभेच्या बैठकीच्या वेळी उपस्थित असलेल्या दोन-तृतियांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या बहुसंख्येने शिफारशीस पाठिंबा दिला असेल तर, अशा शिफारशी अधिसभेकडून यथोचित रीत्या संमत करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(५) अशी शिफारस अधिसभेकडून संमत करण्यात येईल तेव्हा, कुलसचिव अधिसभेचे, आणि विद्या व कार्यकारी परिषदांचे मत आणि कोणतीही असल्यास, त्यासंबंधीची सर्व कार्यवृत्ते, राज्य शासनाला सादर करील आणि राज्य शासन, त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल.

(६) पोट-कलम (५) अन्वये दिलेल्या आदेशान्वये संलग्नीकरणाद्वारे प्रदान करण्यात आलेले अधिकार, पूर्णत: अथवा अंशत: काढून घेण्यात येतील किंवा त्यात फेरबदल करण्यात येतील त्याबाबतीत, असे अधिकार काढून घेण्याची अथवा त्यात फेरबदल करण्याची कारणे आदेशात नमूद करण्यात येतील.

(७) कार्यकारी परिषदेला, तिला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही संलग्न महाविद्यालयाच्या कामकाजाच्या अंगांची तपासणी, कोणत्याही वेळी, करण्याची व्यवस्था करता येईल.

(८) कार्यकारी परिषदेला, तिला देण्यात आलेल्या प्रतिवृत्ताच्या आधारे आणि व्यवस्थापनाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आणि तिला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यावर, महाविद्यालयाच्या कामकाजामध्ये आढळून आलेला कोणताही दोष किंवा न्यूनता काढून टाकण्यास व्यवस्थापनास भाग पाडण्यासाठी निदेश देता येतील.

(९) जर व्यवस्थापन, वाजवी कारणाशिवाय, पोट-कलम (८) अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर, कार्यकारी परिषदेला, व्यवस्थापनाकडून देण्यात आलेले स्पष्टीकरण, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, पुढील गोष्टींचा समावेश करून, तिला योग्य वाटेल अशी आणखी कोणतीही कारवाई करता येईल :—

(अ) महाविद्यालयाचे सहाय्य थांबविण्याची शासनाकडे शिफारस करणे ;

(ब) संलग्नीकरण अंशतः किंवा पूर्णतः काढून घेण्याबद्दल अधिसभेच्या पूर्वमान्यतेसह शासनाकडे शिफारस करणे ; किंवा

(क) लोकहितास्तव, अधिसभेच्या पूर्वमान्यतेसह तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरिता, महाविद्यालयाचे व्यवस्थापन आपल्याकडे घेणे.

(१०) कार्यकारी परिषदेच्या मते एखाद्या संलग्न महाविद्यालयाचे जे व्यवस्थापन, वाजवी सबबीशिवाय, पोट-कलम (८) अन्वये दिलेल्या निदेशांचे पालन करण्यात कसूर करील ते, राज्य शासनाच्या सहमतीने, परिनियमांमध्ये विहित केलेल्या रीतीने, विद्यापीठाकडून हाती घेतले जाण्यास पात्र ठरेल.

(११) कोणतेही संलग्न महाविद्यालय व्यवस्थापनाकडून बंद करण्यात येईल त्या प्रसंगी, विद्यापीठाला, परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने, महाविद्यालयाचे व्यवस्थापन आपल्याकडे घेता येईल.

५०. (१) एखाद्या परिसंस्थेने, आपल्या मान्यतेच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा विद्यापीठाच्या हितसंबंधात किंवा त्याच्या दर्जास बाधक होईल अशा रीतीने ती चालविण्यात येत असेल तर, मान्यतेद्वारे अशा परिसंस्थेस प्रदान करण्यात आलेले अधिकार कोणत्याही किंवा ती मुदतीपर्यंत, काढून घेता येतील किंवा ते निलंबित करता येतील. मान्यता काढून घेणे किंवा ती निलंबित करणे.

(२) अशा रीतीने अधिकार काढून घेण्याबाबतच्या किंवा ते निलंबित करण्याबाबतच्या प्रस्तावाचा सूत्रपात केवळ कार्यकारी परिषदेतच करता येईल आणि असा प्रस्ताव मांडण्याचा ज्याचा हेतू असेल असा कार्यकारी परिषदेचा सदस्य, त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांवरून तो मांडण्यात आला असेल ती कारणे लेखी नमूद करील.

(३) असा प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी कार्यकारी परिषद, नोटीशीची व निवेदनाची प्रत परिसंस्थेच्या प्रमुखाकडे पाठवील व त्यासोबत अशी सूचना असेल की सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत तिने सादर केलेल्या कोणत्याही अभिवेदनावर कार्यकारी परिषदेकडून विचार करण्यात येईल :

परंतु, कार्यकारी परिषदेस आवश्यक वाटल्यास, अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेली मुदत वाढविता येईल.

(४) असे अभिवेदन मिळाल्यानंतर किंवा पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतर कार्यकारी परिषद, प्रस्तावाची नोटीस, निवेदन आणि अभिवेदन, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर आणि तिच्याकडून या बाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या सक्षम व्यक्तींच्या समितीकडून, तिला आवश्यक वाटेल अशी, तपासणी व आणखी चौकशी केल्यानंतर त्या बाबीसंबंधात विद्यापरिषदेचा दृष्टिकोन जाणून घेईल व त्यावर विचार करून मान्यता निलंबित करावी किंवा काढून घ्यावी किंवा कसे याबाबत निर्णय घेईल :

परंतु, कार्यकारी परिषदेच्या सभेस उपस्थित असलेल्या निदान दोन-तृतियांश सदस्यांनी अशा अर्थाच्या प्रस्तावास पाठिंबा दिल्याखेरीज, अशा रीतीने मान्यता काढून घेण्यासंबंधीचा किंवा ती निलंबित करण्यासंबंधीचा कोणताही आदेश देता येणार नाही.

## प्रकरण आठ

### इंटरमिडिएटनंतरच्या आणि स्नातकोत्तर अध्यापनाची रचना

घटक आणि संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त घटक परिसंस्था व मान्यताप्राप्त परिसंस्था.

५१. (१) ज्यांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात आले आहेत अशी विद्यापीठे अधिक्षेत्रातील सर्व महाविद्यालये, आणि जी यानंतर विद्यापीठांशी संलग्न करण्यात येतील अशी उक्त क्षेत्रातील सर्व महाविद्यालये, ही विद्यापीठाची घटक महाविद्यालये असतील.

(२) विद्यापीठ अधिक्षेत्रातील कलम ४६ अन्वये विद्यापीठाने मान्यता दिलेल्या सर्व परिसंस्था या विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त घटक परिसंस्था असतील.

(३) अशी घटक किंवा संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त घटक परिसंस्था किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे आणि विद्यापीठांचे संबंध परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असतील. परिनियमांत, अशी महाविद्यालये व परिसंस्था यांच्या संबंधातील खालील शक्तींचा विद्यापीठाने वापर करण्याबद्दल विशेषकरून तरतूद करण्यात येईल :—

(एक) अशा महाविद्यालयांचे आणि परिसंस्थांचे अध्यापक व पाठनिर्देशक यांच्या वेगवेगळ्या वर्गासाठी किमान शैक्षणिक अर्हता आणि वित्तलब्धी विहित करणे;

(दोन) अशा महाविद्यालयांनी आणि परिसंस्थांनी केलेल्या अध्यापकांच्या नेमणुकीस मान्यता देणे ;

(तीन) विद्यापीठाच्या वतीने अध्यापन करण्यासाठी, विहित करण्यात येतील इतके, कोणत्याही विषयाचे मान्यताप्राप्त अध्यापक आवश्यक असेल त्या बाबतीत, अशा महाविद्यालयांनी आणि परिसंस्थांनी देण्यास त्यांना भाग पाडणे ;

(चार) अध्यापन व संशोधन यासाठी ग्रंथालये, प्रयोगशाळा व अन्य साधनसामग्री यांच्या संबंधात, अशा महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी पुरविलेल्या सोयींचा समन्वय करणे व त्यांचे नियमन करणे ;

(पाच) अशी महाविद्यालये व परिसंस्था यांच्यासाठी विवक्षित सोयींची तरतूद करण्यासाठी अंशदाने लादणे व त्यांना अनुदाने देणे ;

(सहा) अशी महाविद्यालये व परिसंस्था यांमध्ये पाठनिर्देशन व तशाच प्रकारचे इतर शैक्षणिक काम यांबाबत समाधानकारक व्यवस्था करण्यास भाग पाडणे आणि वेळोवेळी अशा व्यवस्थेची तपासणी करविणे.

विद्यापीठ अधिक्षेत्रातील अध्यापन.

५२. विद्यापीठ अधिक्षेत्रामध्ये विहित करण्यात येतील अशा उद्दिष्टांसाठी व अशा रीतीने स्नातकोत्तर सर्व शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण व संशोधन, विद्यापीठांकडून, किंवा महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्याकडून चालविण्यात येईल.

## प्रकरण नऊ

### नावनोंदणी व पदव्या

विद्यार्थ्यांची नावनोंदणी.

५३. विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नावनोंदणी होण्यासाठी कोणताही विद्यार्थी—

(एक) विहित केलेल्या अशा विषयांत आणि प्रमाणात गुणवत्ता संपादन करून, विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारी, उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा ;

(दोन) विहित केलेल्या अशा विषयांत आणि प्रमाणात गुणवत्ता संपादन करून, महाराष्ट्र माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणारी, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा उच्च माध्यमिक (बहूद्देशीय) शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी कोणतीही परीक्षा ;

(तीन) राज्य शासनाच्या संमतीने जी विद्यापीठाकडून सुरू करण्यात येईल व विहित करण्यात येतील अशा विषयांची आणि विहित रीतीने घेण्यात येईल अशी कोणतीही प्रवेश परीक्षा ; किंवा

(चार) वर नमूद केलेल्या परीक्षांच्या बरोबरीची म्हणून विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही परीक्षा

उत्तीर्ण झालेला असेल किंवा

(पाच) विहित केलेल्या अशा इतर अर्हता धारण करीत असेल.

५४. या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, कार्यकारी परिषदेस, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करता येतील व प्रदान करता येतील. पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी.

५५. कार्यकारी परिषदेस, एखाद्या व्यक्तीची (समाजातील) प्रतिष्ठा, गुणवत्ता व समाजसेवा विचारात घेता, सन्मान्य पदवी किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी मिळण्यास ती योग्य व्यक्ती आहे याच केवळ कारणावरून अशा व्यक्तीस कोणतीही चाचणी किंवा परीक्षा दिल्याशिवाय, सन्मान्य पदवी किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासंबंधी कार्यकारी परिषदेस, विचार करून, अधिसभेकडे शिफारस करता येईल आणि अशी शिफारस ही, अधिसभेच्या एकूण सदस्य-संख्येच्या निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या, सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या दोन-तृतियांशापेक्षा कमी नसणाऱ्या बहुमताने पाठिंबा दिल्यास, यथोचित रीत्या मंजूर करण्यात आल्याचे समजण्यात येईल : सन्मान्य पदव्या.

परंतु, कार्यकारी परिषद, कुलगुरूने कुलपतीची पूर्वमान्यता घेतली असल्याखेरीज, त्याबाबत कोणताही प्रस्ताव दाखल करून घेणार नाही किंवा त्याचा विचार करणार नाही.

५६. (१) कुलपतीस, कार्यकारी परिषद व अधिसभा यांच्या शिफारशींवरून, त्याच्या मते, नैतिक अधःपाताचा ज्यात अंतर्भाव होतो अशा कोणत्याही गंभीर स्वरूपाच्या अपराधाबद्दल न्याया-लयाने एखाद्या व्यक्तीला दोषी ठरविले असेल अशा त्या कोणत्याही व्यक्तीचे नाव कुलपतीस योग्य वाटेल अशा मुदतीसाठी, स्नातकांच्या नोंदवहीतून काढून टाकता येईल ; मात्र, उक्त प्रत्येक मंडळाच्या सभेस हजर असणाऱ्या सदस्यांच्या दोन-तृतियांशापेक्षा कमी नसतील इतक्या बहुमताने —अशा बहुमतामध्ये प्रत्येक मंडळाचे निम्म्यापेक्षा कमी नसतील इतके सदस्य असतील—कार्यकारी परिषदेच्या व अधिसभेच्या शिफारशींस पाठिंबा दिलेला असेल. विवक्षित अपराधांबद्दल दोषी ठरविण्यात आल्यानंतर स्नातकांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकणे.

(२) संबंधित व्यक्तीस, परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने बचावासाठी आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याखेरीज, या कलमान्वये कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

## प्रकरण दहा

### समित्या

५७. (१) विद्यापीठाच्या वतीने शिक्षण देण्यासाठी विद्यापीठाने मान्यता दिलेल्या अध्यापकां-व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या अध्यापकांची निवड व नेमणूक, या व लगतनंतरच्या कलमास अनुसरून करण्यात येईल. विद्यापीठाच्या अध्यापकांची निवड व नेमणूक करण्यासाठी समिती.

(२) (अ) विद्यापीठाच्या अशा सर्व अध्यापकांच्या नेमणुकीसंबंधात कार्यकारी परिषदेस शिफारशी करण्यासाठी निवड समित्या असतात.

(ब) प्रत्येक निवड समितीत पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) कुलपतीने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती,

(तीन) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता,

(चार) प्राध्यापक असल्यास, संबंधित विद्यापीठ विभागाचा प्रमुख, आणि

(पाच) विद्यापीठाशी ज्या व्यक्ती संबंधित नसतील आणि ज्या विषयासाठी अध्यापकाची निवड करावयाची असेल त्या विषयाचे ज्यांना विशेष ज्ञान आहे, अशा विद्या परिषदेने शिफारस केलेल्या सहापेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून कार्यकारी परिषदेने नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती.

(३) कुलसचिव, हा समितीचा सचिव म्हणून काम करील.

(४) (अ) निवडीने भरावयाच्या विद्यापीठाच्या अध्यापकाच्या प्रत्येक पदाची, त्यासाठी लागणारी किमान अर्हता आणि आवश्यक असतील अशा इतर कोणत्याही अतिरिक्त अर्हता, वित्तलब्धी आणि भरावयाच्या पदांची संख्या यांच्या तपशीलासह, कार्यकारी परिषदेने मान्य केलेल्या मसुद्यानुसार, यथोचितरीत्या व मोठ्या प्रमाणावर जाहिरात देण्यात येईल आणि जाहिरातीस अनुसरून, अर्जदारांना आपले अर्ज सादर करण्यासाठी वाजवी मुदत देण्यात येईल.

(ब) प्रत्येक निवड समितीच्या सभेची तारीख अशा रीतीने निश्चित करण्यात येईल की, ज्यायोगे प्रत्येक सदस्यास आणि उमेदवारास त्यासंबंधी निदान २० दिवसांची नोटीस देता येईल आणि प्रत्येक उमेदवाराचा तपशील प्रत्येक सदस्यास डाकेने अशा रीतीने पाठविण्यात येईल की, ज्यायोगे त्याला सभेच्या तारखेपूर्वी निदान सात दिवस आधी तो मिळू शकेल.

(क) प्रत्येक निवड समितीच्या सभेची चार सदस्यांनी गणपूर्ती होईल. त्यापैकी निदान दोन सदस्य, पोट-कलम (२), खंड (ब) (पाच) अन्वये नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती असतील.

(ड) निवड समिती प्रत्येक उमेदवाराची मुलाखत घेईल. जाहिरातीत दिलेल्या अर्हतानुसार त्याची गुणवत्ता ठरवील आणि जाहिरात दिलेल्या पदांवरील नेमणुकीसाठी ज्यांची ती शिफारस करील अशा कोणत्याही असल्यास, व्यक्तीची किंवा व्यक्तींची नावे गुणवत्तेनुसार लावून कार्यकारी परिषदेस कळवील :

परंतु, निवड समितीस प्राध्यापकाच्या पदासाठी ज्यांनी अर्ज केला असेल आणि जे तिच्यापुढे उपस्थित झाले असतील अशा उमेदवारांऐवजी ज्यांनी अर्ज केला नसेल किंवा तिच्यापुढे उपस्थित राहिल्या नसतील आणि ज्या यथोचितरीत्या अर्हताप्राप्त असतील अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावाची नेमणुकीसाठी शिफारस करता येईल.

(ई) कार्यकारी परिषद, जाहिरात दिलेली पदे भरण्यासाठी अशा रीतीने शिफारस केलेल्या व्यक्तींमधून आवश्यक असतील तितक्या व्यक्तींची निवड करील :

परंतु, निवड समितीने लावलेल्या गुणवत्तेनुसार असेल, त्याव्यतिरिक्त—अन्यथा कार्यकारी परिषद नेमणूक करण्याचे ठरवील त्याबाबतीत, कार्यकारी परिषद शिफारस न स्वीकारण्याबद्दलची आपली कारणे लेखी नमूद करील व ती कुलपतीकडे सादर करील. कुलपती, अशा प्रस्तावास मान्यता देईल किंवा तो पुनर्विचारार्थ कार्यकारी परिषदेकडे परत पाठवील. पुनर्विचारानंतर कार्यकारी परिषदेला आपला मूळ प्रस्ताव पुढे चालू ठेवण्याची इच्छा असल्यास, ती बाब कुलपतीकडे निर्णयासाठी पुनः पाठवील व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल :

आणखी असे की, जेव्हा निवड समिती कार्यकारी परिषदेस केवळ एकाच व्यक्तीच्या नावाची शिफारस करील आणि कार्यकारी परिषदेस ती व्यक्ती स्वीकारण्याजोगी नसेल त्याबाबतीत, कार्यकारी परिषद, ती शिफारस न स्वीकारण्याबद्दलची आपली कारणे लेखी नमूद करील आणि कुलसचिवास त्या रिकाम्या पदाची पुन्हा जाहिरात देण्याचा निदेश देईल आणि नवीन शिफारशी करण्यासाठी निवड समितीची सभा बोलावील व तसे करताना, वर नमूद केलेली कारणे निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास कळवील.

(५) प्रत्यक्ष प्रतिकूल परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीने विनंती अर्ज केल्यावर किंवा कुलपतीने स्वाधिकारे किंवा आवश्यक असेल किंवा आवश्यक ठरलेली असेल अशी चौकशी केल्यानंतर किंवा करवून घेतल्यानंतर किंवा अशी स्पष्टीकरणे मिळविल्यानंतर किंवा मिळविण्यात आल्यानंतर त्याची अशी खात्री पटली असेल की, १ जानेवारी १९७१ रोजी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने केलेली विद्यापीठाच्या कोणत्याही अध्यापकाची नेमणूक ही, त्यावेळी अंमलात असलेल्या विधीनुसार करण्यात आली नाही तर, कुलपतीस आदेशाद्वारे अशा अध्यापकाच्या सेवेच्या शर्तींशी संबंधित असलेल्या करारात काहीही अंतर्भूत असले तरी, तिला एका महिन्याची नोटीस दिल्यानंतर किंवा अशा नोटीशीऐवजी एका महिन्याचे वेतन दिल्यानंतर तिची नेमणूक समाप्त करण्याबद्दल कुलगुरूस निदेश देता येईल आणि कुलगुरू या निदेशाचे तावडतोब पालन करील व नव्याने निवड करण्याची उपाययोजना करील. अशा रीतीने जिची सेवा समाप्त करण्यात आली असेल अशी व्यक्ती, त्या पदासाठी पुन्हा अर्ज करण्यास पात्र असेल.

(६) लगतपूर्ववर्ती पोट-कलमान्वये कुलपतींने दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल आणि आदेश मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत, त्याची एक प्रत, कुलगुरूकडून संबंधित अध्यापकावर बजावण्यात येईल.

(७) कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त केल्यानंतर, कोणत्याही मुदतीसाठी विद्यापीठाच्या निधीमधून वेतन व भत्ते यांच्या रूपाने तिला काहीही मिळणार नाही आणि असे कोणतेही प्रदान प्राधिकृत करणारा किंवा देणारा कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी अशा रीतीने देण्यात आलेल्या रकमेची प्रतिपूर्ती विद्यापीठाकडे करण्यास पात्र होईल याबद्दल खात्री करून घेणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल.

**विद्यापीठाच्या अध्यापकांची तात्पुरती रिकामी पदे भरणे.**

५८. (१) विद्यापीठाच्या अध्यापकाच्या तात्पुरत्या रिकाम्या पदावर नेमणूक करावयाची असेल त्याबाबतीत, एक वर्षाच्या किंवा त्याहून अधिक मुदतीसाठी पद रिकामे राहणार असेल तर निकटपूर्ववर्ती कलमाच्या उपबंधांस अनुसरून निवड समितीच्या शिफारशीनुसार नेमणूक करण्यात येईल :

परंतु, अध्यापनाच्या दृष्टीने ते रिकामे पद ताबडतोब भरणे आवश्यक आहे याबद्दल कुलगुरूची खात्री झाल्यास, त्यास पुढीलप्रमाणे रचना केलेल्या स्थानिक निवड समितीच्या शिफारशीवरून सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशा नेमणुकीसंबंधी तो कार्यकारी परिषदेस कळवील :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष;

(दोन) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता;

(तीन) संबंधित विद्यापीठ विभाग प्रमुख, आणि

(चार) कुलगुरूने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती, मात्र विभाग प्रमुख हा अधिष्ठाताही असेल तर, कुलगुरू एका व्यक्तीऐवजी दोन व्यक्तींची नेमणूक करील ;

आणखी असे की, सहा महिने संपण्यापूर्वी, कुलगुरू, निकटपूर्ववर्ती कलमाच्या उपबंधास अनुसरून नेमणूक करण्यासाठी निवड समितीची सभा बोलावण्याची उपाययोजना करील.

(२) पद एक वर्षाहून कमी मुदतीसाठी रिकामे असल्यास, कुलगुरूस, त्या मुदतीसाठी पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकामध्ये उपबंधित केल्याप्रमाणे स्थानिक निवड समितीच्या सल्ल्यानुसार, यथोचित रीत्या अर्हताप्राप्त असलेल्या एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल.

**विद्यापीठाच्या अध्यापकांना मान्यता देण्यासाठी समिती.**

५९. (१) त्या प्रयोजनासाठी रचना केलेल्या समितीच्या शिफारशींखेरीज विद्यापीठाचा अध्यापक म्हणून कोणत्याही व्यक्तीस मान्यता देण्यात येणार नाही. अशी समिती पुढील व्यक्तींची मिळून होईल:—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता,

(तीन) संबंधित विद्यापीठ विभाग प्रमुख, आणि

(चार) ज्या विषयाचा अध्यापक म्हणून मान्यता द्यावयाची असेल त्याचे विशेष ज्ञान असणाऱ्या चार व्यक्ती, त्यापैकी दोन अधिसभेचे किंवा विद्याशाखेचे सदस्य किंवा अध्यापक यांच्याव्यतिरिक्त असलेल्या व्यक्तींमधून कार्यकारी परिषदेकडून आणि दोन विद्यापरिषदेच्या सदस्यांमधून, तिच्याकडून नामनिर्देशित करण्यात येतील.

(२) कार्यकारी परिषद, समितीच्या शिफारशींचा विचार केल्यानंतर आदेशाद्वारे नियमित केलेल्या रीतीने अशा अध्यापकांस मान्यता देईल किंवा ती रोखून धरील.

विद्यापीठाकडून चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या प्राचार्यांच्या नेमणुकीसाठी निवड समिती.

६०. (१) त्या प्रयोजनासाठी रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशी खेरीज विद्यापीठाकडून चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा प्राचार्य म्हणून कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही.

(२) समिती पुढील व्यक्तींची मिळून होईल :—

(एक) कुलगुरू— पदसिद्ध अध्यक्ष, आणि

(दोन) ते महाविद्यालय किंवा परिसंस्था यांजकडून ज्या विषयाचे शिक्षण देण्यात येते त्या विषयाचे किंवा विषयांचे विशेष ज्ञान असणाऱ्या तीन व्यक्ती त्यांपैकी दोन कार्यकारी परिषदेकडून व एक विद्या परिषदेकडून नामनिर्देशित करण्यात येईल व त्या व्यक्ती विद्यापीठ सेवेतील व्यक्ती असणार नाहीत.

(३) अशा प्राचार्यांची निवड व नेमणूक करण्यासंबंधीची कार्यरीती ही कलम ५७ द्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

कुलसचिवाच्या नेमणुकीसाठी निवड समिती.

६१. (१) त्या प्रयोजनासाठी रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशीखेरीज, कुलसचिव म्हणून कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही. उक्त समितीचे सदस्य हे पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) कार्यकारी परिषदेवरील कुलपतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती, आणि

(तीन) कार्यकारी परिषदेच्या इतर सदस्यांमधून तिने नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती.

(२) अशा कुलसचिवाच्या पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हता आणि निवड समितीने सभेच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती ही परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

वित्त अधिकाऱ्याच्या नेमणुकीसाठी निवड समिती.

६२. (१) त्या प्रयोजनासाठी रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून असेल त्याशिवाय कोणत्याही व्यक्तीची वित्त अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येणार नाही. उक्त समिती ही पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य किंवा उप महालेखापालाच्या दर्जाहून कमी दर्जाची नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती,

(तीन) कार्यकारी परिषदेवरील कुलपतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती,

(चार) कार्यकारी परिषदेच्या इतर सदस्यांमधून तिने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती,

(पाच) कुलसचिव—पदसिद्ध सचिव.

(२) वित्त अधिकाऱ्याच्या पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हता आणि निवड समितीने सभेच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती ही परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

ग्रंथपालाच्या नेमणुकीसाठी निवड समिती.

६३. (१) त्या प्रयोजनासाठी रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशीखेरीज ग्रंथपाल म्हणून कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही. उक्त समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष, आणि

(दोन) कार्यकारी परिषदेने, ग्रंथालय शास्त्र आणि ग्रंथालय प्रशासनविषयक विशेष ज्ञान असणाऱ्या व विद्यापीठाच्या सेवेत नसतील अशा नामनिर्दिष्ट करावयाच्या दोन व्यक्ती.

(२) ग्रंथपालाच्या पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हता व निवड समितीने सभेत अनुसरावयाची कार्यपद्धती ही परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

६४. (१) विद्यापीठाचे परीक्षक म्हणून नेमणूक करण्यासाठी व्यक्तींची यादी तयार करण्याच्या प्रयोजनासाठी, दरवर्षी, प्रत्येक विद्याशाखेसाठी एका समितीची रचना करण्यात येईल आणि उक्त समिती पुढील व्यक्तींची मिळून होईल :— परीक्षकांच्या नेमणुकीसाठी समिती.

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता,

(तीन) कार्यकारी परिषदेने नेमलेले दोन सदस्य,

(चार) विद्यापरिषदेने नेमलेले सदस्य,

(पाच) विशिष्ट विषयाच्या अभ्यास मंडळाचा अध्यक्ष.

(२) समिती, अभ्यास मंडळाने तयार करावयाच्या नामिकेमध्ये समाविष्ट असलेल्या व्यक्तींमधून याद्या तयार करील आणि त्या कार्यकारी परिषदेकडे मान्यतेसाठी सादर करील. त्यानंतर कार्यकारी परिषद परीक्षकांच्या नेमणुका करील :

परंतु, कार्यकारी परिषदेकडून याद्यांमध्ये कोणताही बदल, ज्या आधारे असा प्रत्येक बदल सुचविण्यात आला असेल किंवा करण्यात आला असेल ती विशिष्ट भूमिका नमूद करणारा ठराव संमत करून असेल त्याशिवाय, सुचविण्यात येणार नाही किंवा करण्यात येणार नाही.

(३) कोणत्याही कारणामुळे परीक्षकाचे पद स्वीकारण्यास कोणताही परीक्षक असमर्थ होईल आणि कार्यकारी परिषदेस वेळीच नवीन नेमणूक करता येत नसेल तर, कुलगुरू, दुसऱ्या परीक्षकाची नेमणूक करील आणि कार्यकारी परिषदस अशा नेमणुकीसंबंधी कळवील.

(४) कार्यकारी परिषदेच्या उपस्थित सदस्यांच्या दोनतृतीयांश बहुमताने प्रस्ताव संमत करून असेल त्याशिवाय कार्यकारी परिषदेच्या किंवा समितीच्या कोणत्याही सदस्यास परीक्षक म्हणून नेमण्यात येणार नाही.

६५. (१) विद्यापीठ आणि त्याचा अभ्यासक्रम व नवीन ज्ञान आणि राष्ट्रीय गरजा यांच्या दृष्टीकोनातून सुविधा यांचा आणखी विकास व त्यात सुधारणा करण्यासाठी, दीर्घकालीन आणि अल्पकालीन योजना व कार्यक्रम तयार करणे, अशा योजना व असे कार्यक्रम यांच्या प्रगतीचे नियतकालिक मूल्यमापन करणे आणि त्यांचा आढावा घेणे, अध्यापनाच्या व शिक्षणाच्या पद्धतीचे परीक्षण करणे व नवीन पद्धती शोधणे, आणि या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी कृषी, व्यापार, वाणिज्य, उद्योग, समाज सेवा, अभियांत्रिकी व वैद्यकीय धरून वैज्ञानिक व तांत्रिक व्यवसाय यांच्या प्रातिनिधिक संघटना आणि इतर विद्यापीठे व संशोधन परिसंस्था यांच्याशी विचारविनिमय आणि माहितीची देवाणघेवाण करणे यासाठी एक विद्याविषयक नियोजन व मूल्यमापन समिती असेल. विद्याविषयक नियोजन व मूल्यमापन.

(२) समिती पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेली एक व्यक्ती,

(तीन) परिनियमांनी विहित केलेल्या रीतीने नेमलेले विद्याशाखांचे तीन अधिष्ठाते,

(चार) कार्यकारी परिषदेचे तीन आणि कार्यकारी परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्यापरिषदेचे दोन सदस्य,

(पाच) दरवर्षी, कुलगुरूने, आळीपाळीने, नामनिर्देशित करावयाचे तीन विभाग प्रमुख, आणि

(सहा) दरवर्षी एक आळीपाळीने किंवा आवश्यक असेल अशी विचाराधीन बाब किंवा अशा बाबी यानुसार वरील हितसंबंध आणि व्यवसाय यांचे प्रतिनिधित्व करणारे समितीने स्वीकृत केलेले तीन सदस्य.

(३) कुलसचिव हा, समितीचा सचिव म्हणून काम करील.

(४) अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त, समितीच्या सदस्यांचा पदावधी हा तीन वर्षांचा असेल.

वित्त समिती. ६६. (१) वित्त समिती ही पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरु—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती,

(तीन) विद्या परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्याशाखांचे दोन अधिष्ठाते,

(चार) कार्यकारी परिषदेने आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती,

(पाच) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती,

(सहा) कुलसचिव, आणि

(सात) वित्त अधिकारी—पदसिद्ध सचिव.

(२) वित्त समितीच्या सभेची गणपूर्ती पाच सदस्यांनी होईल.

(३) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त समितीचे सर्व सदस्य, तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील.

(४) समिती, लेखे, खर्चाची प्रगती आणि उपलब्ध तरतुदींच्या संदर्भात नवीन खर्च अंतर्भूत होणारे सर्व नवीन प्रस्ताव यांच्या तपासणीसाठी, दरवर्षी, निदान दोनदा सभा घेईल.

(५) वित्तीय अधिकाऱ्याने तयार केलेले विद्यापीठ लेख्यांचे वार्षिक विवरण आणि वित्तीय अंदाज विचारार्थ व शिफारशींसाठी समितीपुढे ठेवण्यात येतील आणि त्यानंतर ते कार्यकारी परिषदेकडे तिला योग्य वाटेल अशा कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील.

(६) समिती, उत्पादक कामांसाठी दिलेल्या कर्जाचे उत्पन्न धरून, विद्यापीठाचे द्रव्य यांवर आधारलेला, त्या वर्षीचा एकूण आवर्ती आणि अनावर्ती खर्च यांवरील मर्यादांची शिफारस कार्यकारी परिषदेकडे करील.

(७) समिती, अधिसभेने नेमलेल्या लेखा परीक्षकांकडून विद्यापीठाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करील.

(८) अशा समितीच्या इतर शक्ती व कर्तव्ये व तिची सभेतील कार्यरीती ही विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

विद्यापीठ लेखा समिती. ६७. (१) विद्यापीठ लेखा समिती पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) अधिसभेच्या सदस्यांमधून कुलपतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती—अध्यक्ष,

(दोन) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती,

(तीन) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती, आणि

(चार) विद्या परिषदेने आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती.

(२) वित्त अधिकारी हा समितीचा सचिव म्हणून काम करील.

(३) समितीचे सदस्य, तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील.

(४) संवितरित म्हणून दर्शविण्यात आलेल्या रकमा, ज्या प्रयोजनांसाठी खर्च करण्यात आल्या त्याच प्रयोजनांसाठी त्या यथोचित रीत्या उपलब्ध होत्या आणि त्यावेळी अंमलात असलेल्या विधीनुसार तो खर्च करण्यात आला होता याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यासाठी समिती, वार्षिक लेख्यांची छाननी करील. समिती, वेळोवेळी आपला अहवाल अधिसभेला सादर करील आणि तिच्या निदर्शनास येतील अशा कोणत्याही चुका किंवा नियमबाह्य गोष्टींबाबत करावयाच्या कारवाईबद्दल सूचना करील आणि त्यानंतर, अधिसभा तिला आवश्यक वाटेल अशी कारवाई करील.

(५) समितीच्या इतर शक्ती व कर्तव्ये आणि तिच्या सभेतील कार्यरीती ही, परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

ग्रंथालय समिती. ६८. (१) विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या प्रशासनासाठी, त्याच्या आयोजनासाठी आणि परीरक्षणासाठी पुढील सदस्यांची मिळून एक ग्रंथालय समिती असेल :—

(एक) कुलगुरु—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले विद्याशाखेचे तीन अधिष्ठाते,

(तीन) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले तीन विद्यापीठ विभाग प्रमुख,

(चार) कार्यकारी परिषदेने नामनिर्देशित केलेले दोन अध्यापक,

(पाच) कुलसचिव, आणि

(सहा) ग्रंथपाल---पदसिद्ध सचिव.

(२) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त समितीचे सर्व सदस्य, तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत पद धारण करतील.

(३) समितीच्या शक्ती व कर्तव्ये आणि तिने अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्यात येईल अशी असेल.

६९. विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणांना आपल्या अधिकार कक्षेतील कोणत्याही बाबींसाठी समित्या इतर नेमण्याची शक्ती असेल आणि अशा समित्यांमध्ये, प्राधिकरणाच्या ज्या सदस्य नसतील अशा, विद्या- समित्या. पीठाशी संबंध नसणाऱ्या व्यक्तींचा समावेश होईल :

परंतु, विद्याशाखा, अभ्यास मंडळे व इतर प्राधिकरणे, कुलगुरूंची पूर्वमान्यता असेल त्याशिवाय समिती नियुक्त करणाऱ्या प्राधिकरणाच्या ज्या सदस्य नाहीत अशा व्यक्तींची अशा समित्यांवर नेमणूक करणार नाहीत.

## प्रकरण अकरा

### वित्तव्यवस्था

७०. (१) विद्यापीठ "विद्यापीठ निधी" या नावाचा एक निधी प्रस्थापित करील. विद्यापीठ निधी.

(२) पुढील रकमा विद्यापीठ निधीचा भाग बनतील किंवा त्या विद्यापीठ निधीत जमा करण्यात येतील :---

(अ) राज्य शासनाने, केंद्र सरकारने आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सर्व अंश-दाने किंवा अनुदाने ;

(ब) फी व आकार यांपासून येणारे उत्पन्न धरून, सर्व साधनांपासून येणारे विद्यापीठाचे उत्पन्न ;

(क) विश्वस्तव्यवस्था, मृत्युपत्रित देणग्या, स्थायीदान, अर्थसहाय्य आणि इतर अनुदाने यांपासून मिळणारे उत्पन्न व पैसा ;

(ड) विद्यापीठाकडून आणि विद्यापीठ व महाविद्यालय विकास वित्त महामंडळाची स्थापना करण्यात येईल तेव्हा, त्याच्याकडून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा ; आणि

(इ) राज्य शासनाच्या परवानगीने बँकांकडून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा.

(३) विद्यापीठाच्या खाती, एका स्वतंत्र शीर्षाखाली, विद्यापीठाचा एक आकस्मिक निधी असेल आणि विद्यापीठ तो ठेवील. त्यामध्ये विशेषत: या प्रयोजनासाठी वेळोवेळी राज्य शासनाकडून देण्यात येतील अशा अंशदानाच्या किंवा अनुदानाच्या रकमा जमा करण्यात येतील. अकल्पित खर्च भाग-विण्याच्या प्रयोजनार्थ आगाऊ रकमा देण्यासाठी अशा निधीचा वापर करण्यात येईल.

(४) विद्यापीठास, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, विद्यापीठ निधीचा कोणताही भाग विद्या-पीठाच्या खाती एका वेगळ्या शीर्षाखाली वेळोवेळी जमा करता येईल :

मात्र अशा रीतीने असा वेगळा निधी ज्या उद्दिष्टांसाठी उभारण्यात आला असेल त्याच्याशी स्पष्टपणे संबंधित असतील केवळ अशाच रकमा अशा विशेष शीर्षामध्ये जमा करण्यात आणि खर्ची घालण्यात येतील.

आणखी असे की, कार्यकारी परिषदेस, विशेष ठराव संमत करून, कोणतीही रक्कम विद्यापीठ लेख्यातील एका शीर्षाकडून दुसऱ्या शीर्षाकडे बदली करण्यास अधिकृत करता येईल.

(५) विद्यापीठ निधी हा, कार्यकारी परिषदेच्या स्वेच्छानिर्णयाने स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये किंवा बँकांच्या नियमनाबाबत अधिनियम, १९४९ याच्या कलम २२ अन्वये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिलेली अनुज्ञप्ती धारण करीत असलेल्या भारताच्या रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही अनुसूचित बँकेत किंवा त्या प्रयोजनार्थ राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत किंवा विद्यापीठ आणि महाविद्यालय विकास वित्त महामंडळ स्थापन करण्यात येईल तेव्हा, त्या महामंडळाकडे ठेवण्यात येईल किंवा भारतीय विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८८२ याद्वारे प्राधिकृत केलेल्या रोख्यांमध्ये किंवा पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रयोजनांसाठी प्रस्थापित केलेल्या ग्राहक सहकारी संस्थांचे शेअर्स घेऊन किंवा त्यांना कर्ज देऊन त्यात गुंतविण्यात येईल.

वार्षिक लेखे आणि वित्तीय अंदाज. ७१. (१) विद्यापीठाचे वार्षिक लेखे (ताळेबंद धरून) कार्यकारी परिषदेच्या निदेशानुसार वित्त समितीकडून तयार करण्यात येतील आणि वित्तीय वर्ष समाप्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत, अधिसभेने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून त्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

(२) लेखापरीक्षा करण्यात येईल तेव्हा लेखे कार्यकारी परिषदेकडून प्रसिद्ध करण्यात येतील आणि लेखा परिक्षित अहवालाच्या प्रतीसह त्याची एक प्रत अधिसभेला सादर करण्यात येईल.

(३) वित्त समिती, आगामी वर्षाचे वित्तीय अंदाज परिनियमान्वये विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी तयार करील.

(४) कार्यकारी परिषदेने मान्य केलेले वित्तीय अंदाज अधिसभेकडे सादर करण्यात येतील व अधिसभा त्यावर विचार करील व तिला योग्य वाटतील अशा फेरफारांसह ते संमत करील. कार्यकारी परिषदेने मान्य केलेले वार्षिक लेखे, अधिसभेकडे सादर करण्यात येतील व अधिसभा त्यावर विचार करून तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यावर ठराव संमत करील.

(५) राज्य शासनाचे जे वित्तीय वर्ष असेल तेच विद्यापीठाचे वित्तीय वर्ष असेल.

वार्षिक अहवाल. ७२. विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, कार्यकारी परिषदेच्या निदेशांनुसार तयार करण्यात येईल आणि तो परिनियमांनी विहित करण्यात येईल अशा तारखेस किंवा तत्पूर्वी अधिसभेला सादर करण्यात येईल आणि अधिसभा वार्षिक सभेत त्याचा विचार करील. अधिसभेस त्या बाबतीत ठराव मंजूर करता येतील आणि ते कार्यकारी परिषदेस कळविता येतील. कार्यकारी परिषद त्यावर विचार करून तिला योग्य वाटेल अशी कार्यवाही करील ; आणि कार्यकारी परिषद, तिने केलेल्या कार्यवाहीबद्दलची किंवा कार्यवाही न केल्याबद्दलची कारणे कोणतीही असल्यास, अधिसभेला तिच्या पुढच्या बैठकीच्या वेळी कळवील.

## प्रकरण बारा

### संकीर्ण उपबंध

सेवेच्या शर्ती. ७३. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, विद्यापीठाचा कुलगुरू आणि प्रत्येक वेतनी अधिकारी व अध्यापक यांची लेखी करारान्वये नेमणूक करण्यात येईल व तो करार कुलसचिवाकडे दाखल करण्यात येईल आणि त्याची एक प्रत संबंधित अधिकाऱ्यास किंवा अध्यापकास पुरविण्यात येईल. परंतु कुलगुरूबरोबर केलेला करार कुलपतीकडे राहील आणि त्याची एक प्रत कुलगुरूकडे राहील.

(२) विद्यापीठाच्या अध्यापकांच्या आणि कुलगुरूव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांच्या सेवेचा करार हा परिनियमांन्वये विहित करण्यात येईल त्याप्रमाणे राहील व कुलगुरूच्या सेवेचा करार हा राज्य शासनाशी विचारविनिमय करून कुलपतीकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे राहील.

(३) विद्यापीठाच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या वित्तलब्धी व सेवेच्या शर्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा असतील.

(४) विनिर्दिष्ट मुदतीसाठी किंवा विनिर्दिष्ट कामासाठी विद्यापीठाने नेमलेले असतील आणि ज्यांना विद्यापीठ निधीतून भत्ते, किंवा इतर दान यासारखे कोणतेही पारिश्रमिक मिळत असेल असे विद्यापीठाचे वेतनी अधिकारी व कर्मचारी धरून, विद्यापीठाचे सर्व वेतनी अधिकारी आणि कर्मचारी हे, त्यावेळी अंमलात असलेल्या फौजदारी कायद्याच्या प्रयोजनासाठी लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

७४. विद्यापीठ व विद्यापीठाचा कोणताही अधिकारी किंवा अध्यापक यांच्या दरम्यान झालेल्या करारातून कोणताही विवाद उपस्थित झाल्यास, तो, संबंधित अधिकाऱ्याने किंवा अध्यापकाने विनंती केली असता, अशी विनंती करण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, लवादी न्यायाधिकरणाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. असे न्यायाधिकरण हे, कार्यकारी परिषदेने नेमलेला एक सदस्य, संबंधित अधिकाऱ्याने किंवा अध्यापकाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य आणि कुलपतीने नेमलेला पंच यांचे मिळून होईल आणि अशा विवादाच्या संबंधातील अशी कोणतीही विनंती कोणत्याही कारणासाठी नाकारण्यात येणार नाही किंवा रोखून धरण्यात येणार नाही. न्यायाधिकरणाचा निर्णय हा अंतिम असेल. न्यायाधिकरणाने निर्णय दिलेल्या बाबीसंबंधात कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही. अशी प्रत्येक विनंती ही, भारताचा लवादी अधिनियम, १९४० याच्या अर्थानुसार या कलमातील अटींवर लवादासाठी सादर करण्यात आल्याचे मानण्यात येईल. आणि तदनुसार त्या अधिनियमाचे उपबंध लागू होतील.

**लवादी न्यायाधिकरण.**

७५. विद्यापीठ, विमा, निवृत्तीवेतन आणि भविष्यनिर्वाह निधी व इतर लाभ यांच्या बाबतीत आपल्या अधिकाऱ्यांच्या, अध्यापकांच्या आणि इतर कर्मचाऱ्यांना लाभासाठी किंवा त्या योग्य वाटेल आणि परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्ती कोणत्याही असल्यास, त्यास अधीन राहून, इतर लाभांसाठी तरतुदी करील.

**निवृत्तीवेतन, विमा आणि भविष्य-निर्वाह निधी.**

७६. (१) कुलपतीस, तो निदेश देईल अशा विद्यापीठातील व्यक्तीकडून किंवा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींच्या मंडळाकडून विद्यापीठाचे, त्याच्या इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये, कर्मशाळा व साधनसामग्री यांचे तसेच विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी किंवा मान्यताप्राप्त किंवा त्याच्याशी संलग्न असणारी कोणतीही परिसंस्था, महाविद्यालय, कक्ष किंवा वसतिगृह यांचे आणि विद्यापीठाकडून किंवा त्याच्या वतीने, संचालित किंवा घेण्यात येणाऱ्या परीक्षा, अध्यापन आणि इतर काम यांचेही निरीक्षण करवून घेण्याची व्यवस्था करण्याचा आणि विद्यापीठाच्या महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या प्रशासनाची किंवा वित्तव्यवस्थेशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबीसंबंधी तशाच प्रकारची चौकशी करवून घेण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल.

**निरीक्षण आणि चौकशी.**

(२) कुलपती, अशा प्रत्येक बाबतीत, निरीक्षण किंवा चौकशी करवून घेण्याची व्यवस्था करण्याचा आपला इरादा असल्याबद्दल—

(अ) विद्यापीठाच्या किंवा त्याच्याकडून चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या बाबतीत, असे निरीक्षण किंवा चौकशी करावयाची असेल तर विद्यापीठास,

(ब) विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात आलेल्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या बाबतीत निरीक्षण किंवा चौकशी करावयाची असेल तर, महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापक वर्गाला,

नोटीस देईल आणि विद्यापीठाला किंवा यथास्थिति, व्यवस्थापक वर्गाला कुलपतीकडे आवश्यक वाटेल असे अभिवेदन करण्याचा अधिकार असेल.

(३) (विद्यापीठाचे किंवा यथास्थिति, व्यवस्थापकवर्गाचे) अभिवेदन, कोणतेही असल्यास, त्यावर विचार केल्यानंतर कुलपतीस, निरीक्षण किंवा चौकशी करून घेण्याची व्यवस्था करता येईल.

(४) कुलपतीकडून निरीक्षण किंवा चौकशी करवून घेण्याची व्यवस्था करण्यात येईल तेव्हा विद्यापीठास किंवा यथास्थिति, व्यवस्थापकवर्गास, प्रतिनिधी नेमण्याचा हक्क असेल व त्यास, अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या वेळी, उपस्थित राहण्याचा आणि बाजू मांडण्याचा अधिकार असेल.

(५) कुलपतीस, विद्यापीठाच्या किंवा त्यांच्याकडून चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या बाबतीत निरीक्षण किंवा चौकशी करण्यात आली असेल तर, अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाच्या संदर्भात, कुलगुरूला उद्देशून लिहिता येईल आणि त्यासंबंधात करावयाच्या कार्यवाहीच्या संबंधात कुलपतीस देणे योग्य वाटेल अशा सल्ल्यासह, तो कुलपतीचे मत कार्यकारी परिषदेस कळवील.

(६) विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल केलेल्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या संबंधात, निरीक्षण किंवा चौकशी करण्यात आली असेल तर, कुलपतीस, अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाच्या संदर्भात व्यवस्थापकवर्गास कळविण्याबद्दल कुलगुरूस उद्देशून लिहिता येईल ; त्यासंबंधी जी कार्यवाही करावयाची असेल तीबाबत कुलपती देईल ; अशा सल्ल्यासह, कुलगुरू, कुलपतीची मते व्यवस्थापकवर्गास कळवील.

(७) कार्यकारी परिषद किंवा यथास्थिती, व्यवस्थापकवर्ग अशा निरीक्षणाच्या परिणामी, कुलगुरूंनी दिलेल्या अभिप्रायांच्या आणि सल्ल्याच्या संदर्भात करण्याचे योजलेली किंवा करण्यात आलेली कार्यवाही, कोणतीही असल्यास, तिच्यासंबंधात कुलगुरूमार्फत कुलपतींना कळवील.

(८) कार्यकारी परिषदेने किंवा व्यवस्थापकवर्गाने, कुलपतीने निश्चित केलेल्या मुदतीत, कुलपतीचे समाधान होईल अशी कार्यवाही केली नसेल त्याबाबतीत, कुलपतीस, कार्यकारी परिषदेने किंवा व्यवस्थापकवर्गाने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन यांचा विचार केल्यानंतर, त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील; आणि कार्यकारी परिषद किंवा यथास्थिती व्यवस्थापकवर्ग अशा निदेशांचे पालन करील.

(९) कार्यकारी परिषद किंवा व्यवस्थापकवर्ग निर्धारित करण्यात आलेल्या मुदतीत अशा कोणत्याही निदेशांचे पालन करण्यात कसूर करील किंवा चुकेल तर कुलपतीस, कार्यकारी परिषदेकडून किंवा विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून किंवा व्यवस्थापकवर्गाकडून किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर व्यक्तीकडून अशी कार्यवाही करवून घेण्याची व्यवस्था करता येईल व त्याचा खर्च, कोणताही असल्यास, विद्यापीठाच्या संबंधित प्राधिकरणाने किंवा यथास्थिती, व्यवस्थापकवर्गाने ताबडतोब द्यावा असा निदेश देता येईल.

(१०) या कलमान्वये कुलपतीने काढलेला कोणताही निदेश किंवा दिलेला आदेश हा अंतिम असेल.

अधिकाऱ्यांची आणि प्राधिकरणांची कार्यवाही विलोपित, निलंबित, इत्यादी करण्याची शक्ती.

७७. या अधिनियमाच्या निकटपूर्ववर्ती कलमाच्या उपसंबंधास किंवा त्याच्या इतर कोणत्याही उपबंधास बाध न येऊ देता, कुलपतीस, त्याच्या मते या अधिनियमाशी किंवा परिनियमांशी, अध्यादेशांशी किंवा विनियमांशी अनुरूप नसेल असा, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही प्रस्ताव, आदेश किंवा कार्यवाही, लेखी आदेशाद्वारे, विलोपित करता येईल, निलंबित करता येईल किंवा त्यामध्ये फेरबदल करता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, कुलपती, असा आदेश का देण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्यासाठी त्या अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यास बोलाविल आणि कुलपतीने निश्चित केलेल्या वेळेच्या आत, असे कारण दर्शविण्यात आल्यास तो त्याचा विचार करून निर्णय देईल व त्याचा निर्णय हा अंतिम असेल.

निवडणुका प्रमाणशीर प्रतिनिधित्वानुसार असणे.

७८. विद्यापीठाची अधिसभा, कार्यकारी परिषद आणि विद्या परिषद किंवा इतर कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ यांची प्रत्येक निवडणूक ही, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्वावर एकल संक्रमणीय मताद्वारे गुप्त मतदान पद्धतीने, आणि परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने घेण्यात येईल.

पद सोडणे.

७९. (१) कुलगुरूस, कुलपतीला उद्देशून लिहून स्वतःच्या सहीनिशी, आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल;

(२) कुलपतीच्या किंवा राज्य शासनाच्या नामनिर्देशित व्यक्ती व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही सदस्यास, कुलगुरूस उद्देशून लिहून स्वतःच्या सहीनिशी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने राजीनामा स्वीकारल्यानंतर अशा सदस्याचे पद रिकामे होईल.

(३) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही सदस्यास नैतिक अधोगतीमध्ये ज्याचा अंतर्भाव होईल अशा एखाद्या अपराधाबद्दल, न्यायालयाने दोषी ठरविल्यानंतर तो सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल.

**आकस्मिक रिकामे झालेले पद भरणे.**

८०. विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा इतर मंडळाच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त एखाद्या सदस्याचे पद, त्याचा अवधी संपण्यापूर्वी, रिकामे होईल तेव्हा, असे रिकामे पद एखाद्या रीत्या रिकामे सदस्याची यथास्थिती निवडणूक करून, नामनिर्देशनाद्वारे, नेमणूकीद्वारे किंवा त्यास स्वीकृत करून घेऊन, शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल व तो सदस्य, ज्याच्या पदावर त्याची निवडणूक, नामनिर्देशन किंवा नेमणूक करण्यात आलेली असेल किंवा त्यास स्वीकृत करून घेण्यात आले असेल त्या सदस्याने जर ते पद रिकामे झाले नसते तर जितक्या मुदतीपर्यंत ते धारण केले असते केवळ तितक्याच मुदतीपर्यंत पद धारण करील :

परंतु, जर असे रिकामे पद, हे अधिसभेच्या निवडून दिलेल्या सदस्याचे असेल आणि अशा सदस्याचा पदावधी संपण्याच्या तारखेपूर्वी सहा महिन्यांच्या आत रिकामे होईल तर, अधिसभेकडून तिच्या पुढील सभेतील निवडणुकीद्वारे असेल त्याखेरीज असे रिकामे पद भरण्यात येणार नाही.

**नोंदणीकृत स्नातक.**

८१. (१) पोट-कलम (२) च्या उपबंधास अधीन राहून, पुढील व्यक्तींना नोंदणी केलेल्या स्नातकांच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करून घेण्याचा किंवा नोंदणी केलेले स्नातक होण्याचा हक्क असेल, त्या व्यक्ती अशा—

(अ) विद्यापीठाच्या स्नातक असलेल्या व्यक्ती ;

(ब) भारतीय विद्यापीठ अधिनियम, १९०४, मुंबई विद्यापीठ अधिनियम १९२८, किंवा मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९५३ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मुंबई विद्यापीठाच्या स्नातक असलेल्या व्यक्ती ; आणि

(क) इतर कोणत्याही विद्यापीठाच्या स्नातक असून, परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने नोंदणी केलेले स्नातक म्हणून मान्यताप्राप्त असतील अशा व्यक्ती.

(२) जी व्यक्ती,—

(अ) विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल ;

(ब) अमुक्त नादार असेल ;

(क) जर एखाद्या अपराधात नैतिक अधोगतीचा अंतर्भाव होत असून सहा महिन्यांहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यास पात्र असेल अशा अपराधाबद्दल न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आली असेल ; आणि

(ड) महाराष्ट्र राज्यात विधिद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची नोंदलेली स्नातक असेल ;

अशी व्यक्ती स्नातकांच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करून घेण्यास किंवा नोंदणी केलेला स्नातक होण्यास अर्हत असणार नाही :

परंतु, पोट-कलम (१), खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती, ही या अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या आत, उक्त विद्यापीठाचा नोंदणी केलेला स्नातक होण्यासंबंधी निवड करील आणि आपण अशी निवड केल्याचे कुलसचिवास कळविल तर तिला, या पोट-कलमाच्या खंड (ड) मधील अनर्हता लागू होणार नाही. अशा रीतीने निवड कळविल्यानंतर ती व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात विधिद्वारे स्थापन करण्यात आलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाचा नोंदणी केलेला स्नातक म्हणून असण्याचे बंद होईल.

(३) नोंदणी केलेला स्नातक होऊ इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशी फी भरून, कुलसचिवाकडे अर्ज करील. कुलगुरू, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नोंदणी केलेला स्नातक होण्याचा हक्क आहे किंवा कसे याबाबत निर्णय देईल.

(४) एखाद्या व्यक्तीस, नोंदणी केलेल्या स्नातकांच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करून घेण्याचा किंवा नोंदणी केलेला स्नातक होण्याचा हक्क आहे किंवा कसे किंवा ती, नोंदणी केलेला स्नातक होण्यास अर्हत नाही किंवा कसे याबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास, त्याचा, कुलगुरूकडून, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, निर्णय करण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

दीक्षांत समारंभ.

८२. पदव्या प्रदान करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी, विद्यापीठ दीक्षांत समारंभ परिनियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने, घडवून आणण्यात येतील.

सभांचे हंगामी अध्यक्ष.

८३. विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या सभेच्या अध्यक्षस्थानी काम पाहण्यासाठी सभापती किंवा अध्यक्ष यांची अधिनियमान्वये किंवा तदनुसार तरतूद करण्यात आली नसेल किंवा ज्याच्या संबंधात अशा रीतीने तरतूद करण्यात आली असेल असा सभापती किंवा अध्यक्ष अनुपस्थित असेल आणि अध्यक्षस्थानासाठी इतर कोणत्याही व्यक्तीची तरतूद करण्यात आलेली नसेल तर, उपस्थित सदस्य, अशा सभेचा अध्यक्ष म्हणून, आपल्यातून एका व्यक्तीची निवड करतील.

शक्तींचे प्रत्यायोजन.

८४. या अधिनियमाच्या उपबंधांस व परिनियमांस अधीन राहून, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास, आदेशाद्वारे, परिनियम, आदेश आणि विनियम करण्याच्या शक्तींव्यतिरिक्त, आपल्या इतर शक्ती आपल्या नियंत्रणाखालील कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे सोपवता येतील आणि सोपवलेल्या शक्तींचा वापर करण्याची अंतिम जबाबदारी ही, त्या सोपवणाऱ्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे निहित असण्याचे चालू राहील या शर्तीस अधीन असेल.

रचनेतील दोष, पद रिकामे होणे केवळ याच कारणावरून कृती किंवा कामकाज विधिबाह्य न ठरणे.

८५. विद्यापीठाची अधिसभा किंवा कार्यकारी परिषद किंवा विद्या परिषद किंवा इतर प्राधिकरण किंवा मंडळ हे त्याची रचना यथोचित रीत्या झालेली नाही किंवा त्याच्या रचनेत किंवा पुनर्रचनेत दोष आहे किंवा त्याच्या सदस्यांपैकी एखाद्या सदस्याचे पद रिकामे आहे केवळ याच कारणावरून, त्याची कृती किंवा कामकाज, कोणत्याही वेळी विधिबाह्य ठरणार नाही ; आणि अशी कृती किंवा कामकाज यांच्या विधिग्राह्यतेबद्दल कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे किंवा अधिकाऱ्यापुढे केवळ अशा कारणावरून, हरकत घेतली जाणार नाही.

अर्थविवरणा-संबंधातील प्रश्न आणि विद्यापीठ प्राधिकरण किंवा मंडळ इत्यादींच्या रचनेसंबंधातील विवाद.

८६. हा अधिनियम किंवा कोणताही परिनियम, आदेश (ordinance), विनियम किंवा नियम यांच्या कोणत्याही उपबंधाच्या अर्थविवरणासंबंधात किंवा विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ यांचा सदस्य म्हणून, एखादी व्यक्ती यथोचित रीत्या निवडण्यात आली आहे किंवा तिची नेमणूक करण्यात आली आहे किंवा सदस्य असण्याचा, तिला हक्क आहे किंवा काय यासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, प्रत्यक्ष प्रतिकूल परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा मंडळाने विनंतीअर्ज केल्यावर किंवा स्वाधिकारे कुलगुरूकडून ती बाब कुलपतीकडे विचारार्थ पाठविण्यात येईल आणि कुलपती, त्याला आवश्यक वाटेल असा सल्ला त्यावर घेतल्यानंतर, त्या प्रश्नाचा निर्णय लावील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल :

परंतु असा प्रश्न, अधिसभेच्या पंचवीसपेक्षा कमी नाही इतक्या सदस्यांनी सही करून मागणी केल्यानंतरच कुलगुरूकडून कुलपतीकडे विचारार्थ पाठविण्यात येईल.

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखणे.

८७. (१) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शिस्त व शिस्तभंगाची कारवाई यासंबंधीच्या सर्व शक्ती कुलगुरूकडे निहित असतील.

(२) कुलगुरूस, आदेशाद्वारे या कलमाखालील सर्व किंवा कोणत्याही शक्ती, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याबाबतीत तो नामनिर्दिष्ट करील अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवता येतील.

(३) कुलगुरूस, आपल्या शक्तींचा वापर करताना, आदेशाद्वारे कोणत्याही विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थ्यांना विनिर्दिष्ट मुदतीसाठी काढून टाकण्यात यावे किंवा महाविद्यालयातील किंवा परिसंस्थेतील किंवा विद्यापीठाच्या विभागातील अभ्यासक्रमासाठी किंवा अभ्यासक्रमांसाठी विनिर्दिष्ट मुदतीकरिता प्रवेश देऊ नये किंवा तीनशे रुपयांहून अधिक नाही अशी दंडाची शिक्षा देण्यात यावी किंवा विद्यापीठ, महाविद्यालय, परिसंस्था किंवा विभाग याद्वारे संचालित परीक्षेस किंवा परीक्षांस बसण्याची पाच वर्षांहून अधिक नाही अशा विनिर्दिष्ट मुदतीसाठी, मनाई करण्यात यावी किंवा विद्यार्थी ज्या परीक्षेस किंवा परीक्षांस बसला असेल/बसले असतील त्या परीक्षेचा किंवा परीक्षांचा त्याचा/त्यांचा निकाल रद्द करण्यात यावा, असा निदेश देता येईल.

(४) कुलगुरूच्या शक्तींस कोणताही बाध न येता, महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्राचार्य आणि विद्यापीठातील विभागांचे प्रमुख यांना योग्य ती शिस्त राखण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा, त्यांच्या प्रभारातील विद्यार्थ्यांच्या बाबतीतील सर्व शक्तींचा वापर करण्याचा प्राधिकार असेल.

(५) कुलगुरू, महाविद्यालयांचे प्राचार्य व परिसंस्थांचे प्रमुख आणि विद्यापीठातील विभागांचे प्रमुख यांच्या शक्तींस कोणताही बाध न येता कुलगुरू, कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शिस्त व त्यांची योग्य वर्तणूक यांच्याबाबतीत नियम करील आणि ते सर्व महाविद्यालये व परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांनाही लागू होतील आणि प्रत्येक विद्यार्थ्याला अशा नियमांची प्रत पुरवण्यात येईल.

(६) महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व परिसंस्थांच्या प्रमुखांना कुलगुरूने केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे, त्यास आवश्यक वाटतील त्याप्रमाणे, शिस्त व योग्य वर्तणूक यासंबंधीचे पूरक नियम करता येतील आणि प्रत्येक विद्यार्थ्याला पूरक नियमांची प्रत पुरवण्यात येईल.

(७) प्रत्येक विद्यार्थी, प्रवेशाच्या वेळी, कुलगुरू आणि विद्यापीठाचे इतर अधिकारी व प्राधिकरणे आणि महाविद्यालयांचे प्राचार्य व परिसंस्थांचे प्रमुख यांची प्राधिकरणे यांच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या तो अधीन राहील अशा अर्थाच्या प्रतिज्ञापनावर सही करील आणि त्याबाबत कुलगुरूने केलेल्या नियमांचे आणि महाविद्यालयांचे प्राचार्य व परिसंस्थांचे प्रमुख यांनी केलेले नियम जेथवर लागू असतील तेथवर, त्यांचे तो पालन करील.

(८) विद्यापीठाकडून चालवण्यात न येणाऱ्या एखाद्या महाविद्यालयातील किंवा परिसंस्थेतील विद्यार्थ्यांविरुद्ध करण्यात यावयाच्या शिस्तभंगाच्या कारवाईसंबंधीच्या सर्व शक्ती, आदेशाद्वारे विनियमित करण्यात येईल अशा रीतीने महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे किंवा परिसंस्थेच्या प्रमुखांकडे निहित होतील.

८८. विद्यापीठाने किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, प्राधिकरणाने किंवा मंडळाने सद्भावनापूर्वक केलेल्या सर्व कृती आणि संमत केलेले सर्व आदेश अंतिम असतील; आणि त्यानुसार, हा अधिनियम, व परिनियम, आदेश, विनियम व नियम यांच्या उपबंधांस अनुसरून सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा संमत केलेल्या किंवा करण्याचा किंवा संमत करण्याचा आशय असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल विद्यापीठाविरुद्ध किंवा त्याच्या अधिकाऱ्यांविरुद्ध, प्राधिकरणांविरुद्ध किंवा मंडळाविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही, चालवता येणार नाही किंवा त्यांच्याकडून कोणत्याही हानिपूर्तीची मागणी करण्यात येणार नाही. कृती व इतर आदेश यांचे संरक्षण.

८९. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ यांची प्रथम रचना किंवा पुनर्रचना करण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण उपस्थित झाल्यास, राज्य शासनास, कुलपतीशी विचारविनिमय केल्यानंतर, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशा, या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी आणि प्रयोजनांशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल; अडचणी दूर करणे.

परंतु, असा आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांनंतर करण्यात येणार नाही.

निरसन. ९०. नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

व्यावृत्ति. ९१. उक्त अधिनियमाचे निरसन करण्यात आले तरीही,—

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, कुलगुरू म्हणून पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती, अशा प्रारंभानंतर, विद्यापीठाचा कुलगुरू होईल आणि या अधिनियमान्वये कुलगुरूची नियुक्ती करण्यात येईपर्यंत, उक्त पद धारण करण्याचे आणि या अधिनियमाद्वारे अथवा तदन्वये कुलगुरूला प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तींचा वापर करण्याचे व सर्व कर्तव्ये पार पाडण्याचे चालू ठेवील ;

(दोन) (अ) उक्त अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी पदावर असलेल्या विद्यापीठाच्या अधिसभेचे सर्व सदस्य, कार्यकारी परिषदेचे व विद्यापरिषदेचे, अभ्यास मंडळांचे आणि इतर सर्व प्राधिकरणांचे, मंडळांचे व समित्यांचे सदस्य, अनुक्रमे, अधिसभा, कार्यकारी व विद्यापरिषदा, अभ्यास मंडळे आणि इतर तत्सम प्राधिकरणे, विद्यापीठाची मंडळे व समित्या यांचे सदस्य असल्याचे समजण्यात येईल आणि हा अधिनियम अंमलात येईल त्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा नंतरची नसेल अशा ज्या तारखेला अधिसभेची उचित प्रकारे रचना करण्यात आली आहे असे कुलगुरू घोषित करील त्या तारखेपर्यंत, प्राधिकरणे, मंडळे व समित्या या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करतील व कर्तव्ये पार पाडतील ;

(ब) कालप्रवाह खेरीज करून, अन्यथा, अधिसभेच्या अथवा या खंडात निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकरणाच्या, मंडळाच्या अथवा समितीच्या सदस्यांचे पद रिकामे होईल त्याबाबतीत, ते भरणे आवश्यक असणार नाही :

परंतु, कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर, कुलपतीला, असे रिकामे पद भरण्यास्तव कोणत्याही व्यक्तीस नामनिर्देशित करता येईल :

आणखी असे की, असे कोणतेही रिकामे पद भरण्याबाबत झालेल्या अकृतीमुळे, उक्त रिकामे पद भरण्याबाबत अकृति झाली केवळ याच कारणामुळे, कोणत्याही अशा प्राधिकरणाचे, मंडळाचे अथवा समितीचे कोणतेही कृत्य अथवा निर्णय विधिअग्राह्य ठरणार नाही.

(तीन) उक्त अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या सर्व विद्याशाखा व विभाग यांची या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेली आहे असे समजण्यात येईल ;

(चार) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, उक्त अधिनियमान्वये संलग्न करण्यात आलेली सर्व महाविद्यालये, घटक बनविण्यात आलेली सर्व महाविद्यालये, मान्यता देण्यात आलेल्या सर्व परिसंस्था आणि नोंदण्यात आलेल्या सर्व माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा व त्या अधिनियमान्वये विद्यापीठाच्या विशेषाधिकारास पात्र होणारी ही सर्व, या अधिनियमान्वये, यथास्थिती संलग्न असल्याचे, घटक बनवण्यात आल्याचे, मान्यता देण्यात आल्याचे अथवा नोंदण्यात आल्याचे आणि विद्यापीठाचे विशेषाधिकार याना बहाल करण्यात आल्याचे समजण्यात येईल; मात्र या अधिनियमाद्वारे अथवा तदन्वये असे विशेषाधिकार काढून घेता येतील, निर्बंधित करता येतील अथवा यात सुधारणा करता येईल.

(पाच) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, नोंदण्यात आलेल्या अथवा नोंदण्यात आले आहे असे मानण्यात आलेल्या सर्व पदवीधरांना, कलम ८१, पोट-कलम (२) च्या खंड (अ), (ब) अथवा (क) अन्वये त्यांना अनर्ह ठरवण्यात येत नाही तोपर्यंत, या अधिनियमान्वये नोंदण्यात आल्याचे समजण्यात येईल :

परंतु, असा कोणताही पदवीधर हा, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, महाराष्ट्र राज्यात कायद्याने स्थापन करण्यात आलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर असेल त्याबाबतीत उक्त कलम ८१, पोट-कलम (२) याच्या परंतुकाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याने निवड केली नसेल, तोपर्यंत तो नोंदणीकृत पदवीधर असण्याचे बंद होईल ;

(सहा) उक्त अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाची सर्व जंगम व स्थावर मालमत्ता, आणि सर्व अधिकार, कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, शक्ती व विशेषाधिकार विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि कोणत्याही हमीशिवाय, विद्यापीठाकडे निहित असतील आणि ज्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनासाठी ह्या विद्यापीठाची रचना करण्यात आली आहे त्यास्तव ते प्रयुक्त असतील ;

(सात) उक्त अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाने स्वीकारलेली किंवा त्याला मिळालेली व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्याने धारण केलेली सर्व धर्मदाने ही, विद्यापीठाने या अधिनियमान्वये स्वीकारली असल्याचे किंवा त्याला मिळाली असल्याचे किंवा त्याने धारण केली असल्याचे मानण्यात येईल व ज्या शर्तींवर अशी धर्मदाने स्वीकारली किंवा मिळाली असतील किंवा धारण केली असतील अशा सर्व शर्ती, या अधिनियमांच्या कोणत्याही उपबंधांशी विसंगत असल्या तरीही, या अधिनियमाखाली वैध असल्याचे मानण्यात येईल ;

(आठ) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निर्माण झालेली आणि उक्त अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या नावे वैधरीत्या अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व बंधने यांची फेड व पूर्ती विद्यापीठाकडून करण्यात येईल ;

(नऊ) ज्यात, या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या नावाने कोणतेही मृत्युपत्रित दान, देणगी, विश्वस्तव्यवस्थेच्या अटी अथवा विश्वस्त निधी अंतर्भूत असेल असे, उक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेले कोणतेही मृत्युपत्र, विलेख अथवा इतर दस्तऐवज यात, उक्त अधिनियमाच्या प्रारंभानंतर, त्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाचे त्यातील नावाऐवजी जणू काही या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाचे नाव त्यात अंतर्भूत आहे असा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(दहा) उक्त अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाबद्दलचे कोणत्याही अधिनियमातील अथवा एखाद्या अधिनियमितीअन्वये काढण्यात आलेल्या इतर लेखांतील सर्व निर्देश या विद्यापीठाबद्दलचे निर्देश आहेत असा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(अकरा) उक्त अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या व त्या अधिनियमान्वये वैधरीत्या करण्यात आलेल्या आणि या अधिनियमास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या विद्यापीठाच्या कुलसचिवाची आणि इतर सर्व अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक, या अधिनियमान्वये व या अधिनियमाच्या प्रयोजनास्तव करण्यात आल्याचे समजण्यात येईल ; आणि हा कुलसचिव आणि असे अधिकारी व कर्मचारी हे, शक्य असेल तेथवर सक्षम प्राधिकरणाला अशा शर्तींमध्ये बदल करता येतील या गोष्टींचा अपवाद करून त्यांच्या पदाच्या व सेवायोजनाच्या अटी नियंत्रित करणाऱ्या शर्तींच्या अधीन, पद धारण करण्याचे व कृति करण्याचे चालू ठेवतील ;

(बारा) उक्त अधिनियमान्वये वैधरीत्या करण्यात आलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या परीक्षकांच्या नेमणुका, ह्या अधिनियमान्वये व अधिनियमाच्या प्रयोजनास्तव करण्यात आलेल्या आहेत असे समजण्यात येईल आणि या अधिनियमान्वये नवीन नेमणुका करण्यात येईपर्यंत असे परीक्षक आपले पद धारण करणे चालू ठेवतील ;

(तेरा) उक्त अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व परिनियम, आदेश (ordinances) विनियम व नियम आणि काढण्यात आलेल्या सर्व नोटिसा व आदेश जेथवर असे परिनियम, आदेश, विनियम व नियम या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसतील तेथवर, अमलात असण्याचे चालू राहील आणि या अधिनियमान्वये करण्यात आलेले परिनियम, आदेश (ordinances) विनियम, नियम व काढण्यात आलेल्या नोटिसा व आदेश याद्वारे ते अधिक्रमित करण्यात अथवा त्यांच्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, या अधिनियमान्वये करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

परंतु, उक्त अधिनियमान्वये करण्यात आलेला आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेला कोणताही परिनियम, आदेश (ordinance) विनियम, नियम व काढण्यात आलेली कोणतीही नोटीस अथवा आदेश, हा या अधिनियमान्वये असा परिनियम, आदेश (ordinance) विनियम, नियम करण्याची अथवा नोटीस अथवा आदेश काढण्याची शक्ती, केवळ निराळे प्राधिकरण अथवा अधिकारी

याजकडे निहित आहे, अथवा त्याचा विषय हा या अधिनियमान्वये करावयाच्या दुय्यम विधिविधानाच्या अथवा लेख्याच्या निराळ्या नमुन्यात अनुज्ञेय आहे केवळ याच कारणावरून, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत आहे असे समजण्यात येणार नाही.

## अनुसूची

[ कलम २ चा खंड (३३) पहा ]

(१) अकोला जिल्हा,
(२) अमरावती जिल्हा,
(३) भंडारा जिल्हा,
(४) बुलढाणा जिल्हा,
(५) चंद्रपूर जिल्हा,
(६) नागपूर जिल्हा,
(७) वर्धा जिल्हा, व
(८) यवतमाळ जिल्हा

मिळून बनणारे क्षेत्र.

(यथार्थ अनुवाद)

ज्ञा. म. कुलकर्णी,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.